South Kitchen THE TASTE OF TRADITION EXPRESS
साऊथ किचन एक्सप्रेस बुलढाणा
किचन कामासाठी हेल्पर व कामगार (मुले/मुली) पाहीजेत. तरी इच्छुकांनी संपर्क साधावा.
सुवर्णसंधी ! नवीन टीममध्ये सामील होण्याची
संपर्क:- 8788681359
पत्ता:- कॅपिटल प्लाझा, अपोझिट सोसायटी पेट्रोल पंप, चिखली रोड, बुलढाणा

# दैनिक महाभूमि

निर्मळ, निकोप, निःपक्ष

कार शिकायची तर कुठे फक्त शिवकृपा मध्येच...
शिवकृपा मोटार ड्रायव्हिंग स्कूल & पी यु सी (PUC) सेंटर
उन्हाळी सुट्टी निमित्त विशेष सूट
आमचे वैशिष्ट्ये : । महिलासाठी स्वतंत्र बॅच व्यवस्था । 3D कार सिम्युलेटर वर ड्रायव्हिंगचा सराव. । वाहतुक नियमावलींची परिपूर्ण माहिती. । मोबाईल APP द्वारे वाहतुक नियमांची परिपुर्ण माहिती. ।मोटार व्हेईकल ॲक्टच्या अभ्यासक्रमानुसार ड्रायव्हिंग प्रशिक्षण. ।अवघड वळणावर रात्रीच्या वेळी घाटात आणि गर्दीत प्रशिक्षण देणारी एकमेव संस्था. आमच्याकडे सर्व वाहनांचे इन्शुरन्स काढुन मिळेल.
पत्ता : शॉप नं.६ ओंकार लॉन्सजवळ, धाड नाका, बुलढाणा
सचिन सोनटक्के - ९९२३७२२५५५/ नितीन सोनटक्के - ९९२३१२२५५५

https://dainikmahabhoomi.com
https://epaper.dainikmahabhoomi.com



## आज जागतिक पर्यावरण दिन

## न्यूज ब्रीफ

### चीन सीमेवर भारताची पॉवर!

**मुंबई :** चीनच्या सीमेवर, जिथे श्वास घेणेही कठीण असते आणि हाडं गोठवणारी थंडी असते, तिथे आता हिंदुस्थानच्या विजयाची एक नवी गाथा लिहिली जात आहे. समुद्रसपाटीपासून तब्बल १६,७०० फूट उंचीवर वसलेले लडाखमधील चुमुर हे गाव आता केवळ एक सीमावर्ती भाग उरले नसून, ते देशातील पहिले मॉडेल बॉर्डर विलेज बनणार आहे. एलजी विनय कुमार सक्सेना यांनी या ऐतिहासिक प्रकल्पाची पायाभरणी केली असून, यामुळे चीनच्या डोळ्यांत डोळे घालून उभ्या असलेल्या या गावाचा कायापालट होणार आहे.

### अग्निकांड : हॉटेल मालकाला पोलीस कोठडी

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या मालवीय नगर भागात असलेल्या एका प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये बुधवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीमुळे संपूर्ण देशाला हादरवून सोडले. मालवीय नगर आग प्रकरणातील आरोपी आणि मालवीय नगर हॉटेलचे मालक लवकेश बजाज यांना साकेत न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सुनावणीदरम्यान दिल्ली पोलिसांनी चार दिवसांची पोलीस कोठडी मागितली. सुनावणीदरम्यान, लवकेश बजाज यांच्या वकिलाने सांगितले की, त्यांना एफआयआरची प्रत मिळालेली नाही. यावर दिल्ली पोलिसांनी एफआयआरची प्रत देण्याचे आश्वासन दिले.

### अण्णामलाईंनी पक्षश्रेष्ठींचा प्रस्ताव धुडकावला

**चेन्नई :** तामिळनाडूमध्ये अस्तित्वाची लढाई लढत असलेल्या भाजपला धक्का बसला आहे. पोलीस अधिकारी ते राजकीय नेते असा प्रवास करणारे राज्यातील भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष के. अण्णामलाई यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचे निश्चित केले आहे. पक्षश्रेष्ठींनी पक्ष सोडण्याच्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची केलेली विनवणी अण्णामलाई यांनी धुडकावून लावली आहे.


### अखेर मान्सून भारतात दाखल ; केरळमध्ये जोरदार पाऊस

# आला रे पाऊस आला!

**मुंबई, वृत्तसंस्था**

बऱ्याच प्रतीक्षेनंतर भारतात मान्सूनचे आगमन झाले आहे. नैऋत्य मान्सून केरळमध्ये दाखल झाला आहे, असे भारतीय हवामान विभागाने गुरुवारी जाहीर केले. दक्षिण भारतातील या राज्यात बऱ्याच काळापासून पाऊस सुरू होता, पण आता याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे राज्यात १ जूनला मान्सूनचे आगमन होणार होते.

हवामान विभागाने सुरुवातीला असा अंदाज वर्तवला होता की, केरळमध्ये मान्सून २६ मे पर्यंत दाखल होऊ शकतो. तेव्हा चार दिवसांचा विलंब किंवा लवकर आगमन होण्याचाही अंदाज वर्तवला होता. पावसाळा ३० मे पर्यंत सुरू होऊ शकतो अशी शक्यता वर्तवली होती. तरीही मान्सूनला विलंब झाला. इतकेच नव्हे तर मान्सून नेहमीच्या १ जूनच्या तारखेला दाखल झाला नाही, त्यामुळे पावसाला चार दिवसांचा उशीर झाला.





### महाराष्ट्रात दोन दिवसांत मान्सून

■ महाराष्ट्रात पुढील दोन दिवसांत मान्सून दाखल होण्याचा अंदाज आहे. ६ ते ७ तारखेला मान्सून तळकोकणात दाखल होईल. त्यानंतर मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह इतर भागात पावसाला सुरुवात होईल.

### उत्तर प्रदेशात मान्सून १५ जूनच्या आसपास

■ भीषण उष्णतेने हैराण झालेल्या भारतातील उत्तर पश्चिम राज्यांमध्ये मान्सूनच्या आगमनाने दिलासा मिळाला आहे. ३० जूनपर्यंत मान्सून संपूर्ण देशाला व्यापेल असे भारतीय हवामान खात्याने सांगितले. राजधानी दिल्लीपर्यंत मान्सून पोहचण्यासाठी २५ ते ३० जून कालावधी लागू शकतो. उत्तर प्रदेशात मान्सून १५ जूनच्या आसपास दाखल होऊ शकतो.

### केरळमध्ये जोरदार पाऊस अन् अलर्ट

■ गुरुवारी सकाळी केरळच्या अनेक जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला होता. त्यात अलप्पुझा, कोट्टायम आणि एर्नाकुलम जिल्ह्यांचा समावेश होता. राज्यातील काही भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वेगवान वारे वाहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तिरुवनंतपुरम, कोल्लम, पत्तनमथिट्टा, इडुक्की आणि त्रिशूर जिल्ह्यात पावसाच्या सौम्य ते मध्यम सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

### दक्षिण भारतात मुसळधार पावसाचा इशारा

■ केरळसह तामिळनाडू आणि कर्नाटकच्या अनेक जिल्ह्यात पुढील सात दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. केरळच्या अनेक भागात आधीच जोरदार पाऊस सुरू आहे. ओडिशा, राजस्थान, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, दिल्ली, तेलंगणासह २४ राज्यांमध्ये पाऊस आणि वेगवान वारे वाहतील असे हवामान खात्याने सतर्क केले आहे. हवामानातील बदलामुळे आजही गुजरात, पश्चिम राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्रातील अनेक भागात तापमान ४० डिग्री सेल्सिअसपुढे आहे.

# महायुतीच्या १७ पैकी सहा जागा अविरोध

### विधान परिषद निवडणूक : महाविकास आघाडीला धक्का

**मुंबई, वृत्तसंस्था**

राज्यात विधान परिषदेच्या निवडणुका सुरू आहेत. विधान परिषदेसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे, पण मतदानाआधीच मोठा खेळ झाल्याचे पाहायला मिळत आहे. महायुतीचे तब्बल सहा उमेदवार अविरोध निवडून आल्याची माहिती समोर आली आहे. राज्यात १७ जागांसाठी निवडणूक होणार असून गुरूवारी अर्ज माघारीची शेवटची मुदत होती. अनेक ठिकाणी बंडखोरीही झाली होती. महायुतीला बंडखोरी रोखण्यात यश आले असून महाविकास आघाडीला आठ ठिकाणी झटका बसला आहे.

महायुतीला १७ जागांपैकी सहा जागा या बिनविरोध करण्यात यश आले आहे. यामध्ये ठाणे मतदारसंघात रवींद्र फाटक, कोकण मतदारसंघात अनिकेत तटकरे, यवतमाळ, वर्धा-गडचिरोली- चंद्रपूर मतदारसंघात भाजपाचे अरुण लखाणी, पुणे मतदारसंघात विक्रम काकडे आणि अहिल्यानगर मतदारसंघात भाजपचे प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड झाल्याची माहिती समोर आली आहे. महायुतीने या सहा जागांवर बिनविरोध विजय मिळवत महाविकास आघाडीला धक्का दिला आहे.

### नाशिकमध्ये महायुतीमध्येच बंडखोरी

■ नाशिकमधील राजकीय वातावरण तापले असून, अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांच्या उमेदवारी अर्जाच्या माघारीवरून शेवटच्या क्षणापर्यंत नाट्य पाहायला मिळाले. गोकुळ गीते यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा, यासाठी महायुतीच्या नेत्यांकडून शेवटच्या मिनिटापर्यंत शर्थीचे प्रयत्न सुरू होते. मात्र, एका वादग्रस्त ऑडिओ क्लिपमुळे हा संपूर्ण निर्णय फिरल्याचा खळबळजनक दावा आता गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय निलेश बोरा आणि नाना गामने यांनी केला आहे.

## भाजपकडून राज्यसभेसाठी ११ उमेदवारांची घोषणा

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

आगामी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने गुरुवारी आपल्या ११ उमेदवारांची अधिकृत घोषणा केली आहे. पक्षाने या यादीत अनुभवी नेत्यांसह प्रादेशिक आणि सामाजिक समीकरणे साधणाऱ्या चेहऱ्यांना प्राधान्य दिले आहे.

यामध्ये राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि पंजाबमधील बड्या नेत्यांचा समावेश आहे. या उमेदवारांमध्ये गुजरातमधून राजुभाई शुक्ला, मुकेशभाई रथवा आणि मानसिंग परमार यांचा समावेश आहे.

राजस्थानमध्ये सतीश पुनिया आणि अलका गुर्जर, मध्य प्रदेशात तरुण चुघ आणि रजनीश अग्रवाल, पंजाबमध्ये तरुण चुघ, अरुणाचल प्रदेशमध्ये ताई तागक, मणिपूरमधून ए. शारदा देवी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.


## मुझफ्फरपूर येथील खासगी रुग्णालयात आग; १० रुग्णांचा होरपळून मृत्यू

**मुझफ्फरपूर, वृत्तसंस्था**

बिहारमधील मुझफ्फरपूर येथील ब्रह्मपुरा भागात असलेल्या प्रसाद हॉस्पिटलला रात्रीच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. आगीच्या ज्वाळा इतक्या तीव्र होत्या की त्यांनी काही वेळातच रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागाला पूर्णपणे कचाट्यात घेतले. या भीषण दुर्घटनेत रुग्णालयात दाखल असलेले दोन डझनहून अधिक रुग्ण थेट होरपळले असून, प्राथमिक माहितीनुसार यामध्ये १० रुग्णांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मात्र, मृतांच्या अधिकृत आकड्याबाबत अद्याप प्रशासनाकडून अंतिम पुष्टी मिळणे बाकी आहे.

### रुग्णांना इतर रुग्णालयात केले दाखल

■ घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी तातडीने फौजफाट्यासह प्रसाद हॉस्पिटलमध्ये पोहोचले. अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. या दुर्घटनेत होरपळलेल्या सर्व रुग्णांना तातडीने रुग्णवाहिकेच्या साहाय्याने शहरातील वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



## भारतासह ५४ देशांवर १२.५ टक्के टेरिफ!

### अमेरिकेचा इरादा : सक्तीच्या मजुरीने तयार वस्तूंची आयात सुरूच असल्याने कारवाई



**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधीने (यूएसटीआर) कलम ३०१ अंतर्गत भारतासह ५४ देशांवर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्क (टेरिफ) लावण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंच्या आयातीवर बंदी घालण्यात या देशांना अपयश आले आहे. या बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्यातही त्यांनी कुचराई केली आहे, असा आरोप करण्यात आला आहे. यूएसटीआरने ६० देशांच्या चौकशीनंतर हा प्रस्ताव तयार केला आहे. मात्र, भारताने हे आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच, ही चौकशी थांबवण्याची मागणी केली आहे. या ५४ देशांमध्ये भारताव्यतिरिक्त चीन, जपान, ब्राझील, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, सौदी अरेबिया आदी देशांचा समावेश आहे. ज्या देशांमध्ये सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंच्या आयातीवर बंदी आहे किंवा ज्यांनी ती लागू करण्याचे आश्वासन दिले आहे.

### निर्णय अंतिम नाही, भारताला बाजू मांडण्याची संधी

■ अमेरिकी व्यापार कायद्यात कलम ३०१ काय आहे? अमेरिकी व्यापार कायद्यातील ही अतिशय आक्रमक कायदेशीर तरतूद आहे. याच्या मदतीने अमेरिका कोणत्याही देशावर मनमानी निर्बंध किंवा भारी आयात शुल्क लावू शकते. हे शुल्क लागू झाले, तर भारताचा कापड उद्योग, ॲल्युमिनियम, कापूस, सी-फूड, कॉफी आणि तांदूळ अमेरिकेत महाग होतील. मात्र, औषधे यातून वगळण्यात आली आहेत.

## देशात आणीबाणी लागणार!

● मोदी वर्षभरात पंतप्रधानपद सोडणार
● राहुल गांधींच्या दाव्याने खळबळ

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**



काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत धक्कादायक दावे करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. एका कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी यांनी पुढील एका वर्षात नरेंद्र मोदी पंतप्रधानपदावर राहणार नाहीत, असा अंदाज व्यक्त केला आहे. तसेच देशात मोठे आर्थिक संकट येण्याची आणि लोकांच्या विरोधामुळे आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी म्हणाले की, देशातील परिस्थिती वेगाने बदलत आहे आणि सत्ताधाऱ्यांच्या नियंत्रणातील व्यवस्था आता ढासळू लागली आहे. त्यांच्या मते, सरकारच्या आतूनच संस्थात्मक पातळीवर विरोध सुरू झाला असून विविध यंत्रणांमध्ये अस्वस्थता वाढत आहे. राहुल गांधी यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेबाबतही गंभीर इशारा दिला. त्यांच्या मते, केंद्र सरकारने अर्थव्यवस्थेला संरक्षण देणाऱ्या अनेक महत्त्वाच्या यंत्रणा कमकुवत केल्या आहेत.

### व्यवस्थेच्या आतूनच बंड सुरू

■ राहुल गांधी यांनी दावा केला की, काही महत्त्वाच्या संस्थांमधून त्यांना मेसेज येत आहेत. निवडणूक आयोग, गुप्तचर यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेतील काही व्यक्तींकडून असंतोष व्यक्त केला जात असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांच्या मते, पूर्वी पूर्णपणे नियंत्रणात असलेल्या संस्था आता स्वतंत्रपणे विचार करू लागल्या असून सत्तेच्या विरोधात आवाज उठवत आहे.

### आणीबाणीची शक्यता व्यक्त

■ राहुल गांधी यांनी पुढे दावा केला की, लोकांमधील वाढता असंतोष दडपण्यासाठी सरकार कठोर पावले उचलू शकते. त्यांनी देशात आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यताही व्यक्त केली. त्यांच्या मते, जनतेचा दबाव वाढल्यास सत्ताधारी पक्ष परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करू शकतो.

### सर्वोच्च न्यायालयाची केंद्राला नोटीस

## आयव्हीएफ आणि सरोगसी सेंटरमार्फत होणाऱ्या बाल-तस्करीकडे ॲमिकसने वेधले लक्ष

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

आयव्हीएफ आणि सरोगसी केंद्रांमधील त्रुटींचा गैरफायदा घेऊन बाल तस्करीचे रॅकेट सक्रिय असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, अशा केंद्रांमधून होणारी बालतस्करी रोखण्यासाठी एक स्वतंत्र आणि सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज आहे का? याची चाचपणी सर्वोच्च न्यायालय करत आहे. याप्रकरणी न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावून उत्तर मागवले आहे.

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. पिंकी विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य या बाल तस्करी प्रकरणातील एप्रिल २०२५ च्या निकालाची देशभरात अंमलबजावणी होत आहे की नाही? यावर न्यायालय देखरेख ठेवून आहे.

यादरम्यान, न्यायालयाला सहकार्य करणाऱ्या (ॲमिकस क्युरी) ज्येष्ठ वकील अपर्णा भट यांनी न्यायालयात एक अहवाल सादर केला. आयव्हीएफ आणि सरोगसी केंद्रांमधून होणारी बालतस्करी रोखण्यासाठी सध्या कोणतीही प्रमाणित कार्यपद्धती उपलब्ध नसल्याकडे त्यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले.




### काय आहे प्रकरण?

■ एका बाल तस्करी प्रकरणाच्या चौकशी दरम्यान हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणातील काही आरोपींनी आपण एका आयव्हीएफ केंद्राशी जोडलेले अंडी दाते असल्याचा दावा केला होता. यानंतर ॲमिकस क्युरी यांनी ऑगस्ट २०२५ मध्ये असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह टेक्नॉलॉजी (नियमन) कायदा, २०२१ चे उल्लंघन होत असल्याची भीती व्यक्त केली होती. त्यावर न्यायालयाने दिल्ली पोलिसांना या बाजूने स्वतंत्र तपास करण्याचे आदेश दिले होते.

### काँग्रेसचे नेते अनंतराव थोपटे यांचे निधन



**पुणे :** राज्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे गुरूवारी निधन झाले आहे. वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे.

पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान, अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने राजकीय सामाजिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. अनंतराव थोपटे हे पुण्यातील भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार होते. भोर विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी अनेक वर्षे नेतृत्व केले होते. अनंतराव थोपटे अनेक वर्षे राज्य मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री होते. ते पुण्याचे पालकमंत्री देखील राहिले होते.

## द्रमुकचा इंडिया आघाडीला झटका!

### दिल्लीतील बैठकीकडे फिरवली पाठ

**चेन्नई, वृत्तसंस्था**

तमिळनाडूमध्ये थलपती विजय यांच्या सरकारमध्ये काँग्रेस सामील झाल्यानंतर, डीएमकेने विरोधी पक्षांच्या ऐक्याला मोठा धक्का दिला आहे. ८ जून रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीपासून डीएमकेने अंतर राखले आहे. निवडणूक निकालानंतर काँग्रेसने डीएमकेसोबत जो विश्वासघात केला, त्यामुळे पक्षाचे कार्यकर्ते अजूनही प्रचंड दुखावलेले आहेत, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे.

गेल्या महिन्यात जाहीर झालेल्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या निकालात विजय यांच्या टीव्हीके पक्षाने चमकदार कामगिरी करत १०८ जागा जिंकल्या, ज्यामुळे डीएमकेला आपली सत्ता गमवावी लागली.



यानंतर काँग्रेसने सर्वात आधी टीव्हीकेला पाठिंबा देण्याची घोषणा केली.

त्यानंतर डाव्या पक्षांसह इतर छोट्या पक्षांनी आणि एआयएडीएमकेच्या आमदारांनीही विजय यांच्या बाजूने मतदान केले. काँग्रेस हा दीर्घकाळापासून डीएमकेचा मित्रपक्ष राहिला आहे, अगदी राहुल गांधी डीएमके प्रमुख एम. के. स्टॅलिन यांना आपला भाऊ मानत असत. तमिळनाडूची निवडणूकही काँग्रेस आणि डीएमकेने एकत्र मिळून लढवली होती, मात्र निकालानंतर काँग्रेसने टीव्हीकेसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने द्रमुकला मोठा धक्का मानला गेला.

दैनिक महाभूमि
शुक्रवार । ५ जून २०२६



संपन्न महाराष्ट्रासाठी बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

# पायाभूत सुविधांचे निर्मिती प्रकल्प गतीने पूर्ण करावेत

**मुंबई / वृत्तसंस्था**



महाराष्ट्राच्या संपन्नतेसाठी पायाभूत सुविधांच्या निर्मिती प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होणे गरजेचे आहे. संबंधित यंत्रणांनी प्रकल्प पूर्णत्वातील अडचणी दूर कराव्यात. कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कालावधीत प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे याकडे संबंधित यंत्रणांनी लक्ष द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विलंबाने काम पूर्ण करणाऱ्या कंत्राटदारांना पुढील कुठलेही नवीन काम संबंधित यंत्रणेने देऊ नये, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित पायाभूत सुविधा मुख्यमंत्री वॉर रूम बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस प्रकल्पांचा आढावा घेताना बोलत होते.

कुठल्याही परिस्थितीत पायाभूत सुविधांचे प्रकल्प हा तीन ते साडेतीन वर्षांमध्ये पूर्ण झाला पाहिजे, असे निर्देश देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, निविदा प्रक्रिया राबवताना त्यामध्ये कंत्राटदाराने मागील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लावलेल्या कालावधीच्या निकषाचाही समावेश असावा. कंत्राटदारांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विलंब केल्यास देशाचे व पर्यायाने राज्याचे नुकसान होते. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये होणारा विलंब खपवून घेतला जाणार नाही. प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये अनेक अडचणी असतात. मात्र यंत्रणांनी अडचणींवर मात करीत पुढे वाटचाल केली पाहिजे.

धारावी झोपडपट्टी पुनर्विकास आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले की, धारावी मधील उद्योजकांना स्टेट जीएसटी'मधून सवलत मिळण्याबाबत कार्यवाही करावी. यामुळे धारावीमधील उद्योगांना बळ मिळेल. तेथील 'इन्फॉर्मल इकॉनोमी' ही 'फॉर्मल' होईल. धारावी पुनर्विकाससंदर्भात निविदा प्रक्रियेत असलेल्या विषयांबाबत पुन्हा मंत्रिमंडळासमोर येण्याची आवश्यकता नाही, याबाबत यंत्रणेने संबंधित विभागांशी चर्चा करून समन्वयाने मुद्दे सोडवावेत. ना.म जोशी मार्ग, नायगाव, वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करताना तेथील रहिवाशांना भाडे देऊन सध्या राहत असलेली घरे विनाविलंब ताब्यात घेत तिथे पुनर्विकास सुरू करावा.

**महानगरपालिका व पाणीपुरवठा विभागाने समन्वयाने काम करावे**

मुळा व मुठा नदी पुनरुज्जीवन प्रकल्पासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी. पुण्यामध्ये मेट्रोचे जाळे विस्तारात आहे. यासाठी एकीकृत तिकीट व्यवस्था असावी. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व पाणीपुरवठा विभागाने समन्वयाने काम करावे. यामधील अडचणी दूर करत छत्रपती संभाजीनगर वासियांना मुबलक पाणीपुरवठा करावा, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

## कोकणात शेवटच्या दिवशी ठाकरे गटाच्या उमेदवाराची माघार

**मुंबई / वृत्तसंस्था**



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांच्या विधान परिषद निवडणुकीत अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी कोकण विभागात मोठी राजकीय घडामोड घडली. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेंद्र उर्फ बाळ माने यांनी अचानक उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने संपूर्ण निवडणुकीचे चित्र बदलले आहे. विशेष म्हणजे अर्ज मागे घेण्यापूर्वी बाळ माने हे भाजपचे मंत्री नितेश राणे यांच्यासोबत रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले होते. या वेळी त्यांनी संख्याबळ नसल्याने आपण माघार घेत असल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले.

या घडामोडीनंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले असून कोकणातील विधान परिषद निवडणूक आता बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघात सुरुवातीपासूनच चुरशीची लढत अपेक्षित मानली जात होती. महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे अनिकेत तटकरे यांना उमेदवारी देण्यात आली होती, तर महाविकास आघाडी कडून शिवसेना ठाकरे गटाने बाळ माने यांना रिंगणात उतरवले होते. दोन्ही बाजूंनी मतदारांशी संपर्क आणि निवडणुकीची तयारी सुरू होती. त्यामुळे या मतदारसंघात थेट सामना रंगेल, असे चित्र होते. मात्र, अंतिम क्षणी बाळ माने यांच्या निर्णयामुळे ही निवडणूक प्रत्यक्ष मतदानापूर्वीच एकतर्फी झाली आहे.

## गावोगावी फिरुन बेकायदेशीर गर्भलिंग निदान करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश

**दौंड :** पुणे ग्रामीण पोलीस दलाच्या हद्दीतील यवत पोलीस स्टेशन अंतर्गत चालणाऱ्या एका मोठ्या आंतरजिल्हा बेकायदेशीर गर्भलिंग निदान रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. केवळ बारावी पास असलेला एक बोगस डॉक्टर पोर्टेबल सोनोग्राफी मशीन घेऊन गावोगावी जाऊन बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान करत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. या रॅकेटने गर्भलिंग निदानाबरोबरच मोठ्या प्रमाणावर गर्भपात देखील केल्याचे समोर येत आहे. याप्रकरणी मुख्य आरोपीसह त्याच्या साथीदार डॉक्टरांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून यात अनेक नामांकित डॉक्टरांचे धागेदोरे हाती लागले आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी आण्णासाहेब गिरी हा मुळात कोणताही वैद्यकीय पदवीधारक नसून केवळ बारावी पास आहे.

## फुगेवाडी दारूकांडातील आरोपीच्या घरावर महापालिकेचा हातोडा

**पिंपरी-चिंचवड / वृत्तसंस्था**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विषारी दारू दुर्घटनेतील मुख्य आरोपी गुरुमंगलसिंग विरक यांच्या अनधिकृत निवासस्थानावर पिंपरी-चिंचवड महापालिकेने मोठी कारवाई केली आहे. आरोपीच्या संजयनगर झोपडपट्टीतील अनधिकृत घराचे बांधकाम महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने हातोडा मारून जमीनदोस्त केले. या घराचा वापर अवैध दारूविक्रीसाठी केला जात असल्याच्या तक्रारीनंतर, प्रशासनाने हे बांधकाम बेकायदेशीर ठरवून जमीनदोस्त केले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे यांनी सांगितले की, या प्रकरणाबाबत, महानगर पालिकेच्या झोपडपट्टी आणि पुनर्वसन विभागाने एक निवेदन जारी केले आहे. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, सन २००० मध्ये महापालिकेने केलेल्या झोपडी सर्वेक्षणाच्या अधिकृत यादीत सिंग विरक यांचे नाव आढळलेले नाही. परिणामी, २ जून रोजी त्यांना २४ तासांची नोटीस बजावण्यात आली होती.

या नोटिशीत असे स्पष्ट करण्यात आले होते की, जर त्यांची झोपडी रीतसर अधिकृत असेल, तर त्यांनी त्याशी संबंधित आवश्यक कागदपत्रे सादर करावीत अन्यथा, जर ते बांधकाम अनधिकृत असेल, तर त्यांनी स्वतःहून ते पाडून टाकावे. नोटिशीत असा इशाराही देण्यात आला होता की, जर त्यांनी स्वतःहून हे बांधकाम हटवले नाही, तर महानगरपालिका दंडात्मक कारवाई करेल. त्यांनी दिलेल्या २४ तासांच्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे, महानगरपालिका आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली ही निष्कासनाची कारवाई केली आहे.

# उमेदवारी मागे घेण्यासाठी १५० कोटी खर्च

सत्ताधाऱ्यांवर संजय राऊत यांचा खळबळजनक आरोप

**मुंबई / वृत्तसंस्था**



राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या निवडणुकांचे जोरदार वारे वाहात आहे. एकूण १७ जागांसाठी विधान परिषदेची निवडणूक होत असून १८ जून रोजी या निवडणूक होत आहे. गुरुवारी या निवडणुकीसाठी अर्ज माघार घेण्याचा शेवटचा दिवस होता. यामध्ये महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा सर्वाधिक समावेश आहे. याचबाबत आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांनी विरोधकांचे अर्ज माघारी घेण्यासाठी तब्बल १५० कोटी खर्च केले असून एका उमेदवाराला माघार घेण्यासाठी २५ कोटी दिल्याचा खळबळजनक आरोप केला आहे.

संजय राऊत यांनी निवडणुकीत माघार घेतलेल्या उमेदवारांबाबत बोलताना म्हटले की, मला जी काही माहिती आहे, त्यानुसार पुणे, यवतमाळ या ठिकाणी उमेदवारी मागे घेण्यात आली आहे. मी आधीपासून सांगत होतो की आपल्याकडे संख्याबळ नाही. तरीही काही कार्यकर्त्यांनी पक्षाच्या आदेशाने निवडणुका बिनविरोध होऊ नये, यासाठी उमेदवारी अर्ज भरले. ते शेवटपर्यंत टीकायला हवे होते. मात्र, निवडणुका बिनविरोधच करायच्या या सरकार पक्षाच्या अट्टहासापायी अनेक मार्गांचा अवलंब झाला आणि त्यात मोठ्या प्रमाणात विरोधी पक्षाच्या उमेदवारांना विकत घेण्याचा प्रयत्न झाला आणि तो काही ठिकाणी यशस्वी झाला, असे राऊतांनी म्हटले.

तसेच, माझ्या माहितीप्रमाणे दिवसभरात निवडणुका बिनविरोध व्हाव्यात आणि समोरच्या मविआच्या किंवा अन्य उमेदवारांनी माघार घ्यावी, यासाठी गुरुवारी दिवसभरात किमान १५० कोटी रुपये खर्च करण्यात आले. प्रमुख उमेदवारांनी माघार घ्यावी, यासाठी किमान २५ कोटी रुपये देण्यात आले आहेत. बुधवारी मुंबईतील सॉफिटेल जे बीकेसीतील हॉटेल आहे, तिथे व्यवहार झाला. त्यानंतर कोकणातून माघार घेण्यात आली. संभाजीनगरमध्ये आमच्या उमेदवाराने माघार घेतली. तिथेही धारण त्याच पद्धतीने व्यवहार झाले, असे गंभीर आरोप राऊतांनी केले आहेत.

## 'राष्ट्रवादी शरद पवार गटाने विश्वासघात केला'

**पुणे / वृत्तसंस्था**



पुण्यातील विधानपरिषद निवडणुकीतून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने उमेदवार श्रीकांत पाटील यांनी ऐनवेळी माघार घेतल्याने, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विक्रम काकडे यांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग आता मोकळा झाला आहे. यावर काही महिन्यांपूर्वीच राष्ट्रवादीतून काँग्रेसमध्ये दाखल झालेले काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपात काँग्रेसने ही जागा स्वतः न लढवता राष्ट्रवादीवर विश्वास ठेवून त्यांना सोडली होती. मात्र आता त्यांच्या उमेदवाराने अचानक माघार घेतल्यामुळे हा आमचा मोठा विश्वासघात असल्याची टीका जगताप यांनी केली आहे.

प्रशांत जगताप म्हणाले, पुणे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये एकूणच जे काही विरोधक आहेत, त्यांची भाजप किंवा महायुती सरकारच्या विरोधात लढण्याची तयारी होती. इथे आमच्या काँग्रेस पक्षाचा आकडा हा सगळ्यात मोठा होता. काँग्रेस पक्षाने या जागेवर दावा केला होता. प्रांताध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ यांच्यासोबत सुद्धा या संदर्भात आमची चर्चा झाली होती. पण राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाने पुण्याच्या जागेवर दावा केला आणि महाराष्ट्रातल्या १७ जागेमध्ये फक्त आम्हाला दोनच जागा द्या, पुणे आणि साताऱ्याची अशा प्रकारे मागणी केल्यामुळे, काँग्रेस पक्षाने या ठिकाणी मोठ्या मनाने ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाला सोडली, असे जगताप यांनी सांगितले.




### राशीभविष्य

- **मेष :** व्यवसायात नव्या संधी लाभतील. आर्थिक उत्कर्ष होईल. नव्या विचारांना चालना मिळू शकेल.
- **वृषभ :** अडचणींवर मात करता येईल. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन :** कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. विद्यार्थ्यांच्या प्रगतीला वाव मिळेल. प्रकृतीस त्रास संभवतो.
- **कर्क :** कायदेशीर बाबतीत काळजी घ्या. महत्त्वाचे करार लांबणीवर टाकावे. कर्ज प्रकरणं मार्गी लागतील.
- **सिंह :** भागीदारी व्यवसायात बदल संभवतो. आप्तांच्या भेटीगाठी होतील. कामाचा उत्साह वाढता राहील.
- **कन्या :** अपेक्षित वार्ता कानी येईल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. प्रेम प्रकरणात मतभेद टाळावेत.
- **तूळ :** वाढत्या खर्चाला आवर घालावा. आवडीच्या छंदांमध्ये रमाल. धार्मिक कार्याचं समाधान मिळेल.
- **वृश्चिक :** कौटुंबिक पातळीवर ताण राहील. कुलदेवतेची उपासना करावी. नवी कामं हाती घेता येतील.
- **धनु :** दिलासादायक घटना घडतील. कर्तव्य त कसूर होऊ देऊ नका. विवाहाच्या प्रयत्नात यश येईल.
- **मकर :** वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. स्थावर प्रश्नात तडजोड होईल. गृहसजावटीला चालना मिळेल.
- **कुंभ :** महत्त्वाच्या घडामोडी घडतील. मनातील योजना आकारास येतील. विद्यार्थ्यांना अडचणी संभवतात.
- **मीन :** कोणावर अतिविश्वास हितावह ठरणार नाही. विचारानं रहावं. जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील.

### ५ जून — दिनविशेष

- **१९८७ :** सुप्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ ग.ह.खरे यांचे निधन.
- **२०१३ :** गुजरातमधील लोकसभेच्या आणि विधानसभेच्या जागांसाठीच्या पोटनिवडणुकीत सर्व जागांवर भाजपने विजय मिळवला.
- **२०१७ :** 'इस्रो'ने तयार केलेल्या जीएसएलव्ही एमके–३ या सर्वात मोठ्या प्रक्षेपकाचे यशस्वी प्रक्षेपण.
- **२०१८ :** आवाक्याबाहेर गेलेल्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने द्वैमासिक पतधोरणात पाव टक्क्याने रेपोदर वाढवला.

### आरोग्यमंत्र — पांढ्याशुभ्र दातांसाठी...

प्रत्येकालाच पांढरेशुभ्र, मोत्यासारखे दात हवे असतात. मात्र आहारातील काही खाद्यघटक तसंच चुकीच्या सवयींमुळे दातांच्या नैसर्गिक रंगावर दुष्परिणाम होतो. या पदार्थांमुळे तोंडातली पीएचची पातळी बिघडते आणि दातांवर डाग पडू लागतात. म्हणूनच यासंबंधी सविस्तर माहिती घ्यायला हवी.



* तोंड आणि दातांशी संबंधित विकारांमुळे आणि त्यावरच्या उपचारांमुळे दातांचा रंग उडू शकतो. गरोदर स्त्रीला जंतूसंसर्गाची लागण झाली तर होणाऱ्या बाळाच्या दातांच्या रंगावर दुष्परिणाम होऊ शकतो. रेडिएशन, केमोसारख्या उपचारांमुळेही दातांच्या रंगावर परिणाम होतो. * दातांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवायचा असेल तर खाल्ल्यानंतर चूळ भरायला हवी. पोकळ्यांमध्ये अन्नकण साठल्यास दात पिवळे पडतात, त्यांची झीज होते. * फ्लोराइडचं प्रमाण जास्त असलेली टूथपेस्ट किंवा अशा पाण्याचा वापर केल्याने दातांचा पांढरा रंग फिका होऊ लागतो. त्याचबरोबर फ्लोरोसिस नावाच्या विकाराची शक्यता बळावते. या विकारामुळे दात पिवळट करडे दिसू लागतात. त्यांची झीज होते. दातांवर पांढरट डाग पडतात. * औषधांमुळेही दातांवर परिणाम होतो. बेनेड्रिल, प्रतिजैविकं आणि उच्च रक्तदाबावरच्या साध्या औषधांमुळे दात पिवळे पडतात. आयर्न सिरप आणि माउथवॉशमध्ये असणाऱ्या घातक रसायनांमुळेही दातांवर डाग पडतात.

### सफर देशांची — श्रीमंती थाटाचा लक्झम्बर्ग

लक्झंम्बर्ग हा युरोपातला छोटासा देश आहे. बेल्जियम, जर्मनी आणि फ्रान्स हे लक्झम्बर्गचे शेजारी. ९९९ चौरस मैल एवढाच त्याचा आकार आहे. चारही बाजूंनी जमिनीने वेढलेल्या या देशात घनदाट जंगलं, टेकड्या आणि कमी उंचीच्या पर्वतरांगा आहेत. देशाच्या उत्तर भागातली जमीन फार सुपीक नाही. मात्र दक्षिणेकडचा भाग 'सुजलाम सुफलाम' आहे. याच भागातून बऱ्याच नद्याही वाहतात. 'हौटे श्युअर' हा या देशातला सर्वात मोठा तलाव. इथे उन्हाळा फार कडक नसतो आणि थंडीही बोचरी नसते. लक्झंम्बर्गच्या डोंगराळ भागात हरणं, जंगली डुक्करं आणि लहान आकाराचे प्राणी आढळतात. या देशात बरेच स्थलांतरित पक्षी येतात. या देशात काही दुर्मीळ समुद्री प्राणी पहायला मिळतात. बटाटे, ओट्स, बार्ली आणि गहू ही या देशातली प्रमुख पीकं. दुग्धोत्पादनातही हा देश आघाडीवर आहे. आकाराने छोटा असणारा हा देश खूप श्रीमंत आहे. युरोपातल्या इतर देशांच्या तुलनेत इथे खूप कमी बेरोजगारी आहे. लक्झम्बर्ग मधले लोक जर्मन, फ्रेंच आणि लक्झम्बर्गिश अशा तीन भाषा बोलतात. युरो हे इथलं चलन आहे. इथल्या लोकांचं जीवनमानही खूप चांगलं आहे.

### स्टाईल स्टेटमेंट — कमाल व्हाइट जीन्सची

सर्वसाधारणपणे ब्लू जीन्सलाच पसंती दिली जाते. मात्र तुम्ही व्हाइट जीन्सही कॅरी करू शकता. या रंगातही तुम्हाला भरपूर व्हरायटी बघायला मिळते. तुमच्या आवडीनुसार नॉर्मल बॉटम, बॉयफ्रेंड फिट, स्कीनी, अँकल लेंग्थ यापैकी कोणत्याही प्रकारची जीन्स तुम्ही निवडू शकता. व्हाइट जीन्सवर तुम्ही कोणत्याही रंगाचा टॉप घालू शकता. वेगवेगळ्या प्रिंट्सचं कॉम्बिनेशन करता येईल. व्हाईट जीन्स घालण्याचं तंत्र तुम्हाला जमायला हवं. ही जीन्स योग्य पद्धतीने कॅरी केली तर खूपच स्टायलिश दिसते. सकाळी स्कीनी व्हाइट जीन्सवर पांढरा किंवा पेस्टल रंगाचा टॉप घालता येईल. संध्याकाळी गडद रंगाचे टॉप कॅरी करा. व्हाइट जीन्सवर ऑफ शोल्डर टॉप्स शोभून दिसतील. अशा टॉप्समुळे पेहरावाचं संतुलन साधलं जातं आणि तुमचा बांधाही छान दिसतो. पांढऱ्या जीन्सवर त्याच रंगाचा टॉप घालणार असाल तर त्यासोबत निऑन रंगांच्या ॲक्सेसरीज कॅरी करा. स्नीकर्स, डँगलर्स, क्लच यापैकी काहीही चालून जाईल. व्हाइट डेनिमचे मिनी स्कर्टही उठून दिसतात. हा प्रकार सध्या ट्रेंडमध्ये आहेत. त्यामुळे जीन्स आणि स्कर्ट यापैकी कोणत्याही पर्यायाची निवड तुम्ही करू शकता.

### पंचांग

**शुक्रवार, ५ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ कृ. ५, चंद्रराशी : मकर,
नक्षत्र : श्रवण, योग : ब्रह्मा,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.१२

### फॉरवर्ड्स

**किस पिंजरे में क़ैद क़र दिया हैं**
**इस बेदर्द ज़माने ने...**

**वो ज़ो दिल क़े मयख़ाने में क़भी**
**आज़ाद साक़ी था...!**

### फॅशन पॅशन

मुलांचं फॅशनविश्व पूर्णपणे बदलून गेलं आहे. पारंपरिक चेक्स, स्ट्राईप्सची जागा आता हटके प्रिंट्सनी घेतली आहे. टी शर्टसमध्येही प्रचंड व्हरायटी पहायला मिळते. रंगांमध्ये प्रयोग करायलाही मुलं कचरत नाहीत. वर्क कल्चर आता बरंच बदललं आहे. कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये कामासोबतच फॅशनला महत्त्व असतं. वीकेंडला कॅज्युअल्स कॅरी करता येतात. टेक्नॉलॉजीमुळे बरेच जण प्रवासातही काम करतात. त्यामुळे तेच ते टिपकल कपडे खरेदी करण्याची गरज उरलेली नाही. सध्या मुलांच्या फॅशनविश्वात काही रंगांची चलती आहे.

(क्रमश:)

### करिअरवाटा — स्वत:तील गुणवत्ता ओळखा

बदलत्या काळात गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची गरज वाढते आहे. उद्योग क्षेत्रातील मनुष्य बळाचं व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणांना सातत्यानं उत्तम गुणवत्ता असणाऱ्या उमेदवारांचा शोध घ्यावा लागतो. मात्र आता भारतातल्या उद्योगांसमोरचा कुशल मनुष्यबळाचा प्रश्न काहीसा सुटत आला आहे. शिक्षणाच्या व्यापक प्रचारामुळे हा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. अर्थात असं असलं तरी देशातील उद्योगक्षेत्राकडून गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची मागणी वेळेत पूर्ण होते का, हा विचारात घेण्याजोगा मुद्दा आहे.



भारतातील उद्योगक्षेत्र सतत गुणवत्तेच्या शोधात राहील, असं एक अहवाल म्हणतो. कारण गुणवत्ता ही जन्मजात असते. ती शिकवून साध्य होत नाही. त्यामुळे हा प्रश्नही सदोदित निर्माण होणार आहे. दुसरं म्हणजे भारतातल्या गुणवत्तेचा प्रश्न वेगळा आहे. भारतातली गुणवत्ता लपलेली आहे. अनेक गुणवान विद्यार्थ्यांना स्वत:च्या गुणवत्तेची जाणीवदेखील नाही. अशा विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकसित करणं गरजेचं ठरतं. या पार्श्वभूमीवर देशातील तरुणाईनेदेखील स्वत:मधील गुणवत्तेचा शोध घेण्याची गरज तज्ज्ञ व्यक्त करतात. हे साधलं तर तरुणाई स्वप्रगतीबरोबरच देशाच्या विकासास खंबीर आधार पुरवू शकेल यात शंका नाही.

### खेचाखेची — चाईल्ड सायकॉलॉजी

पुणेरी हॉटेल मधील एक पाटी **'आमच्याकडे बालकामगार काम करत नाहीत.'**
पाटी वाचून पुणेरी काकू दुकानदाराला म्हणाल्या, मी बोलून बघू का एकदा मुलांशी? माझं ऐकतील कदाचित आणि करतील काम!
.
.
.
मी चाईल्डसायकॉलॉजीमध्ये एमए–आहे.

### वेगळं काही

जर्मनीत ५ देशांच्या कलाकारांनी १७.६६ मीटर म्हणजेच ५७.९४ फूट उंच वाळूचा महाल तयार केला आहे. हा जागतिक विक्रम असून गिनिज बुकमध्ये त्याची नोंद करण्यात आली आहे. या कलाकारांचं नेतृत्त्व थोमास फान डेन डुंगेन यांनी केलं. नेदरलँड्स, हंगेरी, रशिया, लात्विया आणि पोलंड या देशांचे कलाकार या उपक्रमात सहभागी झाले होते. याआधी १६.६८ मीटर उंच वाळूचा महाल तयार करण्यात आला होता. जर्मनीतल्याच डुइसबर्गमध्ये हा महाल बनवण्यात आला होता. हा महाल बनवण्यासाठी ११ टन वाळूचा वापर करण्यात आला. हे बांधकाम करायला साधारण महिन्याभराचा वेळ लागला. पर्यटक नोव्हेंबरपर्यंत वाळूचा हा महाल बघू शकतात.

### फॅशन पॅशन — त्वचा घेईल मोकळा श्वास

पेहराव कितीही चांगला असला तरी त्याचं फिटिंग अंतर्वस्त्राच्या फिटिंगवर अवलंबून असतं. त्यामुळेच अंतर्वस्त्र दर्जेदार असावी. ही खरेदी करताना आपली त्वचा नेमकी कशी आहे याचाही विचार व्हावा. उदाहरणार्थ त्वचा संवेदनशील असेल आणि ब्रा च्या स्ट्रीप्स घट्ट असतील तर जखमा होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी काही उपाय योजता येतील.



* रात्री झोपण्यापूर्वी ब्रा काढून ठेवावी. यामुळे दिवसभर बंदिस्त असणाऱ्या त्वचेला श्वास घेता येईल. * स्ट्रीप्सच्या त्रासापासून वाचण्यासाठी पेट्रोलियम जेली हा सर्वोत्तम पर्याय आहे. ब्रा चं इलॅस्टिक किंवा स्ट्रीप्स काचत असलेल्या ठिकाणी पेट्रोलियम जेली लावावी. यामुळे त्वचा मुलायम बनते. स्ट्रीप्सचे व्रणही रहात नाहीत. * घामामुळे स्ट्रीप्सच्या ठिकाणी काळे डाग पडण्याची शक्यता असते. हे डाग घालवण्यासाठी स्क्रबिंग करता येईल. आठवड्यातून एकदा हा उपाय करावा* हातावर, चेहऱ्यावर मॉईश्चरायजर लावतात त्याप्रमाणे स्ट्रीप्स एरियावरही लावावं. लावताना थोडा मसाज केल्याने रक्तसंचार सुधारतो आणि व्रणांचं प्रमाण कमी होण्यास मदत होते.

दैनिक महाभूमि

शुक्रवार । ५ जून २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

# बुलढाणा भूमि

**सोने-चांदी**

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) १५५८३६
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) १५६०५०
चांदी (प्रति किलो) २७४९००

**दखल...**

**हे वागणं बरं नव्हं!**

क्षणिक मोहापायी भौ
आयुष्याची होते धुळधान
व्यसनी व व्यभिचारींनी
वेळीच व्हावे सावधान..!

मरमर करता मुलखाची
तुम्ही कमवताही भरपूर
अनाठायी उधळपट्टीमुळे
कुटूंबात रहाते हुरहूर..!

अस्वस्थ मनाचे हुंदके
एकु येत नाही तुम्हाला
म्हणून तिरस्काराची भावना
कुटूंबात लागते वाढीला..!

**प्रा. अशोक सारडा, मेहकर.**
**(९४२१३९४३३९)**

**न्यूज ब्रीफ**

### अंत्री खेडेकर येथील युवक बेपत्ता

**अंढेरा :** अंत्री खेडेकर येथील २३ वर्षीय युवक गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून याप्रकरणी अंढेरा पोलीस ठाण्यात हरविल्याची नोंद करण्यात आली आहे. अंत्री खेडेकर येथील खंडू अंबादास आव्हाड हा युवक २ जून रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास आपल्या घरासमोर गावातील चतुर एकनाथ आव्हाड यांच्यासोबत गप्पा मारत बसला होता. काही वेळानंतर चतुर आव्हाड हे त्यांच्या घरी निघून गेले. मात्र त्यानंतर खंडू आव्हाड हा परतलाच नाही. सायंकाळपर्यंत युवक घरी न आल्याने त्याच्या कुटुंबीयांनी नातेवाईक, मित्रपरिवार तसेच परिसरात शोधाशोध सुरू केली. मात्र सर्वत्र चौकशी करूनही त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही.

### हातभट्टी दारूविरोधात विविध ठिकाणी कारवाई

**बुलढाणा :** जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारू तसेच देशी-विदेशी दारूची बेकायदेशीर विक्री आणि साठा करणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने धडक मोहीम राबवत विविध ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत हातभट्टी दारू, मोहसडवा व देशी-विदेशी दारूसह एकूण ३१ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सात आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या आदेशानुसार आणि अपर पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्ह्यात अवैध दारू व्यवसायाविरोधात सक्रिय झाले आहे. १ जून रोजी मेहकर, अंढेरा, बुलढाणा शहर व नांदुरा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाचवेळी कारवाया करण्यात आल्या.

## जिल्हा बँकिंग क्षेत्राची ऐतिहासिक कामगिरी..

# ११.१८६ कोटींच्या वार्षिक ऋण आराखड्याला मंजुरी

**बुलढाणा/प्रतिनिधी**




जिल्ह्याच्या आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या जिल्हास्तरीय समन्वय समिती व जिल्हास्तरीय पुनरावलोकन समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत २०२५-२६ या आर्थिक वर्षातील वार्षिक ऋण आराखड्याच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ११ हजार १८६ कोटी रुपयांच्या वार्षिक ऋण आराखड्याला मंजुरी देण्यात आली.

लीड बँक म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडियाने सादर केलेल्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये जिल्ह्यातील बँकांनी निर्धारित उद्दिष्टांच्या तुलनेत उल्लेखनीय कामगिरी केली. कृषी मुदत कर्ज योजनेंतर्गत १ हजार ७०० कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत सुमारे २ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १४५ टक्के कामगिरी नोंदविण्यात आली. एमएसएमई क्षेत्रात १ हजार ९०० कोटींच्या उद्दिष्टाविरुद्ध २ हजार २९४ कोटी रुपयांचे वितरण होऊन १२१ टक्के यश मिळाले. इतर प्राधान्य क्षेत्रात ३०० कोटींच्या लक्ष्याच्या तुलनेत ४७६ कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १५९ टक्के कामगिरी करण्यात आली. एकूण प्राधान्य क्षेत्रात ५ हजार ९०० कोटींच्या उद्दिष्टाविरुद्ध ६ हजार १८० कोटी रुपयांचे कर्जवाटप होऊन १०५ टक्के लक्ष्य साध्य झाले. बिगर प्राधान्य क्षेत्रात ४ हजार २०० कोटींच्या तुलनेत ५ हजार १०० कोटी रुपयांचे कर्जवाटप करून १२० टक्के कामगिरी नोंदविण्यात आली. शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतही जिल्ह्याने उल्लेखनीय यश मिळिवले. महिला स्वयंसहाय्यता समूह कर्जजोडणी योजनेत १५४ कोटी रुपयांच्या उद्दिष्टाविरुद्ध २७२ कोटी रुपयांचा व्यवसाय करत १७६ टक्के यश मिळिवण्यात आले. अटल पेन्शन योजनेत १८ हजार ८०५ नोंदणीच्या उद्दिष्टाच्या तुलनेत १९ हजार ७५६ नागरिकांना जोडून १०५ टक्के लक्ष्य पूर्ण करण्यात आले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत ७८० पैकी सर्व ७८० अर्ज मंजूर करून शंभर टक्के यश मिळिवण्यात आले. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातही जिल्ह्याने शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण केले. बैठकीत आर्थिक वर्ष २०२६-२७ साठीच्या वार्षिक ऋण आराखड्याला मंजुरी देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी आगामी आर्थिक वर्षातील उद्दिष्टे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. जिल्ह्याच्या सर्वांगीण आर्थिक व सामाजिक विकासासाठी कृषी, एमएसएमई क्षेत्र, स्वयंरोजगार आणि महिला बचत गटांना प्राधान्य देत विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

**विविध क्षेत्रासाठी असे आहे उद्दिष्ट**

या आराखडयात पीक कर्जासाठी ९३० कोटी रुपये, कृषी मुदत कर्जासाठी २ हजार ४८२ कोटी रुपये, एकूण कृषी क्षेत्रासाठी ३ हजार ४१२ कोटी रुपये, एमएसएमई क्षेत्रासाठी २ हजार २९४ कोटी रुपये, इतर प्राधान्य क्षेत्रासाठी ४७८ कोटी रुपये आणि एकूण प्राधान्य क्षेत्रासाठी ६ हजार १८४ कोटी रुपयांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. बिगर प्राधान्य क्षेत्रासाठी ५ हजार ००२ कोटी रुपये राखीव ठेवण्यात आले असून एकूण वार्षिक ऋण आराखडा ११ हजार १८६ कोटी रुपयांचा आहे.

## 'किडनी घ्या, पण, सरसकट कर्जमाफी द्या !'



**मोताळा/प्रतिनिधी**

राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील अटी-शर्तींविरोधात मोताळा तालुक्यातील युवा शेतकरी शुभम घोंगटे यांनी बुधवारी अनोख्या पद्धतीने संताप व्यक्त करत 'माझी किडनी घ्या, पण शेतकऱ्यांचे कर्ज सरसकट माफ करा' अशी भावनिक मागणी करत अर्धनग्र अवस्थेत स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहित अभिनव आंदोलन केले.

कर्जमाफीच्या निर्णयात मोठ्या प्रमाणात अटी आणि निकष लादल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. २०१९ मधील महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत पात्र ठरलेल्या अनेक शेतकऱ्यांना नव्या निर्णयात प्रत्यक्ष लाभ मिळण्यास अडथळे निर्माण झाल्याचे सांगत शासनाने शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरल्याची टीका करण्यात आली. आंदोलनादरम्यान शुभम घोंगटे व अमोल देशमुख यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. 'शेतीतून उत्पन्न मिळत नाही, उत्पादन खर्च दिवसेंदिवस वाढत आहे, कर्जाचा डोंगर वाढत आहे आणि सरकारच्या योजना केवळ घोषणांपुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत,' अशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांच्या वेदना अधोरेखित करण्यासाठी 'माझ्या किडन्या विकून कर्ज फेडा' अशी प्रतीकात्मक मागणीही त्यांनी केली. शेतकरी सध्या बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, डिझेल आणि मजुरीच्या वाढत्या खर्चाने त्रस्त आहे. दुसरीकडे शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे. ग्रामीण भागातील हजारो कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या मनातील अस्वस्थतेचा हा आवाज असल्याचे त्यांनी सांगितले.

## सैन्यदलात निवड झालेल्या युवकांचा सत्कार

**अंढेरा/प्रतिनिधी**



भारतीय सैन्य दलासाठी निवड झालेल्या दोन युवकांसह सीबीएसई दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळिवलेल्या विद्यार्थ्याचा देऊळगाव मही येथे सत्कार करण्यात आला.

देऊळगाव मही येथील प्रभाग क्रमांक ६ मधील देवानंद शिवाजी देढे आणि योगेश भगवान देढे हे दोन तरुण भारतीय सैन्य दलात भरती होऊन देशसेवेसाठी सज्ज झाले आहेत. अत्यंत साध्या व गरीब कुटुंबातून आलेल्या या दोन्ही युवकांनी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय सैन्यात स्थान मिळिवल्याने देऊळगाव मही गावाची मान उंचावली आहे. याचबरोबर डीआरबी इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी गौरव विष्णू टेकाळे याने सीबीएसई दहावी परीक्षेत द्वितीय क्रमांक प्राप्त करून शैक्षणिक क्षेत्रात गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांचा गौरव करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य संदीप विजय राऊत यांच्या पुढाकाराने त्यांच्या निवासस्थानी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी देऊळगाव महीचे माजी सरपंच रामादादा म्हस्के, माजी सरपंच अनंतमामा इंगळे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन तिन्ही गुणवंतांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास खडकपूर्णा अर्बनचे व्यवस्थापक जनार्दन टेकाळे, शिवाजी शिंगणे, विजय राऊत, गणेश बनसोडे, श्रीकांत इंगळे, कारभारी देढे, शिवाजी देढे, गणेश गोरे यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## कारवाईच्या आश्वासनानंतर चित्ते यांच्या उपोषणाची सांगता

**देऊळगाव राजा/प्रतिनिधी**




खडकपूर्णा नदीतील लिलाव झालेल्या रेती घाटांमधून होत असलेल्या अवैध रेती उत्खननाविरोधात तसेच आंदोलनकर्त्यांवर झालेल्या प्रतिबंधात्मक कारवाईच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते अनिल चित्ते यांनी तहसील कार्यालयासमोर सुरू केलेल्या उपोषणाला यश मिळाले आहे. प्रशासनाकडून अवैध रेती उपसा करणाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर या उपोषणाची सांगता करण्यात आली.

खडकपूर्णा नदीतील रेती घाट सुरू झाल्यापासून मोठ्या प्रमाणावर यांत्रिक पद्धतीने रेती उपसा होत असल्याचा आरोप शेतकरी सातत्याने करीत आहेत. नदीपात्रातील रेती उपशामुळे भूजल पातळीवर परिणाम होत असून शेतीसाठी आवश्यक असलेले पाणी मुरणे कमी होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांची आहे. याविरोधात यापूर्वी अनेकदा उपोषणे, निवेदने व रस्ता रोको आंदोलने झाली होती. मात्र आंदोलन करणाऱ्या काही शेतकऱ्यांवरच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आल्याने संतापाची लाट उसळली होती. या पार्श्वभूमीवर अनिल चित्ते यांनी शेतकऱ्यांवरील कथित खोट्या कारवाया मागे घेणे, रेती घाटांवरील पोकलँड व जेसीबीद्वारे होणारा रेती उपसा तात्काळ बंद करणे, रेती उत्खननाचा संपूर्ण हिशेब जाहीर करणे, रेती धोरणाचे उल्लंघन करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करणे आदी मागण्यांसाठी १ जूनपासून उपोषण सुरू केले होते. उपोषणस्थळी तहसीलदारांनी भेट देऊन चर्चा केली. यावेळी किनगाव राजा पोलीस ठाण्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिबंधात्मक कारवाईच्या प्रस्तावांवर लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले. तसेच कोणत्याही रेती घाटावर जेसीबी किंवा पोकलँडद्वारे उत्खनन आढळल्यास शासनाच्या रेती धोरणानुसार संबंधित ठेकेदारांवर कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले. या आश्वासनानंतर या उपोषणाची सांगता करण्यात आली.

## लाखोंचा अपहार प्रकरणी आयएमएच्या दोन पदाधिकाऱ्यांवर गुन्हा

**बुलढाणा/प्रतिनिधी**

आयएमएच्या बुलढाणा शाखा अध्यक्ष व सदस्य नसताना सुध्दा स्वत: अध्यक्ष असल्याचे भासवून

अंसोसिएशनचे लेटरहेड व नोंदणी क्रमांकांचा बनावट दस्तऐवज तयार करून इतर दोघांच्या संगनमताने इंडीयन बँकेतून लाखो रुपयांची रक्कम परस्पर काढून अपहार केल्या प्रकरणी डॉ.अजित सिरसाठ व डॉ. गजेंद्र निकम यांच्या विरूध्द न्यायालयाच्या आदेशावरून बुलढाणा शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आयएमएच्या वतीने सदस्य सचिव डॉ जि. वाय. व्यवहारे व सहसचिव डॉ.जे.बी. राजपूत यांनी प्रकरणी शहर पोलीस स्टेशनला काही दिवसांपूर्वी तक्रार दिली होती. मात्र कुठलीच कारवाई न झाल्याने डॉ. व्यवहारे आणि डॉ. राजपूत यांनी न्यायालयात धाव घेतली होती. नुकताच बुलढाणा न्यायालयाने यावर निकाल दिला असून डॉ. शिरसाठ आणि डॉ. निकम यांच्या विरुद्ध न्यायालयाच्या निर्देशानुसार बीएनएस २०२३ च्या कलम ३१८, ३३५, ३३६, ३३८, ३४०, ६१, ३ (५) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनचे डॉ. अजित शिरसाठ व डॉ. निकम हे अध्यक्ष किंवा सदस्य नसतानाही डॉ. शिरसाठ व डॉ. निकम यांनी इतर दोघांच्या संगनमताने संस्थेचे बनावट सिक्के व कागदपत्रे तयार करून इंडियन बँकेत सादर करून व्यवहाराची परवानगी मागितली. इंडीयन बँकेचे शाखाधिकारी यांनी इंडियन मेडीकल असोसिएशनचे खाते हाताळणी व व्यवहाराची परवानगी दिली. डॉ.सिरसाठ यांनी शाखाधिकारी यांचेशी संगनमत करून इतर दोघांच्या सह्यांनिशी १५ मे २०२३ ते १५ सप्टेंबर २०२३ या काळात ५ लाख ७८ हजार ८९७ रुपये एव्हढी रक्कम काढून अपहार केला. तसेच या कालावधीमध्ये त्यांनी शहरातील डॉक्टरांकडून ७ लाख ६० हजार ३८ रुपये रकमेची डॉक्टरांना पावती दिलेली नाही असे तक्रारीत नमूद केले.

**आमच्याविरोधात खोटी तक्रार**

*तक्रार एक वर्षापूर्वी दाखल केलेली आहे. त्यावेळेसच चौकशी पूर्ण झाली होती. एकाही चेकवर माझी सही नही. एक रूपयाचाही व्यवहार माझ्या हातून झालेला नाही. १९९२ पासून संस्थेचा चेंज रिपोर्ट झालेला नाही. सदस्य रजीस्टर अपडेट झालेले नाही. आमच्याविरोधात खोटी तक्रार दाखल करण्यात आली आहे.* **- डॉ.अजीत सिरसाठ**

## राज्यस्तरीय गझल स्पर्धेचे बक्षीस वितरण; सिंधुदुर्गच्या प्रथमेश गुरव यांना प्रथम पुरस्कार

**बुलढाणा/प्रतिनिधी**



स्मृतीशेष रमेश सरकाटे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त राज्यभरातून नवोदित गझलकारांची गझल स्पर्धा आंबेडकरी साहित्य अकादमी मार्फत आयोजित करण्यात आली होती. त्याचा निकाल अकादमीच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. विजयालक्ष्मी वानखेडे यांनी बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी हॉल मध्ये आयोजित बक्षिस समारंभात १ जून रोजी संध्याकाळी घोषित केला. त्यामध्ये प्रथम पारितोषिक प्रथमेश गुरव, सिंधुदुर्ग, द्वितीय पारितोषिक अमेय तांदूळजे, जालना व तृतीय पारितोषिक गिरीश खोब्रागडे, यवतमाळ यांना प्राप्त झाले. तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक भाग्यलक्षी क्षीरसागर व शिवशंकर गोंड यांना मिळाले.

भीमगीत स्पर्धेचे प्रथम पारितोषिक रमा पवार, द्वितीय संतोषी झालटे, व तृतीय शैला हिवाळे यांना प्रदान करण्यात आले. तर उत्तेजनार्थ सुजाता लहाने, व सुनीता अवसरमोल यांना मिळाले. हा पारितोषिक वितरण सोहळा सुप्रसिद्ध गझलकार डॉ. गणेश गायकवाड यांचे हस्ते पार पडला. अध्यक्षस्थानी डॉ. प्रा. सदानंद देशमुख होते. तर, विचारपिठावर सुरेश साबळे, प्रा. डॉ. संतोष आंबेकर, शिवाजी जवरे, माधुरी सरकाटे, करुणा सरकाटे, लक्ष्मण घुमरे यांची उपस्थिती होती.

## दागिने चोरणाऱ्या महिलेस संभाजीनगर येथून अटक

**चिखली/प्रतिनिधी**

महिलांवर पाळत ठेवून त्यांच्या पर्स व पिशवीतून दागिने लांबवणाऱ्या एका सराईत चोरट्या महिलेला चिखली पोलिसांच्या डी.बी. पथकाने छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालय परिसरातून ताब्यात घेतले आहे. अटक करण्यात आलेल्या महिला आरोपीकडून चोरी गेलेला सोन्या-चांदीचे दागिणे जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

चिखली तालुक्यातील एक महिला ११ मे रोजी त्यांच्या वडिलांसह सोन्या-चांदीचे जुने दागिने मोडून नवीन दागिने करण्यासाठी चिखली येथे आल्या होत्या. त्यांनी जुने दागिने मोडून त्या बदल्यात १४ हजार ३७० रुपये किमतीचे ५१.४१ ग्रॅम वजनाचे चांदीचे तीन जोडवे आणि १७ हजार ५८० रुपये किमतीचे सुमारे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दोन डोरले व चार मणी, असा एकूण ३१,९५० रुपयांचा नवीन ऐवज खरेदी केला. हा ऐवज त्यांनी एका कापडी पिशवीत ठेवून ती पिशवी आपल्या जवळील वायरच्या पिशवीत ठेवली होती. दुपारच्या सुमारास फिर्यादी चिखली येथील एका दुकानात ग्लास खरेदी करत असताना, त्यांच्या पाठीमागे उभ्या असलेल्या एका अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयोगटातील अनोळखी महिलेने नजर चुकवून वायरच्या पिशवीतील दागिने चोरून नेले. याप्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास सुरू असतानाच, माहिती मिळाली की, सदर संशयित महिला जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यात असलेल्या चंदनापुरी येथील आहे. या माहितीच्या आधारे २ जून रोजी डी.बी. पथकाचे पोलीस नाईक अमोल गवई, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल सूर्यकला म्हस्के, पोलीस कॉन्स्टेबल अजय इटावा आणि प्रशांत धंदर यांचे पथक जालना व छत्रपती संभाजीनगर येथे खाना झाले. शोध सुरू असताना, सदर महिला छत्रपती संभाजीनगर येथील घाटी हॉस्पिटल परिसरात येणार असल्याची पक्की माहिती मिळाली. पोलिसांनी घाटी रुग्णालय परिसरात सापळा रचला.

तेथे एक महिला संशयास्पदरित्या फिरताना दिसताच पोलिसांनी तिला ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या महिलेने आपले नाव सुवर्णा काकासाहेब काळे रा. पाथर्डी रोड शेवगाव, जि. अहिल्यानगर, सध्या मुक्काम चंदनापुरी, ता. अंबड असे सांगितले. महिला अंमलदार आणि पंचांसमक्ष तिची अंगझडती घेतली असता, तिच्याकडे चोरी गेलेले सोन्याचे २ डोरले, ४ मणी आणि चांदीचे ३ जोडवे असा संपूर्ण मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी हा मुद्देमाल जप्त करून आरोपी महिलेला अटक केली आहे.

## धोंड्याच्या महिन्यात धारतीर्थावर उसळायची गर्दी..

# इतिहासजमा मात्र आठवणींमध्ये जिवंत दशहरा उत्सव

**किशोर मापारी**



**लोणार :** एकेकाळी धोंड्याच्या महिन्यात लोणार सरोवर परिसरातील धारतीर्थावर भाविकांची प्रचंड गर्दी उसळत असे. विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांतून हजारो भाविक धारतीर्थावर तीर्थस्नानासाठी येत असत. त्याचकाळात येथे भरत असलेला पारंपरिक दशहरा उत्सव धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मोठे आकर्षण ठरत होता. मात्र काळाच्या ओघात धारतीर्थावरील तीर्थस्नान बंद झाले आणि त्यासोबतच भाविकांची वदर्ळ कमी होत गेली. एकेकाळी गजबजलेला दशहरा उत्सव इतिहासजमा झाला असला तरी, लोणारकरांच्या आठवणीत आजही जिवंत आहे.

लोणार सरोवर हे जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेले पर्यटन आणि धार्मिक स्थळ आहे. सरोवर परिसरातील धारतीर्थाला विशेष धार्मिक महत्त्व होते. धोंड्याच्या महिन्यात येथे स्नान केल्याने पुण्यप्राप्ती होते, अशी भाविकांची श्रद्धा होती. त्यामुळे बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, यवतमाळ, जालना, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि इतर अनेक भागांतून भाविक मोठ्या संख्येने लोणारमध्ये दाखल होत असत. त्या काळात धारतीर्थ परिसरात धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, प्रवचन तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जात असे. गावातील व्यापारी, लहान-मोठे व्यावसायिक आणि हातगाडीधारक यांच्यासाठी हा काळ आर्थिक दृष्ट्याही महत्त्वाचा मानला जात होता. दशहरा उत्सवामुळे संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण होत असे. मात्र काही वर्षांपासून धारतीर्थावरील तीर्थस्नान बंद झाले. त्यामागे पर्यावरणीय, नैसर्गिक तसेच अन्य विविध कारणे असल्याचे सांगितले जाते.

तीर्थस्नान बंद झाल्यानंतर भाविकांची संख्या हळूहळू कमी होत गेली. त्याचा थेट परिणाम दशहरा उत्सवावर झाला. भाविकांची उपस्थिती कमी झाल्याने उत्सवाचे स्वरूप लहान होत गेले आणि अखेर हा दशहरा कालांतराने बंद पडला. आजही त्या काळाचा अनुभव घेतलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या आठवणींमध्ये धारतीर्थ आणि दशहरा उत्सव जिवंत आहे. या परंपरा केवळ धार्मिक नव्हत्या तर त्या लोणारच्या सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीचाही महत्त्वाचा भाग होत्या. त्यामुळे या ऐतिहासिक परंपरेचे जतन होणे गरजेचे असल्याची भावना अनेकांकडून व्यक्त होत आहे.

**दशहरा उत्सवाला पूर्ववैभव प्राप्त होईल का ?**

लोणार सरोवराला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळवून देण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू असताना, सरोवराशी निगडित धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करण्याकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे. धारतीर्थावरील तीर्थस्नान आणि दशहरा उत्सव पुन्हा पूर्ववैभव प्राप्त करेल का ? असा प्रश्न आजही अनेकांच्या मनात कायम आहे.

## निष्काळजीपणाचे बळी!

दिल्लीतील मालवीय नगर येथील हौझ राणी परिसरात बुधवारी लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू झाला. याप्रकरणात हॉटेलचा व्यवस्थापक जय मिश्रा, जो अद्याप फरार आहे, त्याला शोधून अटक करण्यासाठी पोलिसांनी पाच पथके तयार केली आहेत. या हॉटेलच्या छतावर जाण्याचा मार्ग बंद असल्याचे आणि अनेक खोल्यांमध्ये स्वयंपाकासाठी हीटर्सचा वापर केला जात असल्याचे आढळून आले आहे. तपास अधिकाऱ्यांनी इमारतीच्या नियमांचे कथित उल्लंघन, अग्निसुरक्षेतील त्रुटी, बेकायदेशीर बांधकाम आणि मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीसह सर्व बाबींची चौकशी करणे आवश्यक आहे. या आग्नीकांडामध्ये फायर ऑडीट झाले नसल्याचा ठपका संबंधित अधिकाऱ्यांनी ठेवला आहे. यात कुठेतरी बांधकाम विभागातही अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते. मोठ-मोठ्या इमारतीकडे आवश्यक बांधकाम परवानगी घेतली जात नसल्याने वारंवार अशा प्रकारच्या दुर्घटन घडत आहेत. या इमारतीला दिल्लीच्या पर्यटन विभागाकडून बेड आणि ब्रेकफास्ट योजनेंतर्गत केवळ सहा खोल्या चालविण्याची परवानगी होती. परंतु, मालकाने अंतर्गत बदल करून २४ खोल्या तयार केल्या होत्या. त्यामुळे या महत्त्वाच्या मुद्दयावरून अग्नीकांडातील दोषी स्पष्ट समोर येतात. पोलिसांनी हॉटेल मालक लवेकेश बजाज यांना अटक केली असून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधासह अनेक आरोपांखाली गुन्हा दाखल केला आहे. चौकशीदरम्यान, बजाज यांनी खुलासा केला की, त्यांनी हॉटेलचे संपूर्ण व्यवस्थापन मिश्रा यांच्याकडे सोपवले होते आणि सर्व संबंधित परवाने व्यवस्थापकाच्या नावावर घेतले होते. बजाज हे हॉटेलचे "खरे मालक" आहेत, परंतु 'बेड-अँड-ब्रेकफास्ट' धोरणांतर्गत परवाना जय मिश्रा यांच्या नावावर घेण्यात आला होता. जेव्हा पाच मजली अरुंद इमारतीत दाट धूर पसरला, तेव्हा छतावर जाण्याचा मार्ग बंद असल्यामुळे आत अडकलेल्या लोकांना बाहेर पडण्याचा एक महत्त्वाचा मार्ग शोधता आला नसावा. तपासात हॉटेलच्या कामकाजात मोठ्या प्रमाणावर कथित अनियमितता असल्याचेही उघड झाले आहे. खरेदीच्या वेळी इमारतीला अडीच मजले होते आणि बजाजने नंतर अतिरिक्त मजले जोडून ती जवळपास पाच मजली केली. बजाज परदेशात पळून गेला असावा, कारण त्याची दोन्ही मुले परदेशात स्थायिक झाली आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून त्याच्या आणि त्याच्या पत्नीविरुद्ध लुकआऊट सर्क्युलर जारी करण्यात आले. बजाज सुरुवातीला ग्राहकांना खोल्या भाड्याने देत असे आणि चहाचे दुकान चालवण्याचा परवाना मिळवला होता. कालांतराने, त्या इमारतीचे हॉटेलमध्ये रूपांतर केले आणि ते परवानगी असलेल्या क्षमतेपेक्षा खूप जास्त क्षमतेने कार्यरत होते. दरम्यान, जय मिश्रा यांना बजाजने २०२२ मध्ये कामावर ठेवले होते. ते हॉटेलचे दैनंदिन कामकाज, हिशेब आणि व्यवस्थापन सांभाळत होते. इमारतीकडे अनिवार्य अग्निसुरक्षा मंजुरी नव्हती, तर इमारतीची उंची इतकी जास्त होती की त्यासाठी दिल्ली अग्निशमन सेवेकडून ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता होती. इमारतीच्या तळमजल्यावर एक रेस्टॉरंट होते, तर तळघर आणि वरचे मजले निवासासाठी वापरले जात होते. इमारतीच्या खिडक्या सील केलेल्या होत्या, आत-बाहेर जाण्यासाठी फक्त एकच मार्ग होता आणि मुख्य दरवाजा सेन्सर-चलित होता, ज्यामुळे घटनेच्या वेळी हॉटेलमधून बाहेर पडणे कठीण झाले होते, या आरोपांचीही चौकशी होणे गरजेचे आहे. निष्काळजीपणामुळे लोकांचे जीवन किंवा सुरक्षितता धोक्यात आणल्याबद्दल या प्रकरणाची गंभीर चौकशी होणे गरजेचे आहे.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !

दिनविशेष
- प्रवीण टाके
उपसंचालक विभागीय कार्यालय,
कोल्हापूर. मो.-९७०२८५८७७७



पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे.

याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत. हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल ' घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे. मात्र झाडे लावणे व त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महतत्वाचे आहे.

आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# जागतिक पर्यावरण दिन: एक सजीव पृथ्वीची शपथ



॥ प्रासंगिक ॥
- प्रणित देशमुख
(गो.सी. टोम्पे महाविद्यालय चांदूरबाजार)



दरवर्षी ५ जून रोजी संपूर्ण जगभरात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटना आयोजित स्टॉकहोम परिषदेतून या दिवसाची सुरुवात झाली. पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती आणि कृती घडवून आणणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. आज हा दिवस जगभरातील लाखो लोकांना पृथ्वी वाचवण्यासाठी एकत्र आणणारे प्रभावी व्यासपीठ ठरला आहे. प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा २०२५-२६ मध्ये 'प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा' ही थीम अत्यंत महत्वाची आहे. प्लास्टिकमुळे केवळ पर्यावरणच नव्हे तर मानवी आरोग्यालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. समुद्र, नद्या, माती आणि अगदी हवेतही सूक्ष्म प्लास्टिकचे कण मिसळले आहेत. त्यामुळे जैवविविधता धोक्यात येत आहे आणि अन्नसाखळी दूषित होत आहे.

**वाढते तापमान:** एक गंभीर इशारा यावर्षी भारतात, विशेषतः महाराष्ट्र राज्यातील विदर्भ विभागात उष्णतेची तीव्र लाट अनुभवास आली. अमरावती, अकोला, नागपूर आणि वर्धा या शहरांमध्ये तापमान ४६ ते ४७ अंश सेल्सियसच्या पुढे गेले. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे कारण:अनेक नागरिकांना उष्माघात झाला. काही ठिकाणी मृत्यूंच्या घटना देखील नोंदल्या गेल्या. लहान मुले, वृद्ध आणि कामगार वर्ग सर्वाधिक प्रभावित झाले. रस्त्यावर काम करणारे, शेतकरी आणि मजूर यांना मोठा धोका निर्माण झाला. ही केवळ हवामानातील बदलाची लक्षणे नसून, हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ यांचे स्पष्ट परिणाम आहेत.

**उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या गंभीर समस्या :** वाढत्या तापमानामुळे अनेक प्रकारच्या समस्या उद्भवतात: आरोग्य समस्या: उष्माघात, निर्जलीकरण, थकवा, चक्कर येणे, पाणीटंचाई: जलस्त्रोत आटणे. शेतीचे नुकसान: पिके करपणे वीज टंचाई: एसी, कूलर वापरामुळे वीजेचा वाढता ताण नैसर्गिक आपत्ती: दुष्काळ, अनियमित पाऊस.

**वाढत्या उष्णतेच्या व पर्यावरणीय संकटापासून वाचण्यासाठी उपाय :** आज विदर्भसारख्या भागात ४६–४७°C तापमान, उष्माघाताच्या घटना आणि पाणीटंचाई यामुळे परिस्थिती गंभीर बनली आहे. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढ यांचा परिणाम आता थेट आपल्या दैनंदिन जीवनावर होत आहे. अशा परिस्थितीत केवळ सामान्य सूचना पुरेशा नाहीत तर सखोल, दीर्घकालीन आणि शिस्तबद्ध उपायांची गरज आहे. खाली दिलेले उपाय वैयक्तिक, सामाजिक आणि शासकीय स्तरावर प्रभावी ठरू शकतात.

**१. हरित क्षेत्र :** मोठ्या प्रमाणावर वाढवणे झाडे ही नैसर्गिक 'कूलिंग सिस्टम' आहेत. ती कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि परिसरातील तापमान २ - ५°C पर्यंत कमी करू शकतात. काय करावे ? प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान १- २ झाडे लावावी. शाळा, महाविद्यालये आणि संस्थांनी 'एक विद्यार्थी -एक झाड' अभियान राबवावे. रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये आणि शहरी भागात वृक्षारोपण करावेका महत्वाचे ? झाडे सावली देतात, आर्द्रता टिकवतात आणि उष्णतेचा थेट परिणाम कमी करतात. विदर्भासारख्या उष्ण भागात हे अत्यंत गरजेचे आहे.

**२. पाणी संवर्धन आणि व्यवस्थापन :** उष्णतेमुळे पाण्याची मागणी वाढते, परंतु जलस्रोत कमी होत आहेत. काय करावे? (पावसाचे पाणी साठवणे) प्रत्येक घरात व इमारतीत बंधनकारक करावे गळती होणारे नळ त्वरित दुरुस्त करावेत. शेतीमध्ये ठिबक सिंचनाचा वापर वाढवावाका महत्वाचे ? पाण्याचा योग्य वापर केल्यास दुष्काळ आणि पाणीटंचाई कमी करता येते, तसेच भविष्यासाठी जलसाठा निर्माण होतो.

**३. उष्णता कमी करणारी घरे आणि शहरे :** काय करावे ? घरांच्या छतांवर पांढरा किंवा हलका रंग लावावा. छतावर गार्डन तयार करावे. शहरी नियोजनात अधिक हिरवळीचे क्षेत्र ठेवावेका महत्त्वाचे ? यामुळे घरातील तापमान ३-४°C ने कमी होते आणि एसी / कूलरवर अवलंबित्व कमी होते.

**४. पर्यावरणपूरक वाहतूक प्रणाली :** काय करावे ? सायकल, पायी चालणे किंवा सार्वजनिक वाहतूक वापरावी कारपूलिंग वाढवावे इलेक्ट्रिक वाहनांचा वापर प्रोत्साहित करावा का महत्वाचे ? यामुळे कार्बन उत्सर्जन कमी होते आणि हवा प्रदूषणही घटते, ज्याचा थेट परिणाम तापमानावर होतो.

**५. उष्णतेपासून वैयक्तिक संरक्षण :** काय करावे ? दुपारी १२ ते ४ दरम्यान बाहेर जाणे टाळावे, हलके, सैल आणि सूती कपडे वापरावेत. भरपूर पाणी, ताक, लिंबूपाणी घ्यावे, डोक्यावर टोपी / स्कार्फ वापरावाका महत्वाचे ? उष्माघात टाळण्यासाठी हे उपाय अत्यंत आवश्यक आहेत. विशेषतः वृद्ध, लहान मुले आणि श्रमिक वर्गासाठी.

**६. नवीकरणीय ऊर्जेचा वापर :** काय करावे ? घरांमध्ये सौर पॅनेल बसवावेत. सौर ऊर्जेवर चालणारी उपकरणे वापरावीत. उद्योगांनी हरित ऊर्जा स्वीकारावीका महत्वाचे ? यामुळे पारंपरिक इंधनावर अवलंबित्व कमी होते आणि पर्यावरण प्रदूषण घटते.

**७. कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिक नियंत्रण** काय करावे ? ओला आणि सुका कचरा वेगळा करावा, प्लास्टिकचा वापर टाळावा, घरगुती कंपोस्टिंग करावीका महत्वाचे ? कचऱ्यामुळे निर्माण होणारे उष्णता आणि प्रदूषण कमी करता येते, तसेच पर्यावरण स्वच्छ राहते.

**८. जनजागृती आणि सामूहिक सहभाग :** काय करावे ? शाळा, ग्रामपंचायत, संस्था यांनी जागरूकता मोहीम राबवावी. स्थापन करावेत. सोशल मीडियावर माहिती पसरवावीका महत्वाचे ? एकट्या व्यक्तीने केलेले प्रयत्न मर्यादित असतात, परंतु सामूहिक प्रयत्न मोठा बदल घडवू शकतात.


**९. शासन आणि धोरणात्मक उपाय :** काय करावे ? वृक्षतोडीवर कठोर नियंत्रण पाणी संवर्धनासाठी कायदेहरित शहर योजना का महत्वाचे ? दीर्घकालीन बदलासाठी शासनाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

वाढते तापमान, उष्णतेच्या लाटा आणि उष्माघातामुळे होणारे मृत्यू हे केवळ नैसर्गिक घटना नसून मानवनिर्मित बदलांचे परिणाम आहेत. विशेषतः अमरावती, अकोला, नागपूर आणि वर्धा यांसारख्या भागात दिसलेली परिस्थिती आपल्यासाठी इशारा आहे. जर आपण आजच योग्य उपाययोजना केल्या, तर या संकटावर मात करणे शक्य आहे. आजपासूनच कृतीला सुरुवात करूया! **(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# दोन लाखांची कर्जमाफी : वास्तव आणि भविष्यातील आव्हाने



- संदीप पवार
वरिष्ठ पत्रकार रिसोड
जि.वाशिम
मो. नं. ८४०८८९५६५५



महाराष्ट्रातील शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून आर्थिक संकटाचा सामना करीत आहे. शेती हा व्यवसाय निसर्गावर अवलंबून असल्यामुळे कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस तर कधी बाजारातील घसरलेले भाव यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण आर्थिक गणित कोलमडून जाते. अशा परिस्थितीत राज्य शासनाने दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी जाहीर करून लाखो शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यातील सुमारे पंचावन्न लाखांहून अधिक शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून यासाठी हजारो कोटी रुपयांचा खर्च शासनाला करावा लागणार आहे. हा निर्णय शेतकऱ्यांच्या दृष्टीने नक्कीच महत्त्वाचा असला तरी त्याचे विविध पैलू समजून घेणे आवश्यक आहे.

विदर्भासह महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये शेतीचे उत्पन्न सातत्याने अस्थिर राहिले आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि यांत्रिकीकरणाचा खर्च वाढत असताना उत्पादनाला मिळणारा भाव मात्र अनेकदा खर्चापेक्षाही कमी राहतो. परिणामी शेतकऱ्यांना बँकांकडून किंवा सहकारी संस्थांकडून कर्ज घ्यावे लागते. पीक चांगले आले तर कर्ज फेडले जाते; परंतु निसर्गाने साथ दिली नाही तर तेच कर्ज पुढील वर्षीच्या कर्जात मिसळून अधिक वाढते. अशा प्रकारे अनेक शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकतात. शासनाने जाहीर केलेली दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी ही या दुष्टचक्रातून काही प्रमाणात बाहेर पडण्याची संधी म्हणून पाहिली जात आहे.

या योजनेतील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे दोन लाख रुपयांपर्यंतच्या थकीत कर्जाची पूर्ण माफी. अनेक लहान आणि मध्यम शेतकऱ्यांची कर्जरक्कम याच मर्यादेत असल्यामुळे त्यांना थेट फायदा होणार आहे. विशेषतः पश्चिम विदर्भातील वाशिम, अकोला, बुलढाणा आणि अमरावती जिल्ह्यांतील मोठा वर्ग या निर्णयाकडे आशेने पाहत आहे. कर्जमाफीमुळे बँकांची थकबाकी कमी होईल आणि शेतकऱ्यांना पुन्हा नवीन पीककर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होईल. अनेक शेतकरी केवळ थकीत कर्जामुळे नव्याने कर्ज घेऊ शकत नव्हते. त्यामुळे त्यांना खासगी सावकारांकडे जावे लागत होते. ही परिस्थिती काही प्रमाणात बदलण्याची शक्यता आहे.

या योजनेतील दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे वन टाइम सेटलमेंट. दोन लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठीही काही प्रमाणात सवलतीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या कर्जबाजारी शेतकऱ्यांनाही दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. याशिवाय नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर लाभाची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे केवळ थकबाकीदारांनाच फायदा होत आहे अशी भावना निर्माण होणार नाही. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही शासनाने न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

मात्र या निर्णयाकडे केवळ भावनिक दृष्टीने पाहून चालणार नाही. याचे आर्थिक आणि सामाजिक परिणामही तितकेच महत्त्वाचे आहेत. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळेल हे निश्चित; परंतु कर्जमाफी ही शेतीच्या समस्येवरचा कायमस्वरूपी उपाय नाही. यापूर्वीही महाराष्ट्रात अनेक वेळा कर्जमाफी जाहीर झाली. प्रत्येक वेळी काही काळासाठी परिस्थिती सुधारली; परंतु काही वर्षांनंतर पुन्हा कर्जमाफीची गरज निर्माण झाली. यावरून स्पष्ट होते की समस्या कर्जात नसून शेतीच्या मूलभूत व्यवस्थेत आहे.

शेतकऱ्याला योग्य भाव मिळत नसल्यास तो कितीही मेहनत केली तरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकत नाही. उदाहरणार्थ, सोयाबीन, कापूस, तूर यांसारख्या पिकांचे भाव अनेकदा उत्पादन खर्चाच्या तुलनेत कमी राहतात. बाजारपेठेतील दलाली, साठेबाजी आणि जागतिक बाजारातील बदल यांचा परिणाम थेट शेतकऱ्यांवर होतो. अशा वेळी कर्जमाफी मिळाली तरी पुढील हंगामात पुन्हा कर्ज घेण्याची वेळ येते. त्यामुळे हमीभाव आणि बाजार व्यवस्थेतील सुधारणा या कर्जमाफीइतक्याच महत्त्वाच्या आहेत.

पश्चिम विदर्भातील परिस्थिती विशेषतः गंभीर आहे. या भागात अजूनही मोठ्या प्रमाणावर शेती पावसावर अवलंबून आहे. सिंचनाची सुविधा मर्यादित असल्यामुळे पाऊस कमी झाला तर उत्पादन घटते आणि जास्त झाला तरी नुकसान होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न अनिश्चित राहते. कर्जमाफीमुळे आर्थिक ताण काही काळ कमी होईल; पण सिंचन, जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापन या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक झाली नाही तर ही समस्या कायम राहणार आहे.

कर्जमाफीचा आणखी एक पैलू म्हणजे तिचा राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम. हजारो कोटी रुपयांचा खर्च शासनाला करावा लागणार आहे. हा निधी विकासकामे, शिक्षण, आरोग्य किंवा पायाभूत सुविधांसाठी वापरला जाऊ शकला असता. त्यामुळे शासनासमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान आहे. अर्थात शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्यामुळे त्याला मदत करणे आवश्यक आहे; परंतु त्याचबरोबर भविष्यात अशा मोठ्या आर्थिक भाराची गरज पडू नये यासाठीही उपाययोजना करणे गरजेचे आहे.

आर्थिक संकटामुळे अनेक शेतकरी मानसिक तणावाखाली असतात. कर्जाची नोटीस, बँकेचा तगादा आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे त्यांच्यावर मोठा मानसिक दबाव निर्माण होतो. कर्जमाफीमुळे हा ताण काही प्रमाणात कमी होईल. शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होईल आणि नव्या जोमाने शेती करण्याची प्रेरणा मिळेल. शेतकऱ्यांच्या खऱ्या विकासासाठी कर्जमाफीसोबतच शेतीला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणारे दीर्घकालीन धोरण हाच सर्वात प्रभावी मार्ग ठरेल.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८
पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)
दैनिक महाभूमि
This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27

दैनिक महाभूमि

# छत्रपती संभाजीनगर भूमि

शुक्रवार, ५ जून २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### महिलेची पर्स हिसकावली

**छत्रपती संभाजीनगर** :छत्रपती संभाजीनगर : आंबे खरेदी करणाऱ्या महिलेची पर्स दुचाकीस्वार चोरट्याने लंपास केल्याची घटना ह्युदाई शोरूमजवळ मुकूंदवाडी परिसरात घडली. याप्रकरणी मुकूंदवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्विनी बालाजी कंवठेकर, रा. उत्तरानगरी, धुत हॉस्पिटलजवळ यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार मंगळवार, २ जून रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास फिर्यादी आंबे खरेदी करीत असताना युनिकॉन मोटारसायकलवर आलेल्या इसमाने पर्स हिसकावून पोबारा केला.

### बांधकाम मजुराचा मृत्यू

**वैजापूर** : सिमेंट मिक्सर खाली दबून बांधकाम मजुराचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवार, ४ जून रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास वैजापूर तालुक्यातील रोटेगाव येथे घडली. अब्दुल वाहीद शेख (३४ वर्ष), रा. इंदीरानगर, वैजापूर असे मयत बांधकाम मजूराचे नाव आहे. शेख हे मिस्तरी काम करत होते. रोटेगाव येथे सिमेंट रस्त्याचे काम सुरू होते.या कामावर शेख काम करत असताना मिक्सर पाठीमागे आल्याने त्याच्या खाली सापडून शेख यांचा जागेवर मृत्यू झाला. नागरिकांनी त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

### जमनवाडी येथील तरुणाची आत्महत्या

**वैजापूर** : तालुक्यातील जमनवाडी येथील धीरज विठ्ठलसिंह जारवाल (२४ वर्ष) या युवकाने वाळूज औद्योगिक वसाहत परिसरात विषारी औषध सेवन करून आत्महत्या केली. ही घटना मंगळवार, २ जून रोजी घडली. वैजापूर तालुक्यातील वाघला येथील एका युवतीशी त्याचे प्रेम संबंध होते. दोघांमध्ये काही कारणावरून वाद झाला. त्यामुळे त्याने युवतीचे काही फोटो सोशल मीडिया वर व्हायरल केले होते.

डोणगावकर दांम्पत्याची पक्षातून हकालपट्टी: नगरसेवक गणेश लोखंडे यांना उमेदवारी

# विधान परिषद निवडणूक : देवयानी डोणगावकर यांची ऐनवेळी माघार

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणातून एक अत्यंत नाट्यमय आणि राजकीय थरार उघडकीस आला आहे. अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी गुरुवार, ४ जून रोजी राजकीय पक्षांमध्ये प्रचंड उलथापालथ पाहायला मिळाली. शिवसेना (उबाठा) पक्षाच्या अधिकृत उमेदवार देवयानी डोणगावकर यांनी शेवटच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज मागे घेत पक्षाला मोठा धक्का देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी घेतलेल्या माघारीमुळे त्यांची आणि कृष्णा पाटील डोणगावकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. खासदार संजय राऊत यांनी स्वतः ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे.

पक्षविरोधी कारवायात सहभागी झाल्या बद्दल शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली आहे, असे खासदार संजय राऊत यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. मात्र, देवयानी डोणगावकरांनी अचानक माघार घेतली असली तरी ठाकरे गटाने कमालीच्या सावधगिरीने खेळलेल्या





देवयानी डोणगावकर | गणेश लोखंडे

बॅकअप प्लान मुळे महाविकास आघाडीची अब्रू वाचली आहे. आता छत्रपती संभाजीनगर-जालना विधान परिषदेसाठी गणेश लोखंडे महाविकास आघाडीचे उमेदवार असणार असतील, असे जाहीर करण्यात आले आहे. शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी देवयानी डोणगावकर यांच्या नावाची घोषणा केली होती. त्यांचा अर्ज भरण्यासाठी महाविकास आघाडीचे बडे नेते एकवटले होते. मात्र, ऐन मोक्याच्या क्षणी डोणगावकरांनी माघार घेतली. कोकण विधान परिषद निवडणुकीची पुनरावृत्ती इथेही होणार असे वाटत असतानाच, शिवसेना (उबाठा) पक्षाने आधीच खबरदारी घेतली होती.

दरम्यान, देवयानी डोणगावकर ऐनवेळी दगाफटका करणार असल्याची कुणकुण शिवसेनेला आधीच लागली होती. त्यामुळे त्यांनी अत्यंत गुप्ततेने गणेश लोखंडे यांचा अपक्ष म्हणून अर्ज दाखल करून ठेवला होता.

डोणगावकरांनी माघार घेताच, महाविकास आघाडीने तातडीने गणेश लोखंडे यांना आपला अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर केले. एकीकडे देवयानी डोणगावकर यांनी दगाफटका करण्याचा प्रयत्न केला, तर दुसरीकडे ठाकरे गटाच्या प्लॅन बीमुळे महाविकास आघाडी शर्यतीत टिकून राहिली. आता या निवडणुकीत थेट सामना भाजपचे सुहास शिरसाट विरुद्ध मविआचे गणेश लोखंडे यांच्यात रंगणार असून, सत्तारांच्या माघारीमुळे शिरसाट यांचे पारडे सध्या तरी जड दिसत आहे.

### महायुतीमधील बंडखोरी शमली

दुसरीकडे, महायुतीमध्येही अंतर्गत धुसफूस शिगेला पोहोचली होती. भाजपच्या वाट्याला आलेल्या या जागेवर सुहास शिरसाट यांना रिंगणात उतरवण्यात आले होते. मात्र, शिवसेना (शिंदे गट) नेते अब्दुल सत्तार यांचे सुपुत्र समीर सत्तार यांनी अपक्ष अर्ज भरून भाजपची डोकेदुखी वाढवली होती. शेवटी, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी मध्यस्थी केल्यानंतर अब्दुल सत्तार यांची नाराजी दूर झाली आणि समीर सत्तार यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे.

### लोखंडेंच्या नावाची महाविकास आघाडीकडून घोषणा

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील शिवसेना (उबाठा) पक्षाचे गटनेते गणेश लोखंडे यांना छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक - २०२६ साठी महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले आहे. महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या सहमतीने लोखंडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सदरील निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून गणेश लोखंडे यांच्या विजयासाठी सर्व घटक पक्ष एकजुटीने काम करणार असल्याची घोषणा महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात आली आहे.

## अवैध गौण खनिज वाहतुकीवर पोलिसांचा 'प्रहार'

७८ लाख ९१ हजारांचा मुद्देमाल जप्त



**सोयगांव प्रतिनिधी**

जिल्ह्यातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत ७ वाहनांसह एकूण ७८ लाख ९१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे वाळू व मुरूम माफियांमध्ये खळबळ उडाली असून जिल्हा पोलीस प्रशासनाने अवैध धंद्यांविरोधात कठोर भूमिका घेतल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात विशेष गस्त मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत बुधवार, ३ जून रोजी जिल्हा गस्तीदरम्यान विविध भागांत धाडी टाकून बेकायदेशीररीत्या वाळू व मुरूम उत्खनन करून त्याची विनापरवाना वाहतूक करणाऱ्या ७ वाहनांवर कारवाई करण्यात आली. ग्रामीण पोलिसांच्या विविध पथकांनी गंगापूर, शिल्लेगाव, विरगाव, एमआयडीसी पैठण, अजिंठा, पिशोर आणि करमाड पोलीस ठाण्यांच्या हद्दीत नाकाबंदी व वाहन तपासणी मोहीम राबवली. यावेळी शासनाचा महसूल बुडवून छुप्या मार्गाने गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान एकूण १५ ब्रास वाळू व ४ ब्रास मुरूम, असा १९ ब्रास गौण खनिज साठा जप्त करण्यात आला.

दरम्यान, जप्त खनिजाची अंदाजे किंमत ९१ हजार रुपये असून, वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे ५ हायवा ट्रक आणि २ ट्रॅक्टरही ताब्यात घेण्यात आले. तर जप्त वाहनांची अंदाजे किंमत ७८ लाख रुपये आहे. जप्त करण्यात आलेली सर्व वाहने संबंधित पोलीस ठाण्यांच्या ताब्यात देण्यात आली असून, संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### सरप्राईज कारवाया सुरु राहणार

जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर वाळू उपसा, चोरटी वाहतूक, मुरुमाची अवैध वाहतूक किंवा इतर अवैध धंदे खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशारा पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी दिला आहे. पर्यावरणाची हानी व शासकीय महसूलाचे नुकसान करणाऱ्या प्रवृत्तींविरोधात यापुढेही संपूर्ण जिल्ह्यात अशाच प्रकारच्या धडक आणि सरप्राईज कारवाया सुरू राहतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

## शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शनिवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन

वेरूळच्या भोसले गढीवर १६ प्रकारच्या जलांनी होणार शिवअभिषेक

**खुलताबाद / प्रतिनिधी**

वेरूळ येथील ऐतिहासिक मालोजीराजे भोसले गढीवर शनिवार, ६ जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा केला जाणार आहे. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठान आणि तेरुल ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात ५१ जोडप्यांच्या हस्ते एकाच वेळी शिवअभिषेक करण्यात येणार असल्याची माहिती संयोजक राजेंद्र पवार व ग्रामस्थांनी दिली.

कोल्हापूर येथून खास



मागवण्यात आलेल्या छत्रपती शिवरायांच्या ५१ आकर्षक मूर्तीवर हा सामूहिक अभिषेक होईल. सप्तनद्यांचे पाणी, समुद्रजल, पंचामृत, सुवर्ण व रजत जल, औषधी जल त फळांचा रस अशा एकूण १६ प्रकारच्या पवित्र जलांनी मंत्रोच्चारात हा सोहळा सकाळी साडेआठ ते साडेनऊ या वेळेत संपन्न होईल. या सोहळ्यास पालकमंत्री संजय शिरसाठ, मंत्री अतुल सावे, खा. संदीपान भुमरे, माजी खा. डॉ. भागवत कराड, आ. प्रशांत बंब, आ. रमेश बोरनारे, आ. संजना जाधव, आ. अंबादास दानवे, आ. अनुराधा चव्हाण, आ. सतीश चव्हाण, जि. प. अध्यक्ष अविनाश गलांडे, महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ आदी उपस्थित राहणार असल्याचे राजेंद्र पवार यांनी सांगितले.

### क्षुल्लक कारणावरुन चाकूहल्ला

**छत्रपती संभाजीनगर** : चहाचा कप तुटल्याच्या कारणावरून टपरीचालकाने तसेच त्याच्या साथीदाराने एकावर चाकू हल्ला केला. ही घटना क्रांतीचौकात घडली. याप्रकरणी आरोपींवर क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सौरभ उर्फ चिंटू मस्के रा. रमानगर व टपरीचालक उमेश (पूर्ण नाव माहित नाही) अशी आरोपींची नावे आहेत. अनिल ज्ञानेश्वर दाभाडे यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १ जून रोजी दुपारी साडे तीन वाजेच्या सुमारास फिर्यादी आरोपीच्या चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी गेले होते. चहाचा कप फुटल्याचा राग आल्याने दोन्ही आरोपींनी फिर्यादींना मारहाण केली.

## 'एफएसएएस ॲप'द्वारे आता शेतकऱ्यांना नोंदवावी लागणार अनुदानित खताची मागणी

**सिल्लोड / प्रतिनिधी**

खरीप हंगामामध्ये खत खरेदी करिता शेतकऱ्यांना सुलभता व्हावी, खत व्यवस्थापन योग्य रीतीने होणे व खते शेतकऱ्यांना वेळेत मिळावी याकरिता कृषी विभागाने एफ एस ए एस ॲप द्वारे खता साठी अर्ज करणे बंधनकारक केलेले आहे. सदर ॲप डाऊनलोड करून त्यामध्ये शेतकऱ्यांनी स्वतःचा आधार क्रमांक व फार्मर आयडी क्रमांक टाकल्यास त्यावर जमीनीचा तपशील दिसून येईल यानंतर पिकाची नोंदणी करावी असे आवाहन सिल्लोड पंचायत समितीच्या सभापती अनिता सुरेश बनकर यांनी केले आहे.

एफ एस ए एस ॲपवर शेतकऱ्यांनी त्यांना त्यांच्या पिकानुसार द्यावयाची खतांची मात्रा नोंदवायची आहे.खताची नोंदणी झाल्यानंतर कोणत्या किरकोळ दुकानातून तुम्हाला खते खरेदी करणे आहेत याची नोंद करायची आहे. त्यानुसार ॲपवर एक क्यू आर कोड जनरेट होईल आणि ज्या वेळेस खते खरेदी करायचे आहे तो कोड संबंधित दुकानदाराला दाखवने बंधनकारक आहे. नोंदणी करतेवेळी खत खरेदी स्वतः करणार अथवा अन्य प्रतिनिधीद्वारे खत खरेदी करणार याची पण माहिती नोंदवणे गरजेचे आहे. जर वेगवेगळ्या प्रकारचे खते इतर दुकानातून घ्यायचे असल्यास त्याप्रमाणे वेगळा क्यूआर कोड मिळणार आहे. खताची नोंदणी पूर्ण झाल्यानंतर जो क्यू आर कोड मिळेल तो फोनच्या गॅलरीमध्ये सेव करून ठेवायचा आहे. जेणेकरून नेटवर्क नसतानाही आपणास खरेदी करताना कोणती अडचण येणार नाही आणि खत खरेदी करतेवेळी तो दुकानदाराला दाखवल्यानंतर आपणास आपण नोंदवल्याप्रमाणे खते मिळतील असे सभापती अनिता बनकर यांनी सांगितले.

## जागतिक पर्यावरण दिन : आम जपण्यासाठी खास प्रयत्न

कलमी जगात संकटात असलेल्या रायवळ आंब्याच्या संवर्धनात रस

**गजानन जाधव**

**सिल्लोड** : आम म्हणजे सर्व साधारण व खास म्हणजे विशेष. आंबा हा सर्वत्र आढळतो, आम जनतेस सहज उपलब होतो व विकत घेणे आवाक्यात असते म्हणून आंब्यास आम म्हटले जाते. आंबट चव ही या नावास समर्पक ठरते. महाराष्ट्र राज्याचा राज्य वृक्ष व हरित मान चिन्ह असलेला, भारताचे राष्ट्रीय फळ, फळांचा राजा असलेला आंबा हा मूळ भारतीय वृक्ष. जगप्रसिद्ध अजिंठा लेणी येथील चित्र शैलीत आंब्याचा वृक्ष ही चित्रित आहे.

प्रत्येक भागात रायवळ (गावरान) आंब्याच्या अनेक जाती आहेत. रंग, आकार, चव, वैशिष्ट्य यानुसार ही स्थानिक नावे आहेत. खोबऱ्या, गोटी, चिकाड्या, साखऱ्या, शेप्या, चोख्या, नकट्या, चिपड्या, शेंद्रा, तांब्या, तुप्या, तेलंगी कागदी, पुंगटी, खाऱ्या, पादऱ्या, ढवळा,





लोण्या, हडका अशा अनेक जाती छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आहे. पर्यावरण संवर्धन हेतू या वाणांचे बीज (कोयी) संकलन करून त्या पासून रोपे बनवून त्या आम जाती वृद्धिंगत करण्याचे कार्य राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सिल्लोड येथील गती विधी पर्यावरण हे दायित्व असलेले डॉ. संतोष पाटील हे करत आहेत. अनेक रोप बनवून ती जुलै महिन्यात विविध ठिकाणी लावण्यात येणार आहे. बरीच रोपे गत वर्षी ही लावन्यात आली. विदर्भात अकोला भागातील साखऱ्या हा आंबा संकलन करून रोप निर्मिती करण्यास केली आहे.

दरम्यान, आंब्याच्या फुलोरा अनेक मधमाशा, इंडियन जेझेबल, ग्रे पंसी, मुंग्या यांना अन्न उपलब देतो. कॉपर फ्लॅश, बॅरोनेट कॉमन बेरोन या प्रजातीची फुलपाखरे यावर अंडी घालून आपला जीवनक्रम आरंभ करतात. इतकेच नव्हे तर डॅनड्रॉ प्थ नामक बांडगुळ हे आंब्यावर उगवते व त्याच्या पानावर देखील ब्रॉंडटेल, पिकॉक रॉयल, कॉमन जेझेबल व्हाईट रॉयल इत्यादी जातीची फुलपाखरे अंडी घालण्यास पसंती देतात. अनेक पक्षी , वाट वाघुळ , खार, माकड याची फळे खातात म्हणून ही जैव विविधता आम्ही जपत आहोत अशी माहिती डॉ. संतोष पाटील यांनी दिली.

## पैठणमध्ये तथाकथित कर्ज माफी आदेशाची होळी

स्वाभिमानी शेतकरी संघटना झाली आक्रमक



**पैठण / प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांची कर्ज माफीची फसवी घोषणा केल्याचा आरोप लावत स्वाभिमानी शेतकरी संघटनाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पैठण बसस्थानक परिसरात घोषणाबाजी करत गुरुवार, ४ जून रोजी निषेध नोंदवाला. तसेच यावेळी शासनाने काढलेल्या कर्ज माफी आदेशाची होळी करीत सरकारचा निषेध केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्ज माफीची नुकतीच घोषणा केली असतांना सदरील कर्ज माफी ही फसवी असून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम असल्याचा आरोप लावत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. पैठण बसस्थानक परिसरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भाजप सरकार व देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच काही काळ रस्तारोको आंदोलन करत सरकारने काढलेल्या आदेशाची होळी सार्वजनिकरित्या होळी करून निषेध नोंदवला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली मुळे, पवन शिसोदे, सुभाष नवथर, अनिल राऊत, साईनाथ कर्डीले रामेश्वर बावणे, अमोल कर्डीले, किशोर सदावर्ते, शिवाजी साबळे आदींसह शेतकरी उपस्थित होते.

### चोरट्यासोबत वृध्दाची झटापट

**छत्रपती संभाजीनगर** : दुचाकीच्या डिक्कीतून पैसे चोरण्याच्या प्रयत्नात असलेल्या चोरट्यांना वेळीच रोखल्याने व्यापाऱ्याचे एक लाख रूपये वाचले. ही घटना बुधवार, ३ जून रोजी शब्बर दवासाज पानदरिबा परिसरात घडली. याप्रकरणी दुचाकीस्वार चोरट्यांवर सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बन्सीलाल संपतलाल भन्साली (६३ वर्ष), रा. फ्लोरा सोसायटी, ए.एस. क्लबजवळ, तीसगाव यांनी फिर्याद दिली. फिर्यादी व्यावसायिक आहेत. बुधवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास ते बजाज चेतक इलेक्ट्रीकल दुचाकीवर पानदरिबा येथील शब्बर दवासाज येथे गेले होते. गाडी बाहेर उभी करून ते दूकानात गेले. औषध घेत असताना त्यांनी सहज गाडीकडे पाहिले असता दोन चोरटे डिक्कीतील एक लाख रूपयांची पिशवी काढताना दिसून आले.

## खरीप हंगामपूर्व शेतकरी मेळावा उत्साहात



**वैजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील जळगाव येथे खरीप हंगाम पूर्व मेळावा तालुका कृषी विभागाच्या वतीने गुरुवार, ४ जून रोजी घेण्यात आला. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार, तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के यांनी उपस्थित शेतकऱ्यांना खरीप हंगामात करावयाच्या कामाबाबत मार्गदर्शन केले.

वैजापूर तालुक्यातील महालगाव कृषी मंडळातील जळगाव येथे मंडळ कृषी अधिकारी माधव गांगुर्डे यांनी खरीप हंगाम पूर्व नियोजनात जमिनीची पूर्व मशागत, बियाणे व खते खरेदी करताना पक्के बिल घेणे, बीज उगवण क्षमता चाचणी बीज प्रक्रिया, सरीवरंबा वरती पेरणी, सापळा पिकांची लागवड, शत्रूकिडी व मित्रकिडी, आंतर पिकांची लागवड, जैविक औषधी वापर, हुमणी किड नियंत्रण मोहीम, बेड वरती लागवड करणे, जैविक औषध निर्मिती यामध्ये निंबोळी अर्कविषयी माहिती शेतकऱ्यांना दिली.

तसेच रासायनिक खते खरेदी करताना फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल हे ॲप प्लेस्टोअर मधून डाऊनलोड करून ऑनलाइन खतांची बुकिंग करण्याविषयी मार्गदर्शन केले. खरीप हंगामपूर्व शेतकरी मेळाव्यास कृषी सेवक बळीराम ठेंगडे, शेतकरी आयुब शेख, भास्कर गायकवाड, रामदास देशमुख, रामेश्वर गायकवाड, योगेश गायकवाड, राजू भाडाईत, अशोक नवले, थोरात पाहुणे, वसंत खारतोडे, प्रभाकर गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, बाळू गायकवाड, सोमनाथ गायकवाड, भाऊसाहेब गुंड, अतुल चापे, आप्पासाहेब नवले, बाबासाहेब चव्हाण, बाबासाहेब डोंगरे, कमु बेग, सिकंदर मिर्झा, शेरु शेख, कादर शेख, रावसाहेब जाधव आदींची उपस्थिती होती.

## मोफत बालसंस्कार शिबिराची उत्साहात सांगता

**सिल्लोड / प्रतिनिधी**

धोत्रा कल्पतरु परिवाराच्या वतीने संस्कारातून राष्ट्र घडवूया.. या ब्रीदवाक्याला अनुसरून सिल्लोड तालुक्यातील श्रीक्षेत्र धोत्रा येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत बालसंस्कार शिबिराची (समर कॅम्प) सांगता नुकतीच करण्यात आली. शिबिराच्या शेवटच्या दिवशी बाल गोपाळांनी काढलेल्या दिंडी मिरवणुकीने या सोहळ्याची सांगता करण्यात आली.

गेल्या २४ मे पासून सुरू झालेल्या या शिबिरामध्ये धोत्रा आणि परिसरातील गावांतून ५ ते १८ वर्षे वयोगटातीलमुला-मुलींनी सहभाग घेतला होता. या ५ दिवसांच्या कालावधीत विद्यार्थ्यांना अध्यात्म, संस्कार आणि धर्मजागृतीचे मोफत धडे देण्यात आले. यामध्ये योगासने, श्रीमद् भागवत गीता पठण, हरिपाठ, शास्त्रीय गायन-वादन, भजन-कीर्तनाचे प्राथमिक प्रशिक्षण तसेच नैतिक मूल्ये, आई-वडिलांचा सन्मान राखणे आणि दैनंदिन जीवनातील शिस्त याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

सुखना नदीपात्रात अडीच हजार वृक्षारोपणाने मोहीम सुरू

# पर्यावरण दिन : शहरात महापालिका लावणार ५० हजार झाडे

**अमित तांदळे**

**छत्रपती संभाजीनगर** : उन्हाळ्यात दरवर्षी शहराचे तापमान ४३ अंशांच्या वर जात आहे. वाढणारे हे तापमान भविष्यासाठी चिंतेची बाब असल्याने महापालिका प्रशासनाने यंदा ५० हजार झाडे शहरातच लावण्याचा निर्णय घेतला आहे. शुक्रवार, ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सुखना नदी पात्रात एकाचवेळी अडीच हजार झाडे लावण्यात येणार असल्याची माहिती उद्यान अधीक्षक विजय पाटील यांनी दिली आहे.

शहरात मनपाच्या उद्यान विभागासह लोकप्रतिनिधी, विविध संस्था, संघटना यांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचे नियोजन करण्यात आले आहे. पावसाळा संपेपर्यंत वृक्षारोपण सुरू राहणार आहे. सुखना नदीचे पात्र, सफारी पार्क या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात येणार आहे. सुखना नदी पात्राला गतवैभव मिळवून देण्यासाठी खोलीकरण करणे, रुंदीकरण करणे, दगडी पिचिंग करणे, अतिक्रमणे काढणे इत्यादी कामे सुरू आहेत. नदी पात्राच्या काठावर दाट वृक्षारोपण करून परिसर हिरवागार करण्याचे नियोजन करण्यात



आल्याचे पाटील यांनी सांगितले. त्यासाठी अडीच हजार खड्डे तयार करण्यात आले आहेत. पर्यावरण दिनी अडीच हजार झाडे लावण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### टँकरद्वारे देणार पाणी

जागतिक पर्यावरणदिनी महानगरपलिकेच्या वतीने अडीच हजार झाडे सुखना नदीपात्रात लावण्यात येणार आहे. पाऊस लांबला तरी लावलेली झाडे जगविण्यासाठी टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यता आले असल्याचे उद्यान अधीक्षक विजय पाटील यांनी सांगितले. तसेच जागतिक पर्यावरणदिनी प्रत्येकाने किमान झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

तसे पाऊस जसा पडेल वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाला गती दिली जाईल. शहरात विविध प्रभागांमध्ये मिळून दहा हजार खड्डे तयार करण्यात आले आहेत. त्याशिवाय सफारी पार्कच्या परिसरात पाच हजार झाडे लावण्याचे नियोजन आहे. पाऊस पडल्यावरच या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे. सप्टेंबर अखेरपर्यंत पन्नास हजार झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे, असे पाटील यांनी सांगितले.

## न्यूज ब्रीफ

### रिक्षा उलटून महिला जखमी

**छत्रपती संभाजीनगर :** लग्नाची खरेदी करण्यासाठी रिक्षाने जाणारी महिला रिक्षा उलटल्याने जखमी झाली. ही घटना २६ मे रोजी चिकलठाणा परिसरात घडली. याप्रकरणी रिक्षा चालकावर सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पल्लवी प्रविण म्हस्के रा. आनंद गाडे नगर नारेगाव यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार फिर्यादी दिराच्या लग्नाची खरेदी करण्यासाठी रिक्षाने जात असताना रिक्षा चालकाने भरधाव वेगात रिक्षा चालवल्याने रिक्षा पलटी होऊन फिर्यादी जखमी झाली.

### दिनकर गोरे यांनी स्वीकारला पदभार

**सोयगाव :** पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिनकर गोरे यांनी सोमवार, १ जून रोजी पदभार स्वीकारला आहे. तत्कालिन सहाय्यक पोलिस निरीक्षक पंकज बारवाल यांची छत्रपती संभाजीनगर येथील दहशतवाद विरोधी पथकात बदली झाली आहे. सोयगाव येथे नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरे यांचे स्वागत महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने करण्यात आला. यावेळी जेष्ठ पत्रकार भरत पगारे, विजय पगारे, रविंद्र काटोले, दत्तात्रय काटोले, बाळु शिंदे, ईश्वर इंगळे, राजरत्न पगारे आदींची उपस्थिती होती.

### कैलासनगरात घरफोडी

**छत्रपती संभाजीनगर :** कैलासनगरात चोरट्याने घरफोडी करीत ७ लाख रूपये रोख आणि २ लाखांच्या सोन्याच्या बांगड्या लंपास केल्या. याप्रकरणी जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल भुजंगराव देवडे रा. कैलासनगर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १४ मे रोजी सायंकाळी अज्ञात आरोपीने घराच्या चावीचा वापर करून कपाटात ठेवलेले ७ लाख रूपये रोख आणि २ लाख रूपये किंमतीच्या सोन्याच्या बांगड्या लंपास केल्या.

---

चढ्या भावाने खतांची विक्री : शिवसेनेची कारवाईची मागणी

# सिल्लोड तालुक्यात कृषी सेवा केंद्र चालकाकडून शेतकऱ्यांची अडवणूक

**सिल्लोड / प्रतिनिधी**



तालुक्यातील काही कृषी सेवा केंद्रांकडून खत व बियाण्यांची वाढीव दराने विक्री करत असून शेतकऱ्याची अडवणूक करुन त्यांना खतांची विक्री केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दोषी असणाऱ्या कृषी सेवा केंद्र चालकांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी डॉ. निलेश अपार यांच्याकडे करण्यात आली आहे.

सिल्लोड तालुक्यात जाणीवपूर्वक खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण करणे, पक्की बिले न देणे व युरियासोबत इतर खतांची सक्ती ही कृषी सेवा केंद्र चालक करत असून यांच्यावर तालुका कृषी अधिकारी विभागीय कृषी अधिकारी व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कोणताही वचक राहिलेला दिसून आलेला नसून या कृषी सेवा केंद्र चालकांचे व कृषी अधिकाऱ्यांचे संगम मत असल्याचे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेना (उबाठा) पक्षाकडे त्यांच्या तक्रारी केले आहे व तक्रारीमध्ये म्हटले आहे की सदर कृषी सेवा केंद्र चालक आमची मोठ्या प्रमाणात खत घेण्यासाठी आडूनुक करत असून जर जास्त पैसे असेल तरच खत मिळेल नसता तुम्हाला खत मिळणार नाही अशा प्रकारचे त्यांनी सक्ती केल्याचे बोलल्या जात आहे.

सदर दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, सिल्लोड तालुक्यातील ग्रामीण भागातील काही कृषी सेवा केंद्र धारकांकडून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत आहेत. सदर कृषी सेवा केंद्रांमध्ये खताचा पुरेसा साठा उपलब्ध असूनही शेतकऱ्यांना ''खत उपलब्ध नाही'' असे सांगून खत वितरण टाळले जात आहे. तसेच काही ठिकाणी खत व बियाण्यांची शासनाने निर्धारित केलेल्या किंमतीपेक्षा वाढीव दराने विक्री केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सिल्लोडचे उपविभागीय अधिकारी डॉ. निलेश अपार यांना निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात शिवसेना (उबाठा) पक्षाचे तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष अजित पाटील, विधानसभा संघटक रघुनाथ चव्हाण, शिवसेना नेते संजय कळात्रे, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश वराडे, प्रसिद्धीप्रमुख दशरथ सुरडकर, शहरप्रमुख मच्छिंद्र धाडगे, उप शहर प्रमुख किशोर लोखंडे , शेख शाकेर, सुरेश थोरात, शिवा गौर, अमोल शिंदे, पंकज कांबळे, शेख अखिल शेख बाबू, सुधाकर सोनवणे, समाधान भोटकर, अरुण पाटील, सोहेल मिर्झा, भगवान खळतकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा समावेश होता.

### खत, बियाण्यांच्या साठ्याची पडताळणी करा

■ शेतकऱ्यांची आडवणूक करणाऱ्या बेजवाबदार कृषी सेवा केंद्र चालकाविरुद्ध व त्यांना अभय देणाऱ्या तालुका कृषी अधिकारी विरुद्ध चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी व शेतकऱ्यांना न्याय द्यावा सदरील कृषी सेवक केंद्राची तात्काळ तपासणी करावी त्याचबरोबर खत व बियाण्यांच्या साठ्याची पडताळणी करावी. वाढीव दराने विक्री करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी शिवसेना (उबाठा) पक्षाचे तालुकाप्रमुख रघुनाथ घरमोडे यांनी केली आहे.

---

## रस्त्यावरील खडीमुळे वाहतुकीस खोळंबा



**वैजापूर / प्रतिनिधी**

शहरातील छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील म्हसोबा चौक परिसरात सोमवार, १ जून रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास एका अज्ञात हायवा ट्रक मधील खडी रस्त्यावरच सांडल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. या खडीमुळे दुचाकी वाहने घसरून अपघाताला निमंत्रण मिळत असल्याने वाहन चालकांचे चांगलेच हाल झाले.

वैजापूर शहरातून दररोज अहोरात्रपणे हायवा सारख्या मोठ्या वाहनातून क्षमतेपेक्षा जास्त खडीची तसेच अन्य गौण खनिजाची वाहतूक होत असल्याचे समोर येत असून याबाबत प्रशासन कुठलीच ठोस भूमिका घेत नसत्याने सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत असल्याचे वारंवार दिसून आले आहे. रस्त्यावर पडलेल्या खडीच्या निमित्ताने हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून याबाबत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे. म्हसोबा चौक परिसरात जवळपास एक ते दीड किलोमीटर अंतरावर रस्त्यावर खडीचा थर पसरलेला असल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी याबाबत प्रशासनाला जाब विचारला असता सकाळी रस्त्यावरील खडी काढण्यात येईल असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले. दरम्यान नगरपरिषद प्रशासनाने या बाबीची तातडीने गंभीर दखल घेत मंगळवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास जेसीबी व ट्रॅक्टरच्या साह्याने रस्त्यावरील खडी काढण्याचे काम केल्याने वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली व नागरिकांना दिलासा मिळाला. शहरातील रस्त्यावरून सुसाटपणे धावणाऱ्या वाळू व खडीच्या गाड्यांचा स्थानिक पोलीस तथा वाहतूक पोलिसांनी तातडीने बंदोबस्त करावा अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा येथील नागरिकांनी दिला आहे.

---

## महायुतीचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात




**परभणी / प्रतिनिधी**

आगामी विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीची बैठक आणि कार्यकर्त्यांचा मेळावा गुरुवार, ४ जून रोजी उत्साहात पार पडला. या मेळाव्यास राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी मार्गदर्शन केले.

पाथरी रोडवरील राजलक्ष्मी लॉन्स येथे महायुतीतील घटक पक्ष असलेले शिवसेना (शिंदेगट), भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आगामी विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी खासदार रामराव वडकुते, आमदार संतोष बांगर, माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर, माजी आमदार हरिभाऊ लहाने, पाथरीचे नगराध्यक्ष आप्पाराव वावरे, गीता सूर्यवंशी,महायुतीचे उमेदवार सईद खान, जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, जिल्हाप्रमुख विशाल कदम, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेश भामरे, आसिफ खान आदींची उपस्थिती होती.

---

### अनिस कुरेशी यांचा सत्कार




**पैठण :** येथील पत्रकार अनिस कुरेशी यांची राज्यस्तरीय ''महाराष्ट्र गौरव पुरस्कार'' साठी निवड करण्यात आली. या पुरस्काराचे वितरण शनिवार, ३० मे रोजी नाशिक येथे उत्साहात पार पडले. यावेळी देवयानी आहेर यांच्या हस्ते अनिस कुरेशी यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. अनिस कुरेशी यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

---

## गोपीनाथ मुंडे यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम बुधवार, ३ जून रोजी पार पडला. गोपीनाथराव मुंडे ग्रामीण विकास व संशोधन संस्थेत (जीएमएनआरडी) सभागृहात हा कार्यक्रम झाला.

यावेळी कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. प्रकुलगुरू डॉ.प्रवीण वक्ते, कुलपती नामनिर्देशित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.गजानन सानप, संस्थेचे संचालक डॉ.संजय साळुंके यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी अधिष्ठाता डॉ.वैशाली खापर्डे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्यंकटेश लांब, डॉ.योगिता होके पाटील, संचालक डॉ. हिंमतराव जाधव, डॉ.बी. एन.डोळे, डॉ.अश्विन रांजणीकर, डॉ प्रवीण पवार, माजी प्राध्यापक डॉ.एस.टी.सांगळे, डॉ.एस.जी. शिंदे, अधिसभा सदस्य ॲड. अरविंद केंद्रे, आनंद वाघ, सुभाष चव्हाण, डॉ.शैलेश माकणीकर, डॉ.उषा वाराते, डॉ.बाबासाहेब बोधते, डॉ.राहून महायूती, सोमीनाथ वाघ, हेमंत येपूरवार, अनिकेत घुगे, सोहल शेख यांच्यासह विभागातील प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

---

## नाफेडच्या नफ्यातून सोयाबीन उत्पादकांना प्रति क्विंटल सातशे रुपये बोनस द्यावा

डॉ. सुयोग कुलकर्णी यांची कृषी मूल्य आयोगाकडे मागणी

**जालना / प्रतिनिधी**

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी नाफेडला होत असलेल्या अतिरिक्त नफ्यातून किंवा शासनामार्फत प्रति क्विंटल किमान ७०० रुपये बोनस तातडीने जाहीर करावा, अशी मागणी अखिल महाराष्ट्र डाळिंब उत्पादक संशोधन संघाचे माजी सचिव व बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग सुरेश कुलकर्णी यांनी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांच्यामार्फत शासनाकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

२०२५-२६ मध्ये लाखो सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन हमीभाव योजनेंतर्गत नाफेडच्या खरेदी केंद्रावर प्रति क्विंटल ५ हजार ३१८ रुपये या दराने विकले होते. नाफेडची खरेदी नोंदणी प्रक्रिया जानेवारीपर्यंत सुरू होती. त्या काळात खुल्या बाजारात सोयाबीनचे भाव अडचणीत ३१ कमालीचे घसरल्यामुळे, आर्थिक सापडलेल्या शेतकऱ्यांनी आपला माल नाफेडला विकला होता. परंतु, गेल्या चार-पाच महिन्यांत सोयाबीनच्या बाजारभावात मोठी वाढ झाली असून, सध्या नाफेडकडून तेच सोयाबीन जवळजवळ ७ हजार ३०० रुपये प्रति क्विंटल दराने खुल्या बाजारात विकले जात आहे. यामुळे नाफेडला मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त नफा मिळत आहे. मात्र, रात्रीचा दिवस करून कापूस-सोयाबीन पिकवणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांना या वाढीव दराचा किंवा नफ्याचा कोणताही लाभमिळालेला नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. नाफेडला कोट्यवधी रुपयांचा नफा होत असताना, त्या नफ्यात शेतकऱ्यांचाही न्याय्य वाटा असणे आवश्यक आहे. सरकारेदेखील शेतकऱ्यांना हमीभावाव्यतिरिक्त बोनस देऊन आर्थिक दिलासा देत आहेत.

---

## सुवर्ण पिंपळ, कृष्ण तुती वृक्षांचे केऱ्हाळा येथे रोपण

**सिल्लोड / प्रतिनिधी**

तालुक्यातील केऱ्हाळा येथे सुवर्ण पिंपळ आणि कृष्ण तुती या वृक्षांचे रोपण नुकतेच सिल्लोड येथील वनस्पती अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीच्या दौऱ्यावर असतांना त्यांनी रोम शहरातील उद्यानात कृष्ण तुती (ब्लॅक मलबेरी) या वृक्षाची लागवड केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी उपस्थितांना दिली.

केऱ्हाळा येथील श्री ज्ञानेश्वर माऊली वारकरी शिक्षण संस्थेच्या आवारात वनस्पती अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांच्या हस्ते सुवर्ण पिंपळ, बेल, मोह इत्यादी सहा प्रजातीच्या झाडांचे रोपण करण्यात आले. सुवर्ण पिंपळ या वृक्षाला वारकरी संप्रदायात महत्वाचे स्थान असल्याची माहिती डॉ. संतोष पाटील यांनीयावेळी दिली. याप्रसंगी अमृतचे जिल्हा उपव्यास्थापक योगेश रोडे, वारकरी संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. देविदास महाराज मिसाळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे जिल्हा व्यवस्थापक संदीप झालानी, कोकिळा मिसाळ, दादाराव एंडोले आदींची उपस्थिती होती.



---

## माजी सैनिक गणेश बनकर यांचा गोळेगाव येथे सत्कार



**गोळेगाव / प्रतिनिधी**

भारतीय सैन्य दलात कर्तव्य बजावत सेवानिवृत्त झालेले गोळेगाव खुर्द येथील माजी सैनिक गणेश तुकाराम बनकर यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांची ढोल-ताशाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती.

गणेश बनकर यांनी भारतीय सैन्यात तब्बल २४ वर्षे देशसेवा बजावून सेवानिवृत्त झाले आहेत. गोळेगाव खुर्द ग्रामस्थांच्या वतीने गणेश बनकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सिल्लोड- सोयगाव विधानसभा मतदारसंघातील भाजप नेते सुरेश बनकर, पंचायत समिती सभापती अनिता बनकर यांची उपस्थिती होती.

यावेळी गावातील आजी व माजी सैनिकांचाही सत्कार करून त्यांच्या राष्ट्रसेवेचा गौरव करण्यात आला. देशाच्या संरक्षणासाठी दिलेले त्यांचे योगदान हे समाजासाठी प्रेरणादायी असून प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब असल्याचे गणेश बनकर यांनी सत्काराला उत्तर देतांना सांगितले. तसेच आजच्या युवकांनी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या आहारी न जाता देशसेवेसाठी सैन्यात भरती व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

---

## पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

**जाफ्राबाद / प्रतिनिधी**



जालना येथील पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावर गुटखा माफियांनी मंगळवार, २ जून रोजी हल्ला करुन मारहाण केली होती. या घटनेमुळे जाफ्राबाद तालुक्यातील पत्रकारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावर हल्ला करणाऱ्यांचा निषेध करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जाफ्राबाद तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने तहसिलदारांकडे गुरुवार, ४ जून रोजी करण्यात आली आहे.

अवैध धंद्यांचे वाभाडे काढणाऱ्या बातम्या प्रसिद्ध केल्याचा राग मनात धरून गुटखा माफियांनी हे कृत्य केले असल्याचा आरोप पोलिसांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींवर केवळ नेहमीच्या कलमांऐवजी पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तहसिलदारांना निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात जाफ्राबाद तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश भारद्वाज, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर पाबळे, सरचिटणीस विशाल वाकडे, उपाध्यक्ष विष्णु मगर, बाळासाहेब गव्हले, पठाण सलमान खान, शिरीष खंडेलवाल, मोहन मुळे, शेख अजीम, शेख अल्ताफ, भरत लहाने आदींचा समावेश होता.

---

### वझूर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**परभणीः** पूर्णा तालुक्यातील तीर्थक्षेत्र वझूर येथे रामेश्वर मंदिर देवस्थानमध्ये १० ते १७ जून दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह, चतुर्थवेद पारायण, श्रीम्द भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सद्गुरु दामोधर तीर्थ स्वामी महाराज समाधी शताब्दी महोत्सवानिमित्त हा सोहळा होणार आहे. भागवताचार्य सखाराम महाराज पालमकर हे कथा वाचन करणार आहेत. यात नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहे. वझूर येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

---

## डॉ.ढाकणे महाविद्यालयात गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

**जालना / प्रतिनिधी**



रोहणवाडी येथील डॉ. सुभाषराव ढाकणे कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायंस अँड डेटा सायंस येथे माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री स्व.गोपीनाथराव मुंडे यांना स्मृतिदिनानिमित्त बुधवार, ३ जून रोजी अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी प्रा.शरद कवानकर यांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण केली. यावेळी प्रा.मंदाकिनी सांगळे, प्रा.गजानन काकडे, शुभम मुंडे, अशोक समिंदर, अतुल शेख, केदारनाथ पितळे, गंगाधर माळी, सदानंद ढाकणे व बी एस्सी डेटा सायंस तसेच बी एस्सी कॉम्प्युटर सायंस चे विद्यार्थी उपस्थित होते.

---

अकोलादेव येथील घटना : पाटबंधारे विभागाचा ढिसाळ कारभार

# जीवरेखा धरणाच्या चाऱ्यांचे खोदकाम न करताच ठेकेदाराने उचलले बील

**बी. डी. सवडे**

**अकोलादेव :** येथील जीवरेखा धरण परिसरामध्ये पाटबंधारे विभागाचा कमालीचा ढिसाळ कारभार समोर आला आहे. धरणाखालील चाऱ्यांचे (कालवे) कोणतेही खोदकाम न करताच संबंधित ठेकेदाराने (गुत्तेदार) शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून बिलाची उचल केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जीवरेखा धरणाखालील चाऱ्यांच्या खोदकामाचे कंत्राट संबंधित पडूळ नावाच्या गुत्तेदाराला देण्यात आले होते. जेणेकरून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पाणी पोहोचू शकेल. मात्र, या गुत्तेदाराने प्रत्यक्षात जमिनीवर एक टोपली मातीही न उचलता, केवळ कागदोपत्री घोडे नाचवून बिलाची रक्कम लाटल्याचा गंभीर आरोप होत आहे. शासकीय निधीचा असा उघड दरोडा पडत असताना पाटबंधारे विभागाचे अधिकारी झोपले होते का ? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणावर जालना पाटबंधारे विभागाचे अभियंता विवेक वाघमारे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी विभागाची बाजू मांडताना एक प्रकारे हतबलताच व्यक्त केली. आम्ही संबंधित गुत्तेदाराच्या या मनमानी कारभाराची दखल घेतली असून, त्याला आतापर्यंत एक-दोन नव्हे तर तब्बल चार वेळा कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. मात्र, संबंधित गुत्तेदार अत्यंत मुजोर असून तो शासनाच्या कोणत्याही नोटिसीला प्रतिसाद देत नाहीये, अशी माहिती अभियंता वाघमारे यांनी दिली.

दरम्यान, वारंवार नोटीस देऊनही गुत्तेदार ढुंकूनही पाहत नसल्याने आता पाटबंधारे विभागाने कठोर पाऊल उचलण्याची तयारी सुरू केली आहे. सदरील गुत्तेदार प्रतिसाद देत नसल्याने, त्याचे टेंडर (कंत्राट) रद्द करण्याची प्रक्रिया आम्ही तात्काळ सुरू करत आहोत, असा इशारा अभियंता वाघमारे यांनी दिला आहे.



### भ्रष्ट अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करा

■ शेतकऱ्यांच्या नुकसानीला जबाबदार कोण चाऱ्यांचे खोदकाम न झाल्यामुळे हक्काच्या पाण्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई कोण देणार ? या प्रकरणात केवळ टेंडर रद्द करून चालणार नाही, तर शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या मुजोर गुत्तेदारावर आणि त्याला पाठीशी घालणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल व्हावेत, अशी मागणी पंचायत समिती सदस्य दादाराव पाटील सवडे यांनी केली आहे.

## न्यूज ब्रीफ

### पुनर्वसनाशिवाय धरणाचे काम करू देणार नाही

**अमरावती :** पेढी बॅरेजसाठी तब्बल ८५० एकर जमीन देऊन विस्थापित झालेल्या रोहणखेडा-पर्वतापूर येथील नागरिकांचा संयम अखेर संपला असून पुनर्वसनाच्या मागणीसाठी त्यांनी थेट धरणाच्या कामावरच ब्रेक लावला आहे. ''आधी पुनर्वसन, मग धरणाचे काम'' अशी ठाम भूमिका घेत संतप्त ग्रामस्थांनी पुनर्वसन स्थळी सुरू असलेले धरणाचे काम बंद पाडत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून पुनर्वसनाच्या प्रश्नावर प्रशासनाकडून केवळ आश्वासने दिली जात असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. मौजे रामगाव येथील गट क्रमांक ४३ ची जमीन संपादित होऊन हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असताना गट क्रमांक ११९ च्या संपादनाबाबत मात्र जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

### थरारक कवायतींनी भारावले प्रेक्षक!

**अमरावती :** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या राष्ट्रीय स्तरावरील १०२ व्या उन्हाळी शिबिरांतर्गत आयोजित जलक्रीडा प्रात्यक्षिकांनी प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. मंडळाच्या जलतरण तलावावर सायंकाळी जलक्रीडा, कवायतींचे सादरीकरण केले. या कार्यक्रमात जलतरणाचे प्रकार, सिंक्रोनाईज्ड स्विमिंग, वॉटर पोलो, जळती बनेटी पाण्यावर तरंगणाऱ्या मल्लखांबाचे अद्वितीय प्रात्यक्षिक सादर केले. जलतरणपटूंच्या शिस्तबद्ध, साहसी सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाला मंडळाचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती . अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकांत चेंडके होते. प्रमुख अतिथी म्हणून ८ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल सतविंदर सिंग उपस्थित होते.

### भंडाऱ्यात एफडीएची मोठी कारवाई

**भंडारा :** शहरात अन्न व औषध प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. गंभीर आजार बरे करण्याचे खोटे दावे आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोन औषध प्रतिष्ठानांवर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत २९ हजार ७९२ रुपये किमतीचा आक्षेपार्ह औषध साठा जप्त करण्यात आला. 'औषधे व जादूटोणादी उपाय (आक्षेपार्ह जाहिरात) कायदा, १९५४' चे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली. औषध निरीक्षक व सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, भंडारा यांच्या पथकाने ३ जून रोजी शहरातील दोन वेगवेगळ्या ठिकाणी अचानक भेट देऊन तपासणी केली. मे. श्री लक्ष्मी आयुर्वेद औषधालय (राम मंदिर रोड, बडा बाजार, भंडारा) आणि पतंजली चिकित्सालय व औषधी भंडार स्टोअर्स (मे. अविशा इंटरप्राईजेस) (राजीव गांधी चौक, भंडारा) या दोन प्रतिष्ठानांवर छापा टाकण्यात आला.

### गरिबांच्या आशेचा किरण बनली स्वरयंत्राची यशस्वी शस्त्रक्रिया

# वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयात 'अशक्य ते शक्य'

**वाशिम/प्रतिनिधी**

'सरकारी दवाखान्यात जाऊन काय होणार?'' हा प्रश्न सामान्य माणसाच्या मनात नेहमीच घर करून असतो. मात्र, वाशीम जिल्हा सामान्य रुग्णालयातील डॉक्टरांच्या टीमने या प्रश्नाला आपल्या कर्तृत्वाने एक सकारात्मक उत्तर दिले आहे. केवळ उपचारच नव्हे, तर गरिबांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणारे 'देवदूत' म्हणून या रुग्णालयातील वैद्यकीय पथक समोर आले आहे.

नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, ६० वर्षांच्या एका ज्येष्ठ रुग्णाच्या स्वरयंत्रावर (वोकॅल कॉर्ड) दुर्मिळ आणि अत्यंत गुंतागुंतीची गाठ काढण्याची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. वृद्धत्वामुळे आणि आजाराच्या गांभीर्यामुळे रुग्णाचे कुटुंब पूर्णपणे खचले होते. खाजगी रुग्णालयांचा महागडा खर्च त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता. अशा निराशेच्या छायेखाली असताना, जिल्हा रुग्णालयाचे दार त्यांच्यासाठी 'आशेचा किरण' ठरले. ही शस्त्रक्रिया केवळ तंत्रज्ञानाची कसोटी नव्हती, तर ती डॉक्टरांच्या संयमाची आणि माणुसकीची परीक्षा होती.

कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. संतोष बेदरकर, डॉ. योगेश जाजू आणि डॉ. सोनाली टिकाईत यांनी अत्यंत नाजूकपणे, नसा-नसांची काळजी घेत शस्त्रक्रिया पूर्ण केली. त्यांना बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. राम हजारे, डॉ. भाग्यश्री भालेराव आणि डॉ. गौरव महाजन यांनी तितक्याच ताकदीने साथ दिली. शस्त्रक्रिया यशस्वी होताच, रुग्णाच्या कुटुंबियांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू हेच या कामगिरीचे खरे फलित होते. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे आणि डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालय केवळ इमारत राहिली नसून, ते सामान्य माणसाचा 'आधारस्तंभ' बनले आहे. पूर्वी ज्या शस्त्रक्रियांसाठी लोकांना खासगी दवाखान्यात धाव घ्यावी लागत असे, त्या आज मोफत आणि दर्जेदार पद्धतीने आपल्याच वाशीममध्ये होत आहेत. अपेंडिक्स, गर्भाशयाचे विकार किंवा पित्ताशयाचे खडे यांसारख्या आजारांवर आता लॅप्रोस्कोपीद्वारे विनासायास उपचार मिळणे, ही गोरगरिबांसाठी मोठी सुखद बाब आहे.



**'कागदी घोडे नाचवणारा' समज मोडीत काढला**

वाशीम जिल्हा रुग्णालयाने केवळ वैद्यकीय सेवेचा दर्जा उंचावला नाही, तर 'सरकारी रुग्णालय म्हणजे केवळ कागदी घोडे नाचवणारी यंत्रणा' हा समज मोडीत काढला आहे. डॉक्टरांनी केवळ रुग्ण बरा केला नाही, तर एका कुटुंबाला पुन्हा नव्याने जगण्याचे बळ दिले आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल संपूर्ण आरोग्य विभागासह सामान्य नागरिकांमधूनही डॉक्टरांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# शासकीय वसतीगृहात ५१ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

**वाशिम/प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत संचालित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतीगृह, नालंदा नगर, चिखली रोड, वाशिम येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वसतीगृहात अनुसूचित जाती प्रवर्गासह इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, दिव्यांग व अनाथ विद्यार्थ्यांसाठी एकूण ५१ जागांवर गुणवत्ता यादी व आरक्षणानुसार प्रवेश दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज करावेत.

प्रवेशासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक असून, सन २०२६ मध्ये किमान ६० टक्के गुणांसह दहावी उत्तीर्ण झालेला व वाशिम शहरातील महाविद्यालयात इयत्ता अकरावीमध्ये प्रवेशित असणे आवश्यक आहे. तसेच पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची अटही लागू राहणार आहे. विद्यार्थ्यांनी वसतीगृह कार्यालयाशी संपर्क साधावा. ऑनलाइन अर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व मदत उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती वसतीगृह अधीक्षक शेषराव इंगोले यांनी दिली.

**विद्यार्थ्यांना उपलब्ध सुविधा**

मोफत नाश्ता, दोन वेळचे भोजन व निवास व्यवस्था, कपाट, अभ्यासिका, ई-लायब्ररी, २४ तास वाय-फाय व इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय शैक्षणिक साहित्य, गणवेश व निर्वाह भत्त्यासाठी आर्थिक सहाय्य, आरओ पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही सुरक्षा तसेच जिम व ओपन जिमची सुविधाही देण्यात येते.

# जागतिक सायकल दिनानिमित्त रॅली

**वाशिम/प्रतिनिधी**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिनानिमित्त ३ जून रोजी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीचा शुभारंभ प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष अनिल सुब्रमण्यम यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. जिल्हा व सत्र न्यायालय येथून सुरू झालेली ही रॅली बसस्थानक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटणी चौक, अकोला नाका, आर.टी. ओ. कार्यालय मार्गे पुन्हा जिल्हा न्यायालय परिसरात दाखल झाली.



सायकलचा वापर वाढवून पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि इंधन बचतीचा संदेश देण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे, मुद्रांक जिल्हाधिकारी राजेश वजिरे, जिल्हा विधिज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. अनुप बाकलीवाल, मुख्यन्यायरक्षक ॲड. परमेश्वर शेळके, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. वैभव तिफणे, लेखाधिकारी युसूफ शेख, सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. विजय आरू, निशांत पतसंस्थेचे प्रादेशिक व्यवस्थापक सुरेश शिंदे, ॲड. विजय कांबळे, सहकार विभाग लेखापाल घमराव घुगे, चार्टर्ड अकाउंटंट मारोती भोयर, प्रा. कहाते, राजेश एकाडे, शर्मा, ॲड. केसवाणी तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# ऑपरेशन प्रहार : ४२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

### लाखपुरी येथे हातभट्टी दारूवर धाड ; एकाविरुद्ध गुन्हा दाखल

**मूर्तिजापूर/प्रतिनिधी**

जिल्हा पोलिसांच्या ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी लाखपुरी परिसरात अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्याविरुद्ध कारवाई करत ४२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, पोलिसांना गोपनिय माहिती मिळाली की, लाखपुरी येथील करण मोहन कैथवास (वय ३३, रा. लाखपुरी, ता. मूर्तिजापूर) हा अवैधरित्या गावठी दारूची निर्मिती व विक्री करीत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी पंचांसमक्ष लाखपुरी ते दर्यापूर मार्गावरील पूर्णा नदी पात्राजवळ छापा टाकला. या कारवाईदरम्यान आरोपीच्या ताब्यातून दोन प्लास्टिक कॅनमध्ये साठवून ठेवलेली ६० लिटर गावठी हातभट्टी दारू, तसेच तीन प्लास्टिक ड्रममध्ये ३०० लिटर सडवा मोहामास आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या दारू व साहित्याची एकूण किंमत ४२ हजार ८०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात अप. क्र. २४३/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायद्यातील कलम ६५ (ई) व (फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पुढील तपास हवालदार गणेश गावंडे व पोलिस कर्मचारी मनीष मालठाणे करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलिस अधिकारी वैशाली मुळे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ठाणेदार श्रीधर गुट्टे, पीएसआय चंदन वानखेडे, हवालदार गणेश गावंडे तसेच पोलिस कर्मचारी गजानन सायम, रितेश मद्दी आणि शंकर खेडकर यांनी सहभाग घेतला.

# पंचायत समितीत अहिल्यादेवींना अभिवादन



**मानोरा/प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती पंचायत समितीत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला खासदार संजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे माजी सदस्य अनिल राठोड, अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अरविंद पाटील इंगोले, कृषी उत्पन्न बाजार समिती मानोरा सभापती डॉ. संजय रोठे, संचालक अभिजीत पाटील, पंचायत समितीचे माजी सदस्य गोपाल भोयर, माजी उपसभापती अंजार पटेल, नगरपंचायत मानोरा नगरसेवक राजेंद्र पाटील म्हातारमारे यांच्यासह भाऊराव चव्हाण, दयाराम मेहेल्डे, निखिलेश भोरकडे, विशाल राठोड, डॉ. विशाल सिरसाट, धनुर्धर लवटे, नितेश लवटे, अनिकेत लवटे व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# जिल्हाप्रमुखांचा राजीनामा, शिंदे सेनेत जाणार?

### उद्धव ठाकरेंना अमरावतीत मोठा धक्का..

**अमरावती/प्रतिनिधी**

राज्यात विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असतानाच अमरावतीत शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे अमरावती जिल्हाप्रमुख नरेंद्र पडोळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी ही घडामोड घडल्याने त्याकडे विशेष लक्ष वेधले गेले. पडोळे हे लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर येत असून त्यामुळे अमरावतीतील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नरेंद्र पडोळे यांनी पक्षातील अंतर्गत गटबाजी आणि स्थानिक पातळीवरील नाराजीमुळे राजीनामा दिल्याची चर्चा सुरू आहे. त्यांनी जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा दिल्यानंतर ठाकरे गटात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे अचलपूर आणि मेळघाट विधानसभा क्षेत्रातील संघटनात्मक जबाबदारी त्यांच्याकडे होती. आगामी जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर झालेली ही घडामोड ठाकरे गटासाठी चिंतेची बाब मानली जात आहे.



गेल्या काही महिन्यांपासून ठाकरे गटातील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते पक्ष सोडून शिंदे गट किंवा भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यात आता अमरावतीतील या मोठ्या राजीनाम्याची भर पडली आहे. त्यामुळे या भागात ठाकरे गटाची संघटनात्मक ताकद कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, शिंदे गट मात्र सातत्याने आपला विस्तार करत असून नव्या नेत्यांना पक्षात सामावून घेण्यावर भर देत आहे.

# स्मार्ट मीटरचा दणका ; ग्राहकांमध्ये नाराजी

**यवतमाळ/प्रतिनिधी**

दारव्हा शहरासह तालुक्यात महावितरणकडून मोठ्या प्रमाणावर स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. मात्र, या मीटरच्या कार्यपद्धतीबाबत ग्राहकांना पुरेशी माहिती न दिल्याने अनेकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार पुढे येत आहे.

ग्राहकांच्या म्हणण्यानुसार, स्मार्ट मीटर बसविताना त्याचे फायदे सांगण्यात आले. मात्र, बिल थकल्यास वीजपुरवठा आपोआप खंडित होऊ शकतो. ही महत्त्वाची बाब अनेकांना सांगितली गेली नाही. पूर्वी ग्राहक काही कारणास्तव एखाद्या महिन्याचे बिल पुढील महिन्यात भरत असत. त्यामुळे वीजपुरवठा सुरू राहत होता. मात्र, स्मार्ट मीटर प्रणालीमुळे थकबाकी वाढताच



वीजपुरवठा बंद होण्याचा धोका निर्माण झाला आहे. ग्रामीण भागातील मजूर, शेतमजूर व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना याचा सर्वाधिक फटका बसत असल्याचे दिसून येते. अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याने त्यांना वेळेवर बिल भरणे शक्य होत नाही. अशावेळी वीजपुरवठा बंद झाल्यास घरगुती कामकाज, विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच शेतीशी संबंधित कामांवर परिणाम होत आहे.

### ताडोबा वेबसाईट हॅक झाल्याची अफवा ; प्रशासनाची माहिती

# ३० जूनपासून कोअर एरिया सफारी बंद

**नागपूर/वृत्तसंस्था**

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाची ऑनलाईन बुकिंग वेबसाईट हॅक झाल्याची समाजमाध्यमांवर पसरलेली माहिती पूर्णपणे खोटी आणि अफवा असल्याचे ताडोबा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. यासोबतच, दरवर्षीप्रमाणे पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आगामी ३० जून ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीसाठी ताडोबाचा मुख्य वनक्षेत्र (कोअर झोन) पर्यटनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. प्रभू नाथ शुक्ला यांनी अधिकृत प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

गेल्या २० मे रोजी यूट्यूब आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका अज्ञात व्यक्तीने ताडोबाची अधिकृत ऑनलाईन सफारी बुकिंग वेबसाईट हॅक केल्याचा दावा करणारा व्हिडिओ पोस्ट केला होता. हॅकरने ८० टक्के तिकिटे स्वतःच्या ताब्यात घेऊन ती विकत असल्याचा खोटा दावाही केला होता. या गंभीर दाव्यानंतर 'एनआयसी'च्या व्यवस्थापन टीमने संपूर्ण बुकिंग प्रणालीची सखोल चौकशी व तांत्रिक तपासणी केली.

या तपासाअंती ताडोबाच्या बुकिंग पोर्टलमध्ये कोणत्याही प्रकारची सुरक्षा त्रुटी किंवा हॅकिंग झाले नसल्याचे सिद्ध झाले. ताडोबाची प्रतिमा मलिन करण्याच्या हेतूनेच ही खोटी पोस्ट टाकण्यात आली असल्याने, प्रशासनाने या प्रकरणी पोलिसात रीतसर फौजदारी तक्रार दाखल केली आहे. पर्यटकांनी अशा कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये आणि केवळ अधिकृत संकेतस्थळावरूनच बुकिंग करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दुसऱ्या बाजूला, वन्यजीव संवर्धन आणि पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेचा उपाय म्हणून ३० जून २०२६ पासून ताडोबाचा 'कोअर झोन' पर्यटनासाठी पूर्णपणे बंद केला जाणार आहे. ३० जून रोजी मंगळवार असून हा ताडोबाचा साप्ताहिक सुटीचा दिवस असल्याने, याच दिवसापासून मान्सून बंदची अंमलबजावणी सुरू होईल.




**सफारी गेट्स पर्यटनासाठी नियमित सुरू**

वन्यप्रेमींसाठी आनंदाची बातमी म्हणजे या काळात ताडोबाचे सर्व 'बफर झोन' आणि त्याअंतर्गत येणारे सफारी गेट्स पर्यटनासाठी नियमित सुरू राहणार आहेत. बफर झोनमधील सफारी केवळ हवामानाच्या परिस्थितीवर आणि वेळोवेळी मिळणाऱ्या प्रशासकीय सूचनांवर अवलंबून असेल. या बफर गेट्ससाठीची ऑनलाईन बुकिंग सुविधा नेहमीप्रमाणे सुरू राहणार असून, पर्यटकांनी या बदललेल्या नियमांचा विचार करूनच आपल्या सफारीचे नियोजन करावे, अशी विनंती प्रशासनाने केली आहे.

# दोन लाख रुपयांच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

**मूर्तिजापूर/प्रतिनिधी**

माहेरहून दोन लाख रुपये आणण्याच्या मागणीसाठी विवाहितेचा शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू, सासरे, नणंद आणि नणंदेच्या पतीविरुद्ध मूर्तिजापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी एमन तब्बसुम मोहम्मद अली (वय २१, रा. धोत्रा शिंदे, ह.मु. जुनी वस्ती, खडकपुरा, मूर्तिजापूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. तक्रारीनुसार, लग्न झाल्यापासून आरोपींनी घरगुती कारणांवरून त्यांना वारंवार शिवीगाळ करून माहेरहून दोन लाख रुपये आणण्याचा तगादा लावला.




या प्रकरणातील आरोपींमध्ये पती मोहम्मद अली अहमद अली, सासू शबाना बी अहमद अली, सासरे अहमद अली, नणंद रेशमा परविन जावेद खान आणि नणंदेचे पती जावेद खान (सर्व रा. धोत्रा, ता. मूर्तिजापूर) यांचा समावेश आहे. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी सातत्याने पैशासाठी दबाव टाकत तिचा शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केला. तसेच तिला घरातून बाहेर काढून दिले. याशिवाय पती मोहम्मद अली याने ''तुला फारकती देऊ का, तलाक देऊ का'' अशा शब्दांत धमक्या देत त्रास दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ही घटना २ फेब्रुवारी २०२५ पासून डिसेंबर २०२५ पर्यंत धोत्रा शिंदे येथील फिर्यादीच्या सासरी घडल्याचे पोलिसांनी सांगितले. भरोसा सेल, अकोला यांच्या अहवालानंतर फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ८५, ३५१(२), ३५२ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस नाईक दिनेश सोळंके करीत आहेत. पोलिसांकडून प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## न्यूज ब्रीफ

### आयुष्मान भारत कार्ड काढण्याचे आवाहन

**मोताळा :** केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत प्रत्येक पात्र कुटुंबाला मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या योजनेचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी तहसील कार्यालयातर्फे जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी तात्काळ आयुष्मान भारत कार्ड तसेच आभा कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन प्र.तहसीलदार शुभम काळे यांनी केले आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबांना प्रतिवर्षी पाच लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य विमा संरक्षण मिळते. यामध्ये हृदयविकार, कर्करोग, किडनी विकार, मेंदूविकार यांसारख्या गंभीर आजारांवरील उपचारांचा समावेश असून शस्त्रक्रिया, रुग्णालयात दाखल होणे तसेच डिस्चार्जनंतर काही दिवसांचा औषधोपचार खर्चही यामध्ये समाविष्ट आहे. तालुक्यातील नागरिकांना शासन मान्यताप्राप्त शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचाराची सुविधा उपलब्ध आहे.

### विशेष ग्रामसभांचे आयोजन : प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन

# ६१ ग्रामपंचायतींसाठी सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**चिखली / प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या २६ मे रोजीच्या आदेशान्वये राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणि नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

कार्यक्रमानुसार चिखली तालुक्यात मुदत संपणाऱ्या ६० ग्रामपंचायती व १ नवनिर्मित ग्रामपंचायत अशा एकूण ६१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभागनिहाय सदस्य आरक्षण निश्चित करण्यासाठी विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले आहे. १० जून रोजी अमडापूर, धोत्रा नाईक, हरणी, बोरगाव काकडे, भोरसा-भोरसी, आमखेड, कवठळ, काटोडा, खैरव, रोहडा, गोद्री, माळशेंबा, पळसखेड दौलत, सोमठाणा, शेलूद, टाकरखेड हेलगा, करवंड, दहिगाव, धोत्रा भणगोजी, पेठ, टाकरखेड मु., अंत्री खेडेकर, मलगी, अमोना, वसंतनगर, शेळगाव आटोळ, मालगणी, अंत्री कोळी, सावरगाव डुकरे आणि केळवद या ग्रामपंचायतींमध्ये विशेष ग्रामसभा होणार आहे. ११ जून रोजी इसोली, तोरणवाडा, वैरागड, तेल्हारा, एकलारा, नायगाव बु., गांगलगाव, भालगाव, कोलारा, चांधई, खोर, साकेगाव, येवता, दिवठाणा, सवणा, वळती, शेलसूर, मंगरूळ नवघरे, शेलोडी, शिंदी हराळी, उत्रादा, मेरा बु., मुरादपूर, भरोसा, अंचरवाडी, मंगरूळ इ., देऊळगाव धनगर, हातणी, भोगावती, ब्रम्हपुरी आणि किन्होळा येथे विशेष ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले आहे.



“ विशेष ग्रामसभा अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत सदस्य पदांच्या प्रभागनिहाय आरक्षण प्रक्रियेसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात येणार आहेत. या विशेष ग्रामसभांना नागरिकांनी उपस्थित राहून आरक्षण सोडतीच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे.

– **विजय सवडे**, तहसीलदार

#### गावाच्या कारभाराचे वेध

■ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर झाल्याने आनंदाचे वातावरण निर्माण आहे. ग्रामपंचायत हा पंचायतराजमधील महत्त्वाचा घटक आहे. गावाचा कारभार सांभाळण्यासाठी अनेकजण रांगेत असतात. याकरिता आता वातावरण निर्मिती झाली आहे. एकदा सोडत जाहीर झाली की तयारीला लागण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. विशेष ग्रामसभांमध्ये हे आरक्षण काढण्यात येणार आहे.

## ‘लोकशाई’त समकालीन वास्तवाचे प्रभावी चित्रण: गायकी



**बुलढाणा/ प्रतिनिधी**

लोकशाई हा कवितासंग्रह समकालीन वास्तवाचे प्रभावी चित्रण करणारा असून वाचकांना चिंतनाची नवी दिशा देणारा असल्याचे मत प्राचार्य डॉ. गोविंद गायकी यांनी व्यक्त केले.

स्थानिक विदर्भ महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्यावतीने कवी प्रा. डॉ. विनोद राठोड यांच्या लोकशाई या नव्याने प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहाच्या निमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरुन प्राचार्य गायकी बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सहसचिव प्रा. डॉ. संगीता पवार उपस्थित होत्या. प्रारंभी प्राचार्य डॉ. गोविंद गायकी यांच्या हस्ते प्रा. डॉ. विनोद राठोड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना प्रा. डॉ. विनोद राठोड यांनी लोकशाइ या कवितासंग्रहाच्या निर्मितीमागील प्रेरणा, सामाजिक जाणीवा आणि लोकजीवनाशी असलेले त्याचे नाते याविषयी मनोगत व्यक्त केले. त्यांनी कवितेच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्न, लोकशाही मूल्ये आणि सामान्य माणसाच्या भावविश्वाला अभिव्यक्त करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी प्रा. डॉ. संगीता पवार यांनी लोकशाई या कवितासंग्रहावर प्रकाश टाकला. त्यांनी संग्रहातील कवितांमधून लोकजीवन, सामाजिक प्रश्न, मानवी संवेदना आणि लोकशाही मूल्यांचे प्रभावी दर्शन घडत असल्याचे सांगितले. तसेच हा संग्रह साहित्यविश्वात निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## काँग्रेसचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष प्रकाश अवचार यांनी स्वीकारला पदभार

**बुलढाणा /प्रतिनिधी**

संघटन सृजन अभियानाच्या माध्यमातून बुलढाणा जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी प्रकाश पाटील अवचार यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांचा पदग्रहण सोहळा सोमवार १ जून रोजी जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यालयात उत्साहात पार पडला. मावळते जिल्हाध्यक्ष लोकनेते राहुल बोंद्रे यांच्याकडून त्यांनी अध्यक्षपदाचा पदभार स्विकारला.

गत ११ वर्ष राहुल बोंद्रे यांनी अध्यक्षपदाची धुरा संभाळत पक्षासाठी दिलेल्या योगदानाबद्दल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञभाव व्यक्त केल्याचे पाहायला मिळाले. तर अनेक काँग्रेस कार्यकर्त्यांनी राहुल बोंद्रे यांच्यासोबत फोटो, सेल्फी काढत त्यांनी अध्यक्षपदाच्या काळात केलेल्या संघर्षाच्या आठवणींना उजाळा दिला.नवनियुक्त जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील अवचार म्हणाले की, ११ वर्षाच्या काळात अतिशय चांगल्या प्रकारचे काम राहुल बोंद्रे यांनी केले आहे. त्यांच्या काळात खूप कमी काळ पक्ष सत्तेवर होता, अशा वेळी संघर्ष करणे मोठे आव्हान असते. परंतू ते डगमगले नाही, सरकारला जाब विचारण्याचे काम त्यांनी अहोरात्रपणे केले आहे. त्यांच्या माध्यमातून झालेले कार्य पुढे घेऊन जाणार असल्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. राहुल बोंद्रे यांना जिल्हा काँग्रेस कमिटीचा अध्यक्ष करू नका. ते आमदार आहेत, ते फिरणार नाहीत, अशी भूमिका मी पक्षापुढे मांडली होती. मात्र, पक्षाने त्यांना जिल्हाध्यक्ष केले आणि त्यांनीही जिल्हाध्यक्षपदाला न्याय दिल्याचे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. याप्रसंगी आमदार धीरज लिंगाडे, श्याम उमाळकर, संजय राठोड, लक्ष्मण घुमरे, ज्ञानेश्वर पाटील, मंगला पाटील, मोहतेशाम रजा यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## सिंदखेडराजा येथे ५ जूनला रोजगार मेळावा

**बुलढाणा /प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवती तसेच रोजगारक्षम अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी रोजगाराची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, बुलढाणा आणि राजमाता पॅरामेडिकल कॉलेज, सिंदखेडराजा यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जून रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा रोजगार मेळावा ५ जून रोजी सकाळी साडेनउ वाजता राजमाता पॅरामेडिकल कॉलेज येथे आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यात क्विझ कॉर्पोरेशन, नागपूर यांच्या माध्यमातून महानगर गॅस लिमिटेड, मुंबई आणि टाटा मोटर्स, पुणे या नामांकित कंपन्यांनी विविध रिक्त पदांसाठी उमेदवारांची भरती प्रक्रिया राबविणार आहेत.या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आयटीआय, पदवीधर तसेच प्रशिक्षण पूर्ण केलेले पुरुष व महिला उमेदवार सहभागी होऊ शकतात. कंपनी प्रतिनिधींकडून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्राथमिक निवड करण्यात येणार असून नामांकित कंपन्यांमध्ये प्रशिक्षणाची संधीही उपलब्ध होणार आहे. उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार एकापेक्षा अधिक पदांसाठी मुलाखत देण्याची संधी राहणार आहे. या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.



## उपवर्गीकरणाची प्रक्रिया थांबविण्याची मागणी

**चिखली /प्रतिनिधी**

अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवून संविधानिक हक्कांचे संरक्षण करण्याबाबत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी, शासनाने नियुक्त केलेल्या माजी न्यायमूर्ती अनंत बदर आयोगाचा अहवाल तात्काळ सार्वजनिक करून. गैर संविधानिक एक सदस्य अनंत बदर समिती रद्द करण्यात यावी, महाराष्ट्रातील अनुसूचित जातीची जाती आधारित जनगणना करण्यात यावी. त्यानुसार अनुसूचित जातींच्या शासकीय व निमशासकीय सेवांमधील अनुशेष तात्काळ भरण्यात यावा,अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला महाराष्ट्रातील ५९ जातींपैकी ५८ जातींचा विरोध आहे. त्यामुळे गैर संविधानिक उपवर्गीकरण तात्काळ रद्द करण्यात यावे, महाराष्ट्रातील अनुसूचित जाती समाजाची जातनिहाय सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा व्यापक सर्वेक्षण करून त्याचा अहवाल जाहीर करण्यात यावा, त्या अहवालाच्या आधारे अनुसूचित जातींसाठी शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सर्व अनुशेष पदे तात्काळ भरण्यात यावीत, अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृहे, कौशल्य विकास योजना, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तसेच उच्च शिक्षणाच्या सुविधा वाढवून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष उपाययोजना करण्यात याव्यात, अनुसूचित जाती समाजाच्या एकात्मतेला बाधा पोहोचेल असा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व संबंधित घटकांशी व्यापक चर्चा करून त्यांची संमती घेण्यात यावी. तसेच भारतीय संविधानातील समता, सामाजिक न्याय आणि बंधुता या मूल्यांचे संरक्षण करून अनुसूचित जातींचे संविधानिक हक्क अबाधित ठेवावेत या आशयाचे निवेदन देण्यात आले. मागण्या पूर्ण न झाल्यास अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरण समिती बुलढाणाच्या मार्गदर्शनात संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.



### सेवानिवृत्त सैनिकाची गावातून मिरवणूक




**चिखली :** भारतीय सैन्यात सलग २४ वर्षे खडतर व शौर्यपूर्ण देशसेवा करून सेवानिवृत्त झालेले गावचे सुपुत्र सतिष मधुकर भुतेकर यांचे सवणा ग्रामस्थ व मित्र मंडळाच्यावतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने गावातून मिरवणूक काढण्यात आली होती. २४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर गावात परतलेल्या वीर जवानाच्या स्वागतासाठी संपूर्ण सवणा गाव गजबजून गेले होते. गावातील प्रमुख मार्गांवरून सतिष भुतेकर यांची वाजत-गाजत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जागोजागी सुवासिनींनी त्यांचे औक्षण केले, तर ग्रामस्थांनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी करून भारत माता की जय आणि वंदे मातरमच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

### चोरीच्या संशयातून वाद; सहा जणांवर गुन्हा

**खामगाव :** कागदपत्र चोरीच्या संशयावरून झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीमध्ये झाल्याची घटना समर्थ नगर येथील गजानन कॉलनीत घडली. याप्रकरणी शहर पोलिसांनी एका कुटुंबातील सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी मनीषा विजय गवई (३३) रा. जरीफटका, नागपूर या पती व आईसह ३ जून रोजी रात्री आरोपींच्या घरी गेल्या असता कागदपत्र चोरीच्या कारणावरून वाद निर्माण झाला. तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत करून फिर्यादी त्यांचे पती व आई यांना शिवीगाळ करत मारहाण केली.

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 990



**—: आडवी विधाने :—**

1) कोंढाणाचा गड जिंकून तानाजी धारातीर्थी पडले तेव्हा शिवरायांनी काढलेले उद्‌गार
7) सैनिक
9) समारंभ, आनंदाचा दिवस
11) कष्ट, दुर्दशा
12) नवरदेवाची आई
14) श्रीकृष्णाची सखी
15) तोटा, हानी
16) एक चतुर्थांश
17) पाप न करणारा
19) चव, आवड
21) बघणे, निरीक्षण करणे
22) नातेवाईक 24) लवण
25) तिरपे येणारे सूर्याचे किरण
27) जन्मदाता
28) नाटक, सिनेमातील दुष्ट प्रवृत्तीचा व्यक्ती
30) केसांत माळावयाची फुलांची माळ
31) कुरुक्षेत्रावर युधिष्ठिराने दिलेले संदिग्ध उत्तर
35) तल्लीन, निमग्न
37) शीर, नस
38) चामखीळ 40) मोठेपणा
42) पाठीच्या हाडांची गाठ
43) दूध आटवून तयार होणारा घट्ट पदार्थ
44) रमणारा
45) एकमेकांच्या पुढे जाण्याची स्पर्धा
47) सांभाळ करणे
51) आनंद 52) बरोबरी, माळ
53) मृत शरीर
54) एक प्राचीन वाहन प्रकार
55) सरळ नसलेला
57) चित्रपटांसाठी गीतांची रचना करणारा
61) फुलांचा हार
62) व्यायाम
65) मोठे, महत्तम
66) आंग्ल भाषेत नशीब
68) ओळ, रांग
69) कमी करणे, काटछाट
70) वैरभाव
72) सूट देणे, कसर
73) रोग्यांची सेवा करणारी सेविका
75) साधा, प्रामाणिक
78) ध्वज, झेंडा 79) यज्ञ, पूजा
80) कष्ट, मेहनत
81) अकरावी राशी
82) विचारांनी निश्चित नसलेला
83) कर्म, कृत्य
84) विनायक
87) ज्यांच्या भोवती चित्रपटाची कथा घडते ते मुख्य पुरुष पात्र
89) चटका 90) दाणेदार
92) दही घुसळण्याचे काष्ठयंत्र
94) राशीचा अर्थ, फलज्योतिष्याचा एक प्रकार
95) मातीचे भांडे
97) एक खनिज द्रव्य
99) सारासार, चांगले वाईट
100) बाण, तीर
101) अगदी, सर्वथा, मारलेला
102) देऊळाचे शिखर

**—: उभी विधाने :—**

1) पुढे गेले त्यांच्या मागे डोळे मिटून जाणारा
2) आपले प्रतिबिंब आपल्यालाच दाखविणारी वस्तू
3) यजमान, नवरा
4) भूतकाळातील गोष्टींचा आढावा घेणे
5) उत्तर, नांगर (हिं)
6) सौंदर्य7) जामीनकी घेणे
8) इंग्रजीतील एक वर्णाक्षर
9) परत करण्याच्या बोलीवर घेतलेले पैसे
10) इंद्राचे आयुध
13) मार्गस्थ झालेला
16) निर्दोष, पवित्र
17) पुन्हा लग्न करणे
18) केरळ राज्यातील एक सण
20) दोन राशींची परस्पर समता दर्शविणारे बैजिक वाक्य
21) ज्याला कधीही मरण किंवा वार्धक्य येत नाही असा
23) अर्धांगवायू
26) लहान फेटा
29) फण्यावर दहाचा आकडा धारण करणारा सर्प
32) केस
33) कर्णाला जन्म देणारी आई
34) अंगावर रोमांच उठविणारे
36) चकाकी, तकतकीतपणा
37) प्रसिद्धी पावलेला
39) शहाणा, सुज्ञ
41) हिंमत, धाडस
42) मकई
45) हकीकत, माहिती
46) फेफरे, घेरी 48) तुझे
49) माणसाच्या डोक्याची कवटी
50) न थकता केलेली मेहनत
53) प्राप्ती, मिळकत
56) एक वनस्पती तूप उत्पादक कंपनी
58) जरचा सोबती
59) वेळूच्या दोन टोकांना ओझी टांगून नेण्याची केलेली व्यवस्था
60) युद्धभूमी
63) निरंतर, एकसारखे
64) पोळी शेकण्याचे पात्र
67) खूप प्रयत्नाने साध्य होणारे
69) आलिंगन देणे, मिठी मारणे
70) घशातला कफ काढणे, खोकणे
71) ओढा, प्रवृत्ती
72) फुरसत, फावला वेळ
74) चामडे, चर्म
76) तलवार
77) काम न करता निषेध नोंदविणे
79) तीव्र दुःख, वेदना
83) .......... आरती, पहाटे काकडा ओवाळून देवाची केलेली आरती
84) कठीण, दुर्गम
85) जमवून ठेवलेली शस्त्रे
86) रामायणात श्रीरामाचा एक भाऊ
88) मृत्यूदेवता
91) घोंघावत येणारा जोराचा वारा
93) शूर पुरुष
94) आहुती टाकणे
96) कुंतल, केस
98) फळातील रसाळ भाग

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मो | ह | न | दा | स | क | र | म | चं | द | गां | धी | | फा | ट | क |
| ग | म | क | | रो | | ज | ल | द | | गे | | प्र | | क | र |
| रा | | ली | ला | व | ती | | म | न | | य | म | दू | त | | म |
| | दां | | | र | | पै | | | द | | | ष | | वे | णू |
| अ | भि | न | य | | वि | ज | या | द | श | मी | | ण | | | क |
| सं | क | ट | | सा | | | ग | | र | | सा | | | इ | |
| ख्य | | व | | स | वा | ष्ण | | अ | थ | पा | सू | न | इ | ति | |
| | प | र | शु | रा | म | | वि | ना | | वा | र | स | | श्री | |
| उ | | | श्रु | | न | | नि | थ | ळ | | वा | | स | | अ |
| दो | ष | | षा | | मू | | म | | | प्र | स | व | वे | द | ना |
| उ | | सा | | का | र्ति | के | य | | | का | | च | | | मि |
| दो | ला | य | मा | न | | स | | घा | ग | र | फुं | क | णे | | का |
| | जा | | घ | न | घो | र | | मो | ती | | क | | | उ | |
| ओ | हो | टी | | | | | मा | ळी | | ति | र | क | म | ठा | |
| ना | म | क | र | ण | वि | धी | | | प | री | | ल | | ठे | व |
| मा | | | व | | द्या | | न | ग | | प | र | म | | व | |

uday munde - 8446302691

दैनिक महाभूमि

शुक्रवार । ५ जून २०२६

mahabhoomiakolawashim@gmail.com

# अकोला भूमि

## न्यूज ब्रीफ

### आयटीआय प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

**अकोला :** महिलांना कौशल्याधारित व रोजगाराभिमुख प्रशिक्षण देणाऱ्या अकोल्यातील डॉ. आनंदीबाई जोशी मुलींचे आयटीआय येथे प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. केवळ महिलांसाठी असलेल्या या संस्थेत महिला सक्षमीकरणासाठी अनेकविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत. अभ्यासक्रमाबरोबरच निवासासाठी स्वतंत्र वसतिगृह, ग्रंथालय, दरमहा ५०० रुपये विद्यार्थीवेतन व इतर सोयी-सुविधा दिल्या जात आहेत.

### पद्म पुरस्कारासाठी नामांकन प्रस्ताव

**अकोला:** भारत सरकारच्या गृह मंत्रालयामार्फत देशातील सर्वो च्च नागरी सन्मानांपैकी असलेल्या पद्मविभूषण, पद्मभूषण व पद्मश्री पुरस्कारांसाठी नामांकन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. हे पुरस्कार विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय, उत्कृष्ट व समाजोपयोगी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान करण्यात येतात.

### निधन वार्ता

#### रामदास राजनकर



**अडगाव बु. :** येथील रहिवासी रामदास वासुदेव राजनकर यांचे गुरुवार ४ जून रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे. ते विदर्भ कृषी सेवा केंद्र संचालक अशोक राजनकर यांचे वडील होत.

### निधन वार्ता

#### संतोष लापूरकर



**अडगाव बु. :** येथील रहिवासी संतोष हरिभाऊ लापूरकर यांचे गुरुवार ४ मे रोजी वयाच्या ४५ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, एक मुलगी असा आप्त परिवार आहे.

---

### अधिकारी, पदाधिकाऱ्यांचे जलपुनर्भरणाकडे दुर्लक्ष

# जिल्ह्यातील सरकारी कार्यालयातील रेन वॉटर हार्वेस्टिंगचे तीनतेरा!

**सुनिल डिडोळकर**

**अकोला:** शहरातील विविध शासकीय इमारतींच्या रंगरंगोटीकडे अधिकाऱ्यांनी लक्ष दिले आहे. मात्र भूजलाची पातळी वाढवण्यासाठी आवश्यक असलेल्या जलपुनर्भरणाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे काही मोजके शासकीय कार्यालये वगळता अनेक कार्यालयांवरील रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना मोडकळीस आली आहे.

गेल्या अनेक दशकांपासून जमिनीतील पाण्याचा केवळ उपसा सुरू आहे. या तुलनेने पावसाच्या पाण्याचा निचरा जमिनीत केला जात नाही. त्यामुळेच जिल्ह्याच्या भूजल पातळीत लक्षणीय घट झाली आहे. पावसाळ्याच्या अखेरीस भूजलाच्या पातळीत वाढ होते. परंतु विहीर, हातपंप, बोअर आदींच्या माध्यमातून पाणी उपसले जाते, तसेच उपसलेले पाणी नदी, नाल्यांच्या माध्यमातून वाहून जाते. परिणामी उन्हाळ्यात तापमान वाढल्यानंतर भूजलाची पातळीत घट होते. त्यामुळेच शहराच्या विविध भागात ३०० ते ४०० फूट बोअर घेऊनही पाणी मिळत नाही. त्यासाठी पावसाचे पाणी जमिनीत जिरवणे आवश्यक आहे.

शासनाने ही बाब लक्षात घेऊनच शासकीय, निमशासकीय कार्यालयांना रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना राबवण्याचे आदेश दिले होते. या आदेशाचे विविध शासकीय कार्यालयांनी पालनही केले. मात्र या योजनेच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्याने बहुतांश शासकीय कार्यालयांवरील रेन वॉटर हार्वेस्टिंग योजना मोडकळीस आली आहे.





#### यावर अवलंबून असते भूजलाची उपलब्धता

■ भूस्तराची पारगम्यता, साठवण क्षमता, वहन क्षमता या तीन गुणांवर भूजल उपलब्धता अवलंबून असते. खडकात असणाऱ्या भेगा, तडेवजोडयामधून पाणी खोलपर्यंत मुरुन दोन थरांच्या जोडात खोलवर साठवून राहू शकते. असे पाणी साठवण्यासाठी अनेक वर्ष लागतात. याखोलीपर्यंत विहीर, बोअर घेतल्यास हा साठाही नष्ट होतो.

#### या कार्यालयावरील यंत्रणा मोडकळीस

■ महापालिका क्षेत्रातील लघु पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय(जुने), जिल्हा परिषद,महापालिका आदी कार्यालयातील योजना मोडकळीस आली असून काही ठिकाणी दुरुस्तीची गरज आहे. तर पाटबंधारे अन्वेषण विभाग, विदर्भ जलविद्युत व उपसा सिंचना, जागतिक बॅक प्रकल्प विभाग, उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय,राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, पाटबंधारे संशोधन विभाग तसेच महापालिकेचे विविध कार्यालये यांनी ही योजनाच राबवली नाही.

#### पाणी टंचाईचा सामना

■ महापालिकेला पाणी टंचाईचा सामना करावा लागतो. या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने जे नागरिक आपल्या घरावर रेन वॉटर हार्वे स्टिंग योजना राबवतील, त्यांना सामान्य करात पाच टक्के सूट देण्याचे जाहिर केले होते. मात्र गेल्या तीन वर्षापासून ही योजनाही बंद करण्यात आली आहे. एकीकडे नागरिकांना आवाहन करायचे, तर दुसरीकडे स्वत:च्या इमारतींवरील योजनेकडे दुर्लक्ष करायचे, अशी अवस्था महापालिकेची आहे. कारण महापालिकेचे मुख्य कार्यालयासह चार झोन कार्यालय, ३२ शाळा इमारती, तीन रुग्णालये, अन्य ठिकाणी असलेले कार्यालये अशा एकूण ५० इमारती आहेत. महापालिकेने मुख्य कार्यालयावर ही योजना राबवली. मात्र शोषखड्डा आता राहिला नाही.

---



# मूर्तिजापूरात अवैध दारू निर्मितीवर कारवाई

### ५६ हजारांचा सडवा मोहमाच जप्त

**मूर्तिजापूर / प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत माना पोलिसांनी अवैध दारू निर्मितीवर धडक कारवाई करत ५६ हजार रुपये किमतीचा सडवा मोहमाच जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस अधीक्षक अर्चीत चांडक यांच्या निर्देशानुसार अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत ३ जून रोजी गोपनीय माहितीच्या आधारे माना पोलीस स्टेशनच्या पथकाने ग्राम मधापुरी शेतशिवारात छापा टाकला.

या कारवाईत अमोल सुभाष सोळंके (वय ३५, रा. मधापुरी, ता. मूर्तिजापूर) हा गावठी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणाऱ्या सडवा मोहमाचासह आढळून आला. पोलिसांनी एका लोखंडी ड्रममधील १०० लिटर तसेच १२ टपरी डब्यांमधील १८० लिटर असा एकूण २८० लिटर सडवा मोहमाच जप्त केला. जप्त मुद्देमालाची किंमत सुमारे ५६ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चीत चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली माना पोलीस स्टेशनचे ठाणेदार गणेश नावकार, पोलीस हवालदार दीपक सोळंके, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद हिवराळे व चा. पो. कॉ. नंदकिशोर हिरळकर यांनी केली.

---

## पेरणीपूर्वी सोयाबीन बीजप्रक्रिया अनिवार्य : दिपक तायडे

**मूर्तिजापूर / प्रतिनिधी**

खरिप हंगामाच्या पार्श्वभूमीवर सोयाबीन पिकाची पेरणी करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया करणे अत्यावश्यक असल्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे यांनी केले आहे. बीजप्रक्रियेमुळे बीजजन्य रोगांपासून संरक्षण मिळून उगवणक्षमता वाढते, रोपे निरोगी व सशक्त बनतात तसेच उत्पादनात लक्षणीय वाढ होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

कृषी विभागाच्या माहितीनुसार, १० किलो सोयाबीन बियाण्यासाठी बायर्योन्डाझिम ५० टक्के डब्ल्यूपी किंवा थीरम ७५ टक्के डब्ल्यूपी यांपैकी कोणतेही एक औषध ५ ग्रॅम प्रमाणात १० मिली पाण्यात मिसळून त्याचे द्रावण तयार करावे. हे द्रावण बियाण्यावर समान प्रमाणात शिंपडून सर्व बियांना व्यवस्थित लागेल याची काळजी घ्यावी. त्यानंतर प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत सुमारे ३० मिनिटे वाळवून तात्काळ पेरणी करावी. तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे यांनी सांगितले की, "बीजप्रक्रिया ही कमी खर्चात अधिक फायदा देणारी महत्त्वाची कृषी तंत्रज्ञान प्रक्रिया आहे. शेतकऱ्यांनी पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया केल्यास रोगांचा प्रादुर्भाव कमी होऊन उत्पादन व नफ्यात वाढ होण्यास मदत होते.

---

## मान्सुनपूर्व पावसात रस्त्याची दुरवस्था, चिखलामुळे अपघात

**अक्षय पाटील / प्रतिनिधी**

**अकोट :** रंभापुर ते सोनाळा मार्ग अकोट शहरातून गेला आहे. या रस्त्याचे काम सुरू आहे मात्र काही ठिकाणी स्वतःच्या मर्जीप्रमाणे काम सुरू असून याचा त्रास वाहनधारकासह नागरिकांना तसेच शेतकऱ्यांना होत आहे.

सध्या शेतीची कामे सुरू असून याच मार्गाने शेतकरी आपले वाहने घेऊन जात आहे. तसेच या महामार्गावर काही ठिकाणी मुरमा ऐवजी बाजूची माती टाकल्यामुळे अनेक ठिकाणी चिखल झाला आहे. या चिखलामध्ये मोठ्या गाड्या फसत असून त्याचा त्रास वाहनधारकांना करावा लागत आहे. अकोट ते सोनाळा रस्त्याची पहिल्याच पावसात अत्यंत दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर जागोजागी मोठे खड्डे व चिखल झाल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. खराब रस्ता आणि खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत असून, वाहनचालक व नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.



अकोट मधून जाणारा सोनाळा रस्ता सध्या मृत्यूचा महामार्ग ठरत आहे गेल्या अनेक वर्षापासून या रस्त्याचे काम संत गतीने सुरू असून अनेक ठिकाणी ठेकेदार स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागत आहे याचा त्रास शेतकरी वाहनधारक यांना होत आहे सध्या रस्त्याचे एवढे निकृष्ट काम होत असून या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे या रस्त्यावर काही ठिकाणी मुरमा न्यूजी शुद्ध मातीच टाकल्या जात आहे यामुळे अनेक वाहने यामध्ये घसरून पडली आणि अनेक लोक यामध्ये किरकोळ जखमी झाले आणि काही ठिकाणी माती टाकल्यामुळे चिखलामध्ये वाहन फसले अशीच घटना ३ जून रोजी दुपारी चार ते पाच च्या सुमारास सावरा येथे घडली बस क्रमांक एम एच ४९ बी झेड ८३७५ अमरावती अकोट इलेक्ट्रिक बस सावरा येथे चिखलामध्ये फसली अनेक प्रयत्नानंतर ही बस प्रवाशांच्या साथीने बाहेर काढण्यात आली त्यामुळे हा रस्ता किती बोगस आणि किती भ्रष्टाचार युक्त झाला असे दिसून येत आहे या रस्त्यांवर अनेक ठिकाणी साइटवर रस्त्याच्या कडेला कमी प्रमाणात चढाव असून अनेक वाहन एका साईडला झुकत आहे भविष्यात एखादे वाहन पलटी होत आहेत.

#### अपूर्ण किंवा अर्धवट पूल धोकादायक..!

■ नव्याने बांधल्या जाणाऱ्या रस्त्यांवर अपूर्ण किंवा अर्धवट राहिलेले पूल वाहनचालकांसाठी जीवघेणे ठरतात. निकृष्ट नियोजन आणि अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेमुळे हे पूल थेट अपघातांना आमंत्रण देतात. या अर्धवट पुलांमुळे रस्त्यांवर निर्माण होणाऱ्या अडचणीचा सामना वाहनधारकांना करावा लागत आहे.प्रशासनाने पुलांचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून नागरिकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून द्यावा.

---

## ई-केवायसीच्या अडचणींमुळे शेतकरी हैराण

**दिलीप तिहिले**

**हिरपूर :** प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेअंतर्गत ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना परिसरातील अनेक वृद्ध शेतकऱ्यांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे.

फेस ऑथेंटिकेशन आणि बायोमेट्रिक पडताळणीमध्ये सातत्याने येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रक्रिया रखडली असून, आगामी हप्ते मिळण्याबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील ज्येष्ठ शेतकरी वारंवार सेवा केंद्रांवर जाऊनही ई-केवायसी पूर्ण करू शकलेले नाहीत. वाढत्या वयामुळे चेहऱ्यात झालेला बदल, दृष्टीदोष तसेच हातावरील त्वचा झिजल्याने बोटांचे ठसे स्पष्टपणे उमटत नसल्याने बायोमेट्रिक पडताळणी अयशस्वी होत असल्याचे दिसून येत आहे.

अनेक शेतकऱ्यांनी मोबाईलद्वारे फेस ऑथेंटिकेशनचा पर्याय वापरण्याचा प्रयत्न केला. मात्र, मोबाईल कॅमेऱ्याची गुणवत्ता, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि तांत्रिक त्रुटींमुळे प्रक्रिया पूर्ण होत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. परिणामी शेतकऱ्यांना वारंवार सेवा केंद्रांच्या फेऱ्या माराव्या लागत असून त्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. या समस्येमुळे शासनाच्या महत्त्वाकांक्षी पीएम किसान योजनेचा लाभ केवळ तांत्रिक कारणांमुळे पात्र लाभार्थ्यांपासून दूर जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शेतकरी व नागरिकांनी शासनाकडे विशेष उपाययोजनांची मागणी केली आहे.

---

## दोन दिवसीय सेंद्रिय शेती कार्यशाळा

**मूर्तिजापूर / प्रतिनिधी**

येथे सद्यस्थितीत रासायनिक खताच्या वाढलेल्या भरमसाठ किंमती व जगातील युद्धजन्य परिस्थितीमुळे खताचा तुटवडा तसेच मुख्य कारण म्हणजे दिवसेंदिवस जमिनीची सुपीकता नष्ट होत असल्याचे कारण लक्षात घेता दोन दिवसीय सेंद्रिय शेती प्रशिक्षण कार्यशाळा व चर्चा सत्र उत्साहात पार पडले. मूर्तिजापूर परिसरातील व बाळापूर, बार्शिटाकळी तसेच पातूर तालुक्यातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

---

## तत्कालीन उपअधीक्षक पंकज पवार यांच्यावर गुन्हा

**अकोला / प्रतिनिधी**

जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, अकोला येथे उपअधीक्षक म्हणून कार्यरत असताना विविध अनियमितता आणि अधिकारांचा गैरवापर केल्याच्या आरोपावरून तत्कालीन उपअधीक्षक तथा सध्या निलंबित असलेले पंकज पवार यांच्याविरुद्ध सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे महसूल व भूमिअभिलेख विभागात मोठी खळबळ उडाली आहे.प्राप्त माहितीनुसार, पंकज पवार यांनी १ जून २०२३ ते ३० जून २०२५ या कालावधीत उपअधीक्षक पदावर कार्यरत असताना मोका पाहणीच्या आधारे १५ प्रकरणांमध्ये नियमबाह्य निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणांमध्ये स्वाधिकारातील मिळकतींचे सत्ता प्रकार बदलणे, मृत खातेदारांच्या नावाने अर्ज स्वीकारणे, अस्थायी भाडे तत्त्वावरील मिळकत पत्रिका तयार करणे, सार्वजनिक सुविधांसाठी राखीव असलेल्या जमिनी खासगी व्यक्तींच्या नावावर करणे तसेच अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन सत्ता प्रकारासंदर्भात प्रमाणपत्रे देणे अशा गंभीर बाबींचा समावेश असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या कथित प्रकारांमुळे शासनाने लोकसेवक म्हणून दिलेल्या अधिकारांचा गैरवापर करून शासनाचा विश्वासघात आणि फसवणूक केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. यासंदर्भात जिल्हा अधीक्षक भूमिअभिलेख, अकोला यांनी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या आधारे सिटी कोतवाली पोलिसांनी अप. क्र. २१८/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम १९९, २०१, ३१६(२), ३१६(५), ३१८(३) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील कलम १०६ व १३५ अन्वये २ जून २०२६ रोजी गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनिल इंगोले करीत आहेत.

---

### राज्य पथकाच्या तज्ज्ञांकडून मार्गदर्शन ; विविध विभागांच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग

# शोध व बचाव पथकांचे काटेपूर्णा प्रकल्प येथे प्रशिक्षण

**अकोला / प्रतिनिधी**

आगामी मान्सून हंगामाच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम आणि सज्ज राहावी यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन शोध व बचाव पथकांचे विशेष प्रशिक्षण गुरुवारी काटेपूर्णा प्रकल्प येथे आयोजित करण्यात आले.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेताना पथकांचे प्रशिक्षण तसेच आवश्यक साधनसामग्री तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थितीत या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षण



कार्यक्रमास बार्शीटाकळीचे तहसीलदार रवींद्र कापशीकर, गटविकास अधिकारी मोरे यांची उपस्थिती होती. नागपूर येथील राज्य आपत्ती प्रतिसाद पथकाचे डी. जे. दाते, ए. ए. सिकंदर आणि डी. व्ही. काळे यांनी उपस्थितांना आपत्ती व्यवस्थापन, शोध व बचाव कार्यातील आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रत्यक्ष कृतीविषयक मार्गदर्शन केले. अकोला, मूर्तिजापूर, बार्शीटाकळी, पातूर आणि बाळापूर तालुक्यांतील पोलीस, होमगार्ड, अग्निशमन विभागाचे कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी तसेच आपदा मित्र यांनी या प्रशिक्षणात सक्रिय सहभाग नोंदविला. प्रशिक्षणामध्ये केवळ सैद्धांतिक माहिती न देता पूरस्थितीत बचाव कार्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी, बोट हाताळणी, आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांचे स्थलांतर, तसेच आधुनिक बचाव उपकरणांच्या वापराची प्रात्यक्षिके घेण्यात आली.

#### मान्सूनकाळातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी

■ प्रशिक्षणादरम्यान पूरस्थितीमध्ये शोध व बचाव कार्य कसे करावे, आपत्कालीन प्रथमोपचार, आधुनिक बचाव साहित्याचा प्रभावी वापर, बोट संचालन प्रशिक्षण तसेच विविध आपत्तीजन्य परिस्थितींतील प्रत्यक्ष प्रात्यक्षिके याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. आगामी मान्सून काळात विविध स्तरांवरील यंत्रणा अधिक प्रशिक्षित आणि समन्वयित राहाव्यात, या उद्देशाने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरले.

#### विविध बचाव पथकांचा उत्स्फूर्त सहभाग

■ या प्रशिक्षणात राज्य पथकाचे पोलीस निरीक्षक व आपत्ती व्यवस्थापन पथकाचे सुनील कल्ले, हरिहर निमकांडे, दीपक सदाफळे, उमेश आटोटे, रणजीत घोगरे, विजय माल्टे यांच्यासह वीर भगतसिंह पथक, बचाव पथक, माँ चंडिका बचाव पथक कुरणखेड, पोपटखेड तसेच वंदे मातरम् आपत्कालीन मदत पथकाच्या सदस्यांनी सहभाग घेतला. विविध विभाग व स्वयंसेवी संस्थांच्या समन्वयातून आयोजित हे प्रशिक्षण मान्सूनपूर्व तयारीसाठी उपयुक्त ठरल्याचे उपस्थितांनी सांगितले.

---

## वादळी वाऱ्यासह पाऊस ; घराची पडझड ; केळी बागेचे नुकसान



**आडगाव बु. / प्रतिनिधी**

काल झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊसामुळे अडगाव परिसरातील केळी चे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून घराची पडझड व रस्ता बंद झाला होता, अडगाव परीसरात काल एक ते दिड तास वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे केळी पिकाला मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे तसेच येथील लिलाबाई ओंकार खंडारे यांच्या घरावरील जोरदार हवेमुळे टीन उडून गेले .

अकोट हिवरखेड रस्त्यावरील पुलाचे बांधकाम चालू असल्याने रस्त्यावर डीप्पर पलटी झाल्याने तीन तास वाहतूक बंद झाली होती.. घराच्या पडझडीचा तलाठी व ग्रामसेवक यांनी घटनास्थळी पंचनामा केला असुन केळीचा पण पंचनामा करण्यात यावा अशी शेतकऱ्यांनी मागणी केली आहे

## न्यूज ब्रीफ

### निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण ७ जूनला

**नांदुरा :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त येथील विवेकानंद सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने आयोजित निबंध स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत यश संपादन केलेल्या स्पर्धकांसाठी बक्षीस वितरण समारंभ ७ जून रोजी सकाळी १०.३० वाजता नांदुरा अर्बन बँकेच्या डॉ.हेडगेवार सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य शामकांत काळवीट राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक रवींद्र भुसारी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष विजय सारभूकन यांनी केले आहे.

### दारूच्या अवैध विक्रीवर पोलिसांची धाड

**खामगाव :** शहरातील बाळापूर फैल परिसरात सुरू असलेल्या दारूच्या अवैध विक्रीवर शहर पोलिसांनी धडक कारवाई करत एका वृद्धाला देशी दारूच्या साठ्यासह ताब्यात घेतले. ही कारवाई २ जून रोजी करण्यात आली.खामगाव शहर पोलिसांचे पथक नियमित गस्तीवर असताना अकोला रोडवरील बाळापूर फैल परिसरात संशयास्पद हालचाली आढळून आल्या. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार पोलिसांनी कृष्ण जंगलू पिल्ले (६१) याच्या ठिकाणावर अचानक धाड टाकली. तपासणीदरम्यान तो देशी दारूची अवैध विक्री करण्यासाठी साठा करून ठेवत असल्याचे उघड झाले.

### मटका अड्डयावर पोलिसांची धाड

**खामगाव :** शहरातील शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जूना फैल परिसरात सुरू असलेल्या वरली मटका जुगार अड्डयावर पोलिसांनी धाड टाकून एका संशयिताला ताब्यात घेतले. या कारवाईत मटका साहित्य व रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या संशयिताचे नाव मोहम्मद आसिफ अब्दुल कलाम (४४) रा. बर्डे प्लॉट, खामगाव असे आहे.२ जून रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर पोलिसांना माहिती मिळाली की, जूना फैल परिसरातील सरकारी स्वच्छतागृहाजवळ एक व्यक्ती लोकांकडून पैसे स्वीकारून वरली मटका जुगार चालवत आहे. या माहितीच्या आधारे पोलिस अंमलदार प्रफुल्ल टेकाळे व त्यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी छापा टाकला. कारवाईदरम्यान मोहम्मद आसिफ हा सार्वजनिक ठिकाणी बसून नागरिकांकडून पैसे घेत मटका चिठ्ठया देताना पोलिसांना रंगेहाथ आढळून आला. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**विशेष पोलीस महानिरीक्षक महेश पाटील घटनास्थळी ; तपास चक्राला वेग**

# राजुरा हत्याकांड : जनआक्रोशानंतर पोलिस यंत्रणेला आली जाग!

**जळगाव जामोद/प्रतिनिधी**

२६ एप्रिल रोजी राजुरा शिवारात घडलेल्या अज्ञात महिला हत्याकांड प्रकरणाने संपूर्ण परिसरात खळबळ उडवून दिली होती. या गंभीर प्रकरणात आदिवासी समाजातील निरपराध नागरिकांना नाहक त्रास दिला जात असल्याचा आरोप करत पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आक्रमक पवित्रा घेण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जळगाव जामोद पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले होते.

या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सक्रिय झाले असून अमरावती परिमंडळाचे विशेष पोलीस महानिरीक्षक महेश पाटील यांनी जळगाव जामोद येथे भेट देत तपासाला वेग दिला आहे. त्यांनी राजुरा येथे जाऊन



घटनास्थळाची पाहणी केली. ज्या ठिकाणी मृतदेह पुरण्यात आला होता त्या ठिकाणीही भेट देऊन फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने पुन्हा पाहणी करण्यात आली. यावेळी बुलढाणा जिल्हा पोलीस अधीक्षक नीलेश तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्रेनिक लोढा, मेहकरचे उपविभागीय पोलीस अधिकारी तथा तपास अधिकारी संतोष खाडे, मलकापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद महाजन, जळगाव जामोदचे तहसीलदार पवन पाटील आणि ठाणेदार सचिन बागुल उपस्थित होते. महेश पाटील यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सुमारे तीन तास बंद दाराआड बैठक घेत प्रकरणातील प्रत्येक बाबीची माहिती घेतली. खुनाचा उलगडा करून दोषींना लवकरात लवकर अटक करण्याबाबत त्यांनी निर्देश दिले आहेत.

**नागरिकांकडून सहकार्याची अपेक्षा..**

■ मृत महिलेची ओळख अद्याप पटलेली नसून या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करण्यासाठी पोलिसांनी नागरिकांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. संबंधित महिलेबाबत कोणतीही माहिती असल्यास पोलिसांना कळिवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवली जाईल तसेच ठोस माहिती देणाऱ्यास ५० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

## ग्राहक संरक्षणासाठी कायदेशीर दुरुस्त्या करण्याची गरज




**मलकापूर/प्रतिनिधी**

बाजारातील सध्याची एमआरपी व्यवस्था ग्राहकांच्या संरक्षणाऐवजी शोषणाचे माध्यम बनत चालली असून उत्पादकांकडून मनमानी पद्धतीने जास्त किंमती छापून ग्राहकांची फसवणूक केली जात आहे. या व्यवस्थेत तातडीने सुधारणा करून ग्राहक संरक्षणासाठी कायदेशीर दुरुस्त्या कराव्यात, या मागणीचे निवेदन अखिल भारतीय ग्राहक पंचायत, शाखा मलकापूरच्यावतीने तहसीलदारांना ३ जून रोजी देण्यात आले.

प्रत्येक उत्पादनावर एम आरपीसोबतच त्याचा प्रत्यक्ष उत्पादन खर्च लिहिणे बंधनकारक करावे, कंपन्यांच्या मनमानी एम आरपी छापण्यावर कायदेशीर बंदी घालावी योग्य व न्याय्य कमाल किंमत निश्चित करण्यासाठी व तपासणीसाठी स्वतंत्र कायदेशीर प्राधिकरण स्थापन करावे तसेच औषधे, अन्नपदार्थ आणि अत्यावश्यक वस्तूंसाठी विशेष नियंत्रण व्यवस्था निर्माण करून फसवणूक करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करावी अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.अखिल भारतीय ग्राहक पंचायत गेल्या चार दशकांपासून या विषयावर लढा देत असून २५ मे रोजी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे राष्ट्रीय स्तरावरील जनआंदोलन करण्यात आले होते. यावेळी तालुकाध्यक्ष दामोदर शर्मा, हरिभाऊ पाटील, के. एस. शर्मा, सहसचिव धर्मेश राजपूत, विधी सल्लागार ॲड. व्यंकटेश पानमवार, तक्रार समिती सदस्य पंकज मोरे आणि भिकु भोजने उपस्थित होते.

## नुकसानाचे पंचनामे करून तात्काळ मदत द्यावी

**जिल्हा काँग्रेसची तहसिलदारांकडे मागणी..**

**पळशी झाशी/प्रतिनिधी**

संग्रामपूर तालुक्यात १ जून रोजी संध्याकाळी झालेल्या भीषण चक्रीवादळ व अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानीचे पंचनामे करून तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्यावतीने तहसिलदारांना निवेदनाद्वारे करण्यात आली.



चक्रीवादळामुळे तालुक्यातील संत्रा व केळी पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक बागा जमीनदोस्त झाल्या आहेत. तसेच अनेक कुटुंबांच्या घरांचे छप्पर उडाले असून भिंती कोसळल्याने त्यांचेही मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या परिस्थितीत महसूल व कृषी विभागामार्फत संयुक्त पंचनामे तातडीने करावेत व बाधित शेतकरी व कुटुंबांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ज्या शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे, त्यांना विमा रक्कम मिळण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी पदाधिकाऱ्यांसह बाधित भागाची पाहणी करून ३ जून रोजी तहसिलदारांना निवेदन सादर केले. यावेळी सतीश टाकळकर, अमोल घोडेस्वार, मोहन रौंदडे, संतोष राजनकर, शंकरनाथ विश्वकर्मा, संजय ढगे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.जयंत सोनोने यांची बदली रद्द करण्याची मागणी

**खामगाव/प्रतिनिधी**

जिल्ह्यात सध्या केवळ दोनच नाक-कान-घसा तज्ज्ञ कार्यरत असून, घाटाखाली डॉ. जयंत सोनोने आणि घाटावर डॉ. राठोड सेवा देत आहेत. दोन्ही डॉक्टरांची रुग्णसेवा उल्लेखनीय असताना डॉ. जयंत सोनोने यांची खामगाव येथून करण्यात आलेली बदली अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

विराट मल्टिपर्पज फाउंडेशनच्या वतीने उपसंचालक, आरोग्य सेवा विभाग, अकोला यांच्याकडे निवेदन देण्यात आले. या निवेदनात खामगाव सामान्य रुग्णालयात वर्ग १ पद रिक्त असतानाही डॉ. सोनोने यांची बदली करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांसाठी केवळ दोनच ईएनटी तज्ज्ञ उपलब्ध असल्याने खामगाव येथे कार्यरत असलेले डॉ. सोनोने हे सहा तालुक्यांतील गोरगरीब रुग्णांसाठी महत्त्वाची सेवा देत होते. त्यांच्या अचानक बदलीमुळे रुग्ण तपासणी तसेच दिव्यांग तपासणी प्रक्रियेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जिल्ह्यात तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता असताना उपलब्ध डॉक्टरांना कायम ठेवणे गरजेचे असताना घाटाखालच्या भागातील एकमेव ईएनटी तज्ज्ञाची बदली करणे चुकीचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ही बदली तत्काळ रद्द करून खामगाव येथील रिक्त पदावरच त्यांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी कविता इंगळे, शत्रुघन इंगळे, पद्माकर धुरंदर, शेखर तायडे, वसंत चिखलकर, मनोज पालीवाल, वर्षा देशमुख, मधुकर पाटील, सरला देशमुख, गणेश नेमाडे, विश्वनाथ इंगळे, अमोल वसे, योगिता तायडे, योगेश निंभोरे आदी उपस्थित होते.

## फुली सबस्टेशनवर शिवसेनेचे घेराव आंदोलन

**शेतकऱ्यांना दहा तास वीजपुरवठा देण्याची मागणी..**



**नांदुरा/प्रतिनिधी**

तालुक्यातील फुली उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी किमान दहा तास अखंडित वीजपुरवठा मिळावा तसेच परिसरातील विविध प्रलंबित विद्युत समस्या तातडीने मार्गी लावाव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी शिवसेनेच्यावतीने फुली सबस्टेशनवर घेराव आंदोलन करण्यात आले.

शिवसेना सहसंपर्क प्रमुख वसंत भोजने व उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने शेतकरी व शिवसैनिक सहभागी झाले होते. यावेळी उपकार्यकारी अभियंता आर. जी. तायडे यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. पूर्वी शेतीपंपांना आठ तास वीजपुरवठा मिळत होता; मात्र सध्या तो केवळ सहा तासांवर आल्याने शेतकऱ्यांना शेती मशागतीची कामे, पिकांना पाणी देणे आणि इतर कृषी कामांमध्ये अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेतीपंपांसाठी किमान दहा तास नियमित वीजपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच परिसरातील चोरीस गेलेल्या विद्युत तारा व तुटलेले पोल तातडीने बसविण्यात यावेत, मेंढळी येथील मुधडा डीपीवरील दोन पोल उभारण्यात यावेत, पुरुषोत्तम राठी यांच्या शेतातील पडलेले पोल बदलण्यात यावेत, वडनेर भोलजी-टाकरखेड जिल्हा परिषद मतदारसंघातील ट्रान्सफॉर्मरची देखभाल व दुरुस्ती युद्धपातळीवर करण्यात यावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या. या आंदोलनात हरिदास गणबास, गोपालसिंह राजपूत, पप्पू नारखेडे, बाळकृष्ण पाटील, शिवाजीराव पाटील, संतोष कडाळे, धिरज मापारी, दिनेश गायकवाड, सतीश मानकर, पांडुरंग मानकर, गजानन गायकवाड, केशव मापारी, बाळू गणगे, मंगेश मापारी, गजानन नेमाने, नंदू कोळसकर, अमोल मापारी, महादेव गणगे, बाळू नेमाने, बळीराम सरोदे, उदय सरोदे यांच्यासह शेतकरी व शिवसैनिक उपस्थित होते.

### पैशाच्या वादातून युवकाला मारहाण

**जळगाव जामोद :** शहरातील जैन मंदिर परिसरात पैशाच्या जुन्या वादातून एका १७ वर्षीय तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत तरुणाचे डोके फोडून त्याला जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या प्रकरणी जळगाव जामोद पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख राजीक शेख सुलेमान (१७) रा. जामोद याने १५ दिवसांपूर्वी आरोपी आमीर खान रशीद खान याच्याकडून १ हजार रुपये उसने घेतले होते. फिर्यादीने ३० मे रोजी हे पैसे परत केले होते. मात्र ३ जून रोजी आरोपी आमीर खान याने हे पैसे मिळाले नसल्याचा दावा करत राजीकसोबत वाद घातला. वाद विकोपाला गेल्याने आरोपी आमीर खान याने राजीकवर लाथा-बुक्क्यांनी आणि पट्टूयाने हल्ला केला. दरम्यान, तिथे उपस्थित असलेल्या आरोपी रशीद खान उमरखान याने लाकडी दांडक्याने राजीकच्या डोक्यात प्रहार करून त्याचे डोके फोडले. तर तिसरा आरोपी समीर खान रशीद खान याने राजीकला पकडून ठेवत त्याला मारहाण केली.

## एनसीसीचे तीन कॅडेट सैन्य दलात

**शेगाव/प्रतिनिधी**

स्थानिक ग.भि. मुरारका महाविद्यालयातील एनसीसी युनिटचे तीन विद्यार्थी सैन्यदलात भरती झाले असून ही महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

शेगाव तालुक्यातील ग्रामीण भागाशी नाळ जोडलेल्या या महाविद्यालयात एकमेव एनसीसी युनिट असून, या युनिटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सैन्यदलात भरतीसाठी तयारी करून घेतली जाते. महाविद्यालयातील एनसीसी अधिकारी कॅप्टन एच. पी. सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना ड्रिल, फायरिंग, अडथळा शर्यत, मॅप रीडिंग, जजिंग डिस्टन्स यांसह स्पर्धा परीक्षा, नेतृत्व, व्यक्तिमत्व विकास, आपत्ती व्यवस्थापन व सांस्कृतिक कौशल्यांचे तीन वर्षांचे प्रशिक्षण दिले जाते. २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात महाविद्यालयाचे आजी-माजी तीन एनसीसी कॅडेट्स सैन्य दलात



भरती झाले. त्यामध्ये सिनिअर अंडर ऑफिसर राम तुकाराम भटकर (आरडीसी कलर कोड, दिल्ली), ज्युनिअर अंडर ऑफिसर आम्रपाली समाधान गवई (महाराष्ट्र पोलीस) तसेच सार्जंट सार्थक केशव मुऱ्हे (अग्नीवीर स्पेशल फोर्स) यांचा समावेश आहे.या तिघांनी कठोर परिश्रमातून यश मिळविल्याबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य विनोद इंगळे यांच्या हस्ते राम भटकर व सार्थक मुऱ्हे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व मिठाई देऊन गौरव करण्यात आला. यावेळी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी आई-वडील व गुरुजनांना दिले.

**तहसिलदार, देऊळगावराजा यांचे न्यायालय**

क्रमांक कावि/जन्म-मृत्यू / ६२०/ २०२६
दिनांक २४/०५/२०२६

**जाहीरनामा**

**विषय :- जन्म मृत्यु नोंद बाबत.**
**संदर्भ :- १) नारायण गणपत डोईफोडे, रा.अंढेरा ता.देऊळगावराजा, जि.बुलडाणा यांचा अर्ज २) निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी, ग्रामपंचायत अंढेरा यांचेकडील अनुपलब्धता प्रमाणपत्र.**

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्याची बहिण नामे राधाबाई गणपत डोईफोडे यांची मृत्यूची नोंद करण्या करीता आदेश मिळावा याबाबत विनंती केली आहे. अर्जदार यांचे अर्जासोबत सहपत्रीत दस्तऐवजाचे अवलोकन केले असता अर्जदार त्याची बहिण नामे राधाबाई गणपत डोईफोडे यांचा मृत्य हा दि. २१/१०/२०१८ रोजी मौज अंढेरा येथे झाल्याचे नमूद केले असून अर्जदार यांना तसे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर नोंदीबाबत कोणालाही हरकत आक्षेप असल्यास त्यांनी निम्न स्वाक्षरीतासमक्ष स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून दिनांकापूर्वी सादर करावे, दिनांक २४/०६/२०२६ नंतर कोणतेही हरकत आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का
स्वाक्षरी
तहसिलदार,
देऊळगांवराजा

**तहसिलदार खामगाव यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत खामगांव जि. बुलढाणा**

क्र.कावि/जन्म-मृत्यू शाखा / २६३/ २०२६
दिनांक १९/०५/२०२६

**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार भाऊराव तुकाराम मुळे चिंचपूर, ता.खामगांव जि.बुलढाणा यांचा मुलगा संतोष भाऊराव मुळे यांचा जन्म दिनांक ३०/०६/१९८६ रोजी चिंचपूर येथे झाला असून निबंधक जन्म/मृत्यु तथा सचिव ग्रामपंचायत चिंचपूर यांचेकडे ३०/०६/१९८६ वर्षाचे नोंदणी अभिलेखाचा शोध घेण्यात आला आणि असे दिसून आले की, संतोष भाऊराव मुळे च्या जन्म घटनेची नोंद करण्यात आलेली नाही. जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे निबंधक जन्म/मृत्यु तथा सचिव ग्रामपंचायत चिंचपूर यांना जन्म नोंदीबाबत झालेला विलंब क्षमापित करणेचा आदेश पारित करण्या करिता विनंती अर्ज दाखल केला आहे.

वरील नोंदीबाबत कोणास काही हरकत/आक्षेप घ्यावयाचे असल्यास त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्याचे १५ दिवसाचे आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) या न्यायालयात हरकत/आक्षेप अर्ज लेखी स्वरुपात दाखल करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकत/आक्षेप अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही, अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जात नमुद केल्या प्रमाणे जन्म नोंदीबाबत झालेला विलंब क्षमापित करणेचा आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण - खामगांव
स्वाक्षरी
(सुनिल पाटील)
शिक्का
तहसिलदार,खामगांव

**राज्यकर उपआयुक्त (प्रशा.), वस्तू व सेवा कर भवन, नांदुरा रोड, खामगांव, जि. बुलढाणा.**

दुरध्वनी क्र. ०७२६३-२५२१४९,
ई-मेल- coadm.kha@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रसिध्दिपत्रक**

**कार्यालयीन कामासाठी वाहन भाडेतत्वावर घेणे बाबत.**

राज्यकर उप आयुक्त कार्यालय (प्रशा), खामगांव येथे कार्यालयीन कामासाठी प्रवासी वाहतुक परवाना असलेले Bolero / Ertiga किंवा समतुल्य वाहन ११ महिने भाडे तत्वावर घेणे आहे. त्या करिता वाहन पुरवठादार/एजन्सी यांच्याकडून दरपत्रक प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक वाहन पुरवठादार / संस्था यांनी प्रस्तुत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आलेल्या नमुन्यात माहिती खालील दिलेल्या पत्यावर दिनांक १२/०६/२०२६ रोजी दरम्यान सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावी. कोणत्याही कारणास्तव उपरोक्त नमुद मुदती नंतर प्राप्त होणारे निविदा अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. अर्ज सादर करावयाच्या मुदतीत बदल झाल्यास त्याबाबतची सुचना वस्तू व सेवा कर भवन, खामगांव कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.

राज्यकर उप आयुक्त कार्यालय (प्रशा) खामगांव करिता या कार्यालयासाठी ११ महिण्याच्या करारावर खाजगी वाहन भाडे तत्वावर देण्याकरिता इच्छुक वाहन धारकाकडून खालील प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहेत.

| वाहनाचे नाव | वातानुकुलीत / बिगर वातानुकुलीत | वाहनाची संख्या |
|---|---|---|
| Bolero / Ertiga / समकक्ष (७ Sitter) Petrol/Diesel | वातानुकुलीत | ०१ |

निविदा मिळण्याचा पत्ताः राज्यकर उप आयुक्त कार्यालय (प्रशा) वस्तू व सेवाकर भवन, नांदुरा रोड, खामगांव

दि. ०४/०६/२०२६
शिक्का
स्वाक्षरी
(संदीप भिमराव शेजुळ )
राज्यकर उप आयुक्त (प्रशा.)
वस्तू व सेवा कर कार्यालय, खामगांव

**संग्रामपूर तालुका पत्रकार संघ व व्हॉईस ऑफ मीडियाचे आयोजन**

# गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतूकाची थाप!

**पळशी झाशी/प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पातुर्डा भेटीच्या पदस्पर्श दिनाचे औचित्य साधून वरवट बकाल येथील प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था सभागृहात संग्रामपूर तालुका पत्रकार संघ व व्हाइस ऑफ मीडियाच्यावतीने मुख्याध्यापक व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



तालुक्यातील शंभर टक्के निकाल लागलेल्या शाळांच्या मुख्याध्यापकांचा तसेच वैद्यकीय शिक्षण पूर्ण केलेल्या व वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेश साबळे होते. मार्गदर्शक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेडचे प्रा. डॉ. दिलीप चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे राज्य प्रवक्ते अभयसिंह मारोडे उपस्थित होते. यावेळी स्पर्धेच्या युगात केवळ संख्यात्मक नव्हे तर शैक्षणिक गुणवत्ता महत्त्वाची असल्याचे मत राजेश्वरराव देशमुख यांनी व्यक्त केले.दहावी व बारावी परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवणाऱ्या बॅरिस्टर रामराव देशमुख शिक्षण संस्थेच्या निवाना, कवठळ व वडगाव वान येथील शाळांचे मुख्याध्यापक तसेच वरवट बकाल येथील सातपुडा शिक्षण संस्था, सहकार विद्या मंदिर आणि संग्रामपूर येथील जिल्हा परिषद हायस्कूल व उर्दू हायस्कूलच्या मुख्याध्यापकांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्रल्हाद दातार, भाऊ भोजने, मिर मकसूद अली, काशिनाथ मानकर, प्रतिभा इंगळे, सचिन पाटील, रविंद्र शिरस्कार, नारायण सावतकर, साबीर खान, युसुफ शेख, सुचित धनभर, संतोष आगलावे, सतीश वानखडे, कैलास खोट्टे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**पातुर्डाचे महत्त्व केले स्पष्ट**

■ प्रास्ताविकातून भाऊ भोजने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पातुर्डा भेटीचे महत्त्व स्पष्टकेले. कार्यक्रमात अभयसिंह मारोडे, भीमराव परघरमोल, सुरेश साबळे, प्रा. डॉ. विजय चव्हाण, शेख हमीद, राजेश्वरराव देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाची सुरुवात शाहू, फुले, आंबेडकर यांच्या प्रतिमांच्या पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमास तालुक्यातील पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वैद्यकीय क्षेत्रात यश मिळिवणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सोनाळा येथील अस्मिता भीमराव वानखडे यांनी एमबीबीएस पदवी संपादन केली असून संग्रामपूर येथील मोहम्मद असीम इकबाल युसुफ शेख हे बीएएमएसचे उच्च शिक्षण घेत आहेत. या दोघांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संचालन मिलिंद सोनोने यांनी तर आभार राहुल इंगळे यांनी मानले.

दैनिक महाभूमि

# वाशिम भूमि

शुक्रवार । ५ जून २०२६

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### रिसोडमध्ये अवैध खनिज वाहतूक सुरुच

**रिसोड :** शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात वाळू, मुरूम, गिट्टी व मातीच्या अवैध उत्खनन आणि वाहतुकीचे प्रकार वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही ठिकाणी रात्रीच्या वेळी नियमबाह्य पद्धतीने गौण खनिजांचे उत्खनन करून वाहतूक केली जात असल्याचा आरोप होत आहे. या प्रकारामुळे शासनाच्या महसुलाला फटका बसत असून पर्यावरणाचेही नुकसान होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. संबंधित विभागाकडून प्रभावी कारवाई होत नसल्याने अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे मनोबल वाढल्याचे बोलले जात आहे.

### विवाहितेचा छळ; सात जणांवर गुन्हा

**कारंजा :** तालुक्यातील खेर्डा येथील एका विवाहितेला पैशांसाठी शारीरिक, मानसिक व आर्थिक छळ केल्याप्रकरणी कारंजा ग्रामीण पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार आरोपींनी पैशांची मागणी करत मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या. तसेच पतीपासून वेगळे होण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोप आहे. याप्रकरणी बीएनएसच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन

**मानोरा :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती पंचायत समिती मानोरा येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला खासदार संजय देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे माजी सदस्य अनिल राठोड, बँक संचालक अरविंद पाटील इंगोले, डॉ. संजय रोठे, अभिजीत पाटील, गोपाल भोयर, अंजार पटेल, राजेंद्र पाटील म्हातारमारे यांच्यासह भाऊराव चव्हाण, दयाराम मेहेल्डे, निखिलेश भोरकडे, विशाल राठोड आदी उपस्थित होते.

### रसायनयुक्त आंब्यांवर इतर जिल्ह्यांत कारवाई, तपासणी मोहिमांचा अभाव

# राज्यात धडक कारवाया; जिल्ह्यात मात्र भेसळ माफियांना अभय!

गजानन देशमुख

**वाशिम :** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर गुटखा, अन्नभेसळ, बनावट दूध आणि निकृष्ट दर्जाच्या खाद्यपदार्थांविरोधात धडक कारवाईचे सत्र सुरू केले आहे. अनेक जिल्ह्यांत छापे, जप्ती आणि गुन्हे दाखल करण्याच्या कारवायांमुळे भेसळ माफियांचे धाबे दणाणले आहेत. मात्र राज्यभर कारवाईचा धडाका सुरू असताना वाशिम जिल्ह्यात त्याचा प्रभाव फारसा दिसून येत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे.

सध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आंब्यांची विक्री होत आहे. राज्यातील विविध भागांत रसायनांच्या साहाय्याने पिकविलेले आंबे जप्त केले जात असताना वाशिममध्ये अशा प्रकारच्या तपासणी मोहिमा क्वचितच दिसून येतात. त्यामुळे बाजारात विक्री होणाऱ्या आंब्यांच्या गुणवत्तेबाबत ग्राहकांमध्ये साशंकता निर्माण होत आहे. याशिवाय मसाले, मिठाई, दूध, खाद्यतेल आणि इतर खाद्यपदार्थांच्या तपासण्याही अपुऱ्या असल्याची भावना व्यक्त होत आहे. राज्यात गुटखा बंदी लागू असतानाही जिल्ह्यात अनेक ठिकाणी प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थ सहज उपलब्ध होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येतात. त्यामुळे संबंधित यंत्रणा नेमकी किती प्रभावीपणे काम करत आहे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाया अपवादात्मक न राहता सातत्यपूर्ण आणि व्यापक होण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे. तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर सुरू असलेल्या धडक मोहिमेचा खरा प्रभाव वाशिममध्येही दिसणे अपेक्षित आहे. विशेष तपासणी मोहीम राबविण्याची आवशकता निर्माण झाली आहे.



#### १० रुपयांत ज्यूस; दर्जाबाबत प्रश्नचिन्ह

वाशिम शहरात विविध ठिकाणी अवघ्या १० रुपयांत फळांचा व आंबा ज्यूस विक्री होत आहे. वाढत्या महागाईच्या काळात इतक्या कमी दरात विक्री होत असल्याने त्याच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. ज्यूस तयार करण्यासाठी वापरले जाणारे पाणी, फळांचा गर आणि इतर घटकांची गुणवत्ता तपासली जात आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. अन्न व औषध प्रशासनाने अशा विक्री केंद्रांची तपासणी करून नमुने तपासावेत, अशी मागणी होत आहे.

#### कारवाई झाली, पण ती पुरेशी आहे का?

२ जून रोजी अन्न व औषध प्रशासन विभागाने वाशिम शहरात कारवाई करून सुमारे ३८ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व भेसळयुक्त पदार्थांचा साठा जप्त केला. ही कारवाई निश्चितच सकारात्मक मानली जात असली तरी जिल्ह्यातील बाजारपेठांचा विस्तार, गुटखा विक्रीबाबतच्या तक्रारी आणि भेसळीच्या संशयित प्रकारांची संख्या पाहता अशा कारवायांची व्याप्ती वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे. केवळ एखादी–दुसरी कारवाई न करता नियमित धाडसत्रे, नमुना तपासण्या आणि संयुक्त मोहिमा राबविल्यासच भेसळ व प्रतिबंधित पदार्थांच्या अवैध व्यवसायावर प्रभावी नियंत्रण मिळविता येईल, असे नागरिकांचे मत आहे.

> औषध विक्री केंद्रांची आम्ही नियमितपणे अचानक तपासणी करीत असतो. मागील महिन्यात अनसिंग येथे गर्भपात किट प्रकरणात कारवाई करून संबंधितांवर थेट गुन्हा दाखल करण्यात आला आहे. औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्याबाबत प्रशिक्षणही दिले जात आहे. याशिवाय कोणी बनावट किंवा नियमबाह्य औषधांचा व्यवसाय करत असल्याचे आढळल्यास त्यांच्यावर औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल.
>
> – **गजानन घिरके**, सहआयुक्त, औषध प्रशासन विभाग

> २ जून रोजी वाशिम शहरात कारवाई करून सुमारे ३८ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व इतर संशयित माल जप्त करण्यात आला आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि प्रतिबंधित गुटखाविरोधातील कारवाया यापुढेही सातत्याने सुरू राहतील. अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.
>
> – **भाऊराव चव्हाण**, सहआयुक्त, अन्न प्रशासन विभाग, वाशीम



## घरफोडीचा उलगडा; चार लाखांचा मुद्देमाल हस्तगत

### स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

वाशिम / प्रतिनिधी

मंगरुळपीर तालुक्यातील येडशी येथे घरफोडी करून सोने-चांदीचे दागिने चोरणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा, वाशिमच्या पथकाने अटक केली असून, चोरीस गेलेला ४ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल शंभर टक्के हस्तगत करण्यात आला आहे. अश्विनी प्रविण तायडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ११ मे रोजी रात्री त्यांच्या येडशी येथील माहेरी अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा तोडून कपाटातील सोने-चांदीचे दागिने चोरले होते.

याप्रकरणी मंगरुळपीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेने सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहितीच्या आधारे आरोपीचा शोध घेतला. आरोपी संघदीप चंदू वानखडे (रा. येडशी) हा पुणे येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर पथकाने त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चोरीची कबुली दिली. आरोपीने चोरीतील सोने-चांदीचे दागिने शेलूबाजार येथील दोन सोनारांना विकल्याचे सांगितल्यावर पोलिसांनी पंचांसमक्ष कारवाई करून ५२ ग्रॅम सोने व ४२ ग्रॅम चांदी असा एकूण ४ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीला पुढील कारवाईसाठी मंगरुळपीर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, त्याच्याकडून आणखी काही चोऱ्यांचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षिरसागर, पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोलीस निरीक्षक किशोर शेळके तसेच स्थानिक गुन्हे शाखा व मंगरुळपीर पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.

## गोवंश हत्या प्रकरणी कठोर कारवाईची मागणी

मानोरा / प्रतिनिधी

तालुक्यातील कुपटा येथे ३० मे रोजी गोवंशाची अवैध हत्या करून अवशेष फेकण्यात आल्याच्या घटनेप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद-बजरंग दल, मानोरा प्रखंडच्या वतीने ठाणेदार नैना पोहेकर यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, या घटनेमुळे हिंदू समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित सर्व आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच मानोरा तालुका व वाशिम जिल्ह्यात गोवंश तस्करी, अवैध कत्तल व गोमांस वाहतुकीच्या घटनांवर प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देताना राम हेडा, करण ठाकुर, मनोज डांबरे, क्रिस राठोड, सचिन पडघान, वेदांत तिवारी, अनुपम पद्मगीरवार, विवेक रत्नपारखी, सचिन काळे आदी उपस्थित होते.




## शाश्वत शेतीचा मंत्र; २१० शेतकऱ्यांना प्रशिक्षण

वाशिम / प्रतिनिधी

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीला चालना देण्यासाठी कृषी विभाग आणि आत्मा (एटीएमए) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या खेती बचाओ अभियान अंतर्गत आयोजित शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमात वाशिम व कारंजा तालुक्यातील २१० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. प्रशिक्षणात माती परीक्षणाचे महत्त्व, संतुलित खत व्यवस्थापन, हिरवळीच्या खतांचा वापर तसेच कमी खर्चातील नैसर्गिक शेती तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जीवामृत व बीजामृत यांसारख्या तंत्रांचा अवलंब करून उत्पादन खर्च कमी करण्यासह जमिनीची सुपीकता वाढविण्याचे उपाय तज्ज्ञांनी सांगितले. संभाव्य एल-निनो परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी जल व मृदा संवर्धन, पाण्याचा कार्यक्षम वापर आणि अचूक पीक व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला. तसेच फार्मर ग्रुप लिग स्पर्धेची उद्दिष्टे, सहभाग प्रक्रिया आणि मूल्यमापन निकष यांचीही माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

कार्यक्रमास आत्माच्या प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. तुषार देशमुख यांच्यासह कृषी विभाग व आत्माचे अधिकारी उपस्थित होते. प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांनी तज्ज्ञांशी संवाद साधून विविध शंकांचे निरसन करून घेतले. कमी खर्चात अधिक उत्पादनासाठी उपयुक्त माहिती मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.



## हल्लेखोरांवर मोक्का लावा; सावता परिषदेची मागणी

वाशिम / प्रतिनिधी

शहरात १ जून रोजी झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणी आरोपींवर मोक्का तसेच इतर गंभीर कलमांखाली गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी सावता परिषद, वाशिम जिल्ह्याच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, राजेश राऊत, प्रवीण राऊत, प्रतीक राऊत व अंकुश सोनटक्के यांच्यावर लोखंडी रॉड व अन्य घातक शस्त्रांनी हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणी वाशिम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून काही आरोपींना अटकही करण्यात आली आहे. सावता परिषदेने भर चौकात झालेला हा हल्ला गंभीर स्वरूपाचा असल्याचे सांगत आरोपींवर मोक्का अथवा तडीपारीची कारवाई करावी, सर्व अज्ञात आरोपींचा शोध घ्यावा, प्रकरणाचा जलदगतीने तपास करून फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवावा तसेच पीडित कुटुंबीय व साक्षीदारांना पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी केली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन कठोर कारवाई न झाल्यास जिल्हाभर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनावर रवी भांदुर्गे, विलास ढगे, रवी वानखेडे, रंजना पारीसकर, चेतन इंगोले, सुनील वानखेडे, गजानन ठेंगडे, श्याम दवळी, आकाश गायकवाड, बालू व प्रसाद नाळे यांच्या सह्या आहेत.



## पाटणी चौकातील रस्त्याची दुरवस्था

वाशिम / प्रतिनिधी

शहरातील पाटणी चौक परिसरातील रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून खड्ड्यांमुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अपघाताचा धोका वाढणार असल्यामुळे संबंधित विभागाने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आदर्श महिला सरपंच एसीबीच्या जाळ्यात

मालेगाव / प्रतिनिधी

तालुक्यातील ढोरखेडा ग्रामपंचायतीच्या सरपंच सुनीता दत्तात्रय (बबन) मिटकरी यांना २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना वाशिम येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुरुवारी रंगेहात पकडले.

या कारवाईमुळे तालुक्यासह जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायतीअंतर्गत करण्यात आलेल्या सुमारे ४.५ लाख रुपयांच्या नाली बांधकामाचे बिल मंजूर करून देण्यासाठी १० टक्के लाचेची मागणी करण्यात आली होती. तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार केल्यानंतर ३ जून रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर एसीबीच्या पथकाने ४ जून रोजी सापळा रचला. ठरल्याप्रमाणे २५ हजार रुपयांची रक्कम स्वीकारताच सरपंचाला रंगेहात ताब्यात घेण्यात आले. विशेष म्हणजे, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ढोरखेडा ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे मूल्यांकन करण्यासाठी बाह्य जिल्ह्यातील तपासणी पथक गावात दाखल झाले होते. तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळालेल्या आणि आदर्श ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावाची तपासणी सुरू असतानाच ही कारवाई झाल्याने उपस्थित अधिकारी आणि ग्रामस्थांमध्ये एकच चर्चा रंगली.

### वाशिममध्ये मुलांसाठी एकही सुसज्ज उद्यान नाही; गार्डनचे संवर्धन गरजेचे

# दुर्लक्षित लोकमान्य टिळक उद्यानाला नवसंजीवनीची प्रतीक्षा!

वाशिम / प्रतिनिधी

शहरातील एकेकाळचे आकर्षण असलेले लोकमान्य टिळक उद्यान सध्या दुर्लक्षामुळे ओसाड अवस्थेत पडून असून त्याच्या पुनरुज्जीवनाची मागणी नागरिकांकडून होत आहे. शहरातील नागरिकांच्या विरंगुळ्याचे आणि मुलांच्या खेळण्याचे प्रमुख ठिकाण म्हणून ओळख असलेल्या या उद्यानाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालल्याने पर्यावरणप्रेमी व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

उद्यानात मोठ्या प्रमाणावर झाडाझुडपे वाढली असून परिसर अस्वच्छ झाला आहे. अनेक झाडे पाण्याअभावी व नियमित देखभालीअभावी वाळत चालली आहेत. तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुतळ्याभोवतीही दुर्लक्षाचे चित्र दिसून येत आहे. एकेकाळी कुटुंबांसह वेळ घालवण्यासाठी आणि मुलांच्या खेळासाठी गजबजलेले हे ठिकाण आज ओसाड बनले आहे. शहरात मुलांना खेळण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना फिरण्यासाठी सुसज्ज सार्वजनिक उद्यानांची कमतरता आहे.

त्यामुळे लोकमान्य टिळक उद्यानासारखी उपलब्ध जागा विकसित करून नागरिकांसाठी खुली करण्याची मागणी होत आहे. उद्यान परिसरात मोठ्या प्रमाणावर मोकळी जागा उपलब्ध असून येत्या पावसाळ्यात येथे व्यापक वृक्षारोपण मोहीम राबवून हरित वनराई उभारता येऊ शकते. मानवाधिकार सुरक्षा व संरक्षण ऑर्गनायझेशनचे पर्यावरण संरक्षण जिल्हा सचिव आशिष वसंतराव वानखेडे यांनी नगर परिषद प्रशासनाने उद्यानाची साफसफाई, सुशोभीकरण, वृक्षसंवर्धन आणि नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे. वाढते तापमान आणि घटते हरित क्षेत्र लक्षात घेता लोकमान्य टिळक उद्यानाचे संवर्धन करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



#### लाखोंचा खर्च, पण टेम्पल गार्डनची रखडलेली स्वप्ने

वाशिम शहरातील टेम्पल गार्डन प्रकल्पाकडून नागरिकांना मोठ्या अपेक्षा होत्या. आधुनिक सुविधांसह विकसित करण्यात आलेल्या या उद्यानामुळे शहराला एक दर्जेदार विरंगुळा केंद्र मिळणार होते. मात्र, सुरू होण्यापूर्वीच लागलेल्या आगीत गार्डनचे मोठे नुकसान झाले. त्यानंतर दुरुस्ती व पुनर्विकासाची प्रक्रिया गती घेऊ शकली नाही. परिणामी लाखो रुपये खर्चून उभारलेला प्रकल्प आजही उपेक्षित अवस्थेत असल्याचे चित्र आहे. शहरात आधीच सार्वजनिक उद्यानांची कमतरता असताना टेम्पल गार्डनही नागरिकांच्या उपयोगात येऊ न शकल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

> लोकमान्य टिळक उद्यानाचे पुनरुज्जीवन करून येथे मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात यावे. शहराला हरित श्वास देण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी संयुक्तपणे पुढाकार घेण्याची गरज आहे.
>
> – **आशिष वसंतराव वानखेडे**, जिल्हा सचिव, पर्यावरण संरक्षण, मानवाधिकार सुरक्षा व संरक्षण ऑर्गनायझेशन, वाशिम.

## मूलभूत सुविधांचा अभाव; नर्सिंग विद्यार्थ्यांचे आंदोलन

वाशिम / प्रतिनिधी

मदर टेरेसा व शाहू नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी गुरुवारी विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी भर उन्हात आंदोलन करत जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. यावेळी विद्यार्थ्यांनी निवेदन सादर करून महाविद्यालयातील मूलभूत सुविधांचा अभाव आणि अतिरिक्त शुल्कवसुलीबाबत तक्रार केली.

विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, महाविद्यालयात शौचालय, प्रयोगशाळा, ग्रंथालय, पुरेशा वर्गखोल्या, क्रीडांगण आदी मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. असे असतानाही शिष्यवृत्ती व्यतिरिक्त सुमारे ३० हजार रुपये शुल्क आकारले जात असल्याचा आरोप करण्यात आला. शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची तरतूद असतानाही ही रक्कम वसूल केली जात असल्याचे विद्यार्थ्यांनी निवेदनात नमूद केले आहे. तसेच शुल्क न भरल्यास शैक्षणिक नुकसान करण्याची धमकी महाविद्यालय प्रशासनाकडून दिली जात असल्याचाही आरोप विद्यार्थ्यांनी केला. दरम्यान, या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली असून सर्व प्रकरणाची चौकशी करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्या तत्काळ पूर्ण न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने संबंधित महाविद्यालयावर खळखट्याक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेचे शहर उपाध्यक्ष आकाश सुनील लोलप यांनी दिला.

योजनांवर पाणी; हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे होवू शकत नाही संघात सहभागी

# अफगाणिस्तान विरुद्धच्या वनडे मालिकेतून विराट कोहली बाहेर

**मुंबई, वृत्तसंस्था :**

अनुभवी भारतीय खेळाडू विराट कोहली हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे अफगाणिस्तान विरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेतून बाहेर पडला आहे. विराटची दुखापत भारतीय संघासाठी एक मोठा धक्का आहे, कारण ही मालिका २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीच्या सुरुवातीसाठी महत्त्वपूर्ण मानली जात होती. विराट कोहलीने आयपीएलमध्ये जबरदस्त फॉर्म दाखवला होता. त्यामुळे अफगाणिस्तान विरुद्ध विराटकडून चाहत्यांना खूपच आशा होती. आता त्याला झालेल्या दुखापतीमुळे चाहते नक्कीच निराश झाले आहेत. विराटचा खेळ पाहण्यासाठी नेहमीच सगळे उत्सुक असतात. ३७ व्या वर्षीही उत्तम फॉर्ममध्ये विराट असल्यामुळे सर्वांचीच निराशा झाली आहे.



भारताचा माजी कर्णधार आयपीएल २०२६ संपल्यानंतर या मालिकेतून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पुनरागमन करण्यास सज्ज होता, परंतु या दुखापतीने त्याच्या योजनांवर पाणी फेरले. गेल्याच रविवारी, विराटने अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल २०२६ च्या हाय-व्होल्टेज फायनलमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध सामना जिंकून देणारे अर्धशतक झळकावले होते. त्याच्या शानदार खेळीमुळे रॉयल चॅलेंजर्स बंगळूरने सलग दुसऱ्यांदा आयपीएल ट्रॉफी जिंकली. विराटने १६ डावांमध्ये ६७५ धावा केल्या, ज्या या मोसमात आरसीबीसाठी सर्वाधिक आणि स्पर्धेतील चौथ्या क्रमांकाच्या सर्वाधिक धावा आहेत. त्याने ५६.२५ ची प्रभावी सरासरी आणि १६५.८४ चा स्ट्राइक रेट राखला. विराट कोहलीच्या दुखापतीच्या गंभीरतेची पुष्टी करताना, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या एका सूत्राने सांगितले, हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे तो अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत सहभागी होऊ शकणार नाही. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका १३ जून रोजी सुंदर धर्मशाला मैदानावर सुरू होणार आहे, परंतु विराटसारख्या खेळाडूच्या अनुपस्थितीमुळे मालिकेची चमक लक्षणीयरीत्या कमी होईल असा अंदाज लावला जात आहे.

### विराटच्या जागी एबी डिव्हिलियर्सच्या नावाची चर्चा

■ विराट संघाच्या बाहेर पडला तर रिप्लेसमेंट कोण असेल याची चर्चा सुरू झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीन नावे समोर येत असली तरीसुद्धा त्यामध्ये त्या तिन्ही नावांची शक्यता कमीच आहे. तर एबी डिव्हिलियर्स हा खेळाडू किंग कोहलीची जागा घेणार अशी माहिती मिळाली आहे. अर्थात बीसीसीआयचा अंतिम निर्णय होणे बाकी असले तरीसुद्धा अनेक रिपोर्ट्समधून हे नाव समोर येत आहे.

### कर्णधारपदावरून सूर्याची हकालपट्टी करण्याचे संकेत

■ आर्यलँड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघाच्या स्क्वॉडची घोषणा येत्या काही दिवसांत करण्यात येईल. अशातच अजित आगरकर एंड कंपनीने टी-२० विश्वकप विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवची टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून हकालपट्टी करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे सूर्यकुमारच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट करिअरचा द एंड झाल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या आहेत. या दौऱ्यांसाठी भारताच्या नव्या कर्णधाराची घोषणा केली जाईल. गतवर्षापासून सूर्यकुमार यादव बाबत अनेक चर्चा रंगल्या होत्या. टीम इंडिया जिंकत होती, पण सूर्यकुमार यादवचा फॉर्मबाबत सतत संघर्ष सुरू होता. गेल्या वर्षी सूर्यकुमारची अत्यंत खराब फॉर्म होता. त्याने २१ इनिंगमध्ये १५ च्या सरासरीनेही धावा केल्या नाहीत. भारतीय क्रिकेट बोर्डाने आता टी-२० संघाच्या भविष्याचा विचार करून नव्या कर्णधाराबाबत विचार सुरु केला आहे.

# इंडोनेशिया ओपन मधील सिंधूचे आव्हान संपुष्टात

**जगातील नंबर-१ एन से यंगकडून सरळ गेममध्ये हरली**

**जकार्ता :** भारताची स्टार शटलर पीव्ही सिंधू जकार्ता येथे सुरू असलेल्या इंडोनेशिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या राउंड ऑफ-१६ मधून बाहेर पडली. गुरुवारी तिला जागतिक क्रमवारीत नंबर-१ आणि ऑलिम्पिक चॅम्पियन एन से यंगने २१-१७, २१-१४ अशा फरकाने हरवून स्पर्धेतून बाहेर केले. यंगने सिंधूला सलग दहाव्या सामन्यात हरवले आहे. दक्षिण कोरियाच्या यंगने सिंधूला गेल्या आठवड्यात सिंगापूर ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीतही हरवून स्पर्धेतून बाहेर काढले होते. सलग दुसऱ्या पराभवामुळे दक्षिण कोरियाच्या खेळाडूविरुद्ध सिंधूचा विक्रम आणखी खराब झाला आहे. सिंधूने आतापर्यंत एन से यंगला एकदाही हरवले नाही.



पहिल्या गेममध्ये सिंधूला एन से यंगने कडवे आव्हान दिले. एका वेळी स्कोअर १०-१० असा बरोबरीत होता आणि भारतीय खेळाडू १५-१४ ने पुढेही गेली होती. पण त्यानंतर एन से यंगने सलग गुण मिळवत आघाडी घेतली. तिने ४१ शॉट्सची लांब रॅली जिंकल्यानंतर पहिला गेम २१-१७ ने आपल्या नावावर केला. दुसरा गेममध्ये दक्षिण कोरियाई खेळाडूने सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. तिने १३-६ ची आघाडी घेतली आणि सिंधूच्या परत येण्याच्या प्रयत्नांना निष्फळ करत २१-१४ ने गेम आणि सामना आपल्या नावावर केला. उत्कृष्ट कोर्ट कव्हरेजमुळे यंग जिंकली एन से यंगचे उत्कृष्ट कोर्ट कव्हरेज आणि सतत दबाव निर्माण करण्याची क्षमता सामन्याचे निर्णायक पैलू ठरले. या विजयासह ती उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली, तर सिंधूला पुन्हा एकदा प्री-क्वार्टर फायनलमध्ये पराभव पत्करून बाहेर पडावे लागले.

# लिओनेल मेस्सी पुन्हा मैदानात उतरण्यास सज्ज


**अर्जेंटिना, वृत्तसंस्था :**

फुटबॉलविश्वातील सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा फिफा विश्वचषक २०२६ येत्या १२ जूनपासून रंगणार आहे. यंदाचा विश्वचषक अनेक अर्थांनी ऐतिहासिक आणि विशेष ठरणार आहे. प्रथमच या स्पर्धेत तब्बल ४८ संघ सहभागी होणार असून अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको हे तीन देश मिळून १६ शहरांमध्ये या महास्पर्धेचे सह-आयोजन करणार आहे. या स्पर्धेतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरत आहे तो म्हणजे अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी. कतार २०२२ च्या फिफा विश्वचषक स्पेर्धेत अर्जेंटिनाला विश्वविजेतेपद मिळवून देणारा मेस्सी आता पुन्हा एकदा मैदानात उतरण्यास सज्ज झाला आहे.

३८ वर्षीय मेस्सीसाठी हा विश्वचषक ऐतिहासिक ठरू शकतो, कारण तो आपल्या कारकिर्दीतील सहावा फिफा विश्वचषक खेळण्याच्या उंबरठ्यावर आहे. याशिवाय मेस्सीकडे आता आणखी काही मोठे विक्रम मोडण्याची सुवर्णसंधी आहे. लिओनेल मेस्सीने आपला पहिला विश्वचषक २००६ साली खेळला. त्यानंतर २०१०, २०१४, २०१८ आणि २०२२ अशा सलग पाच स्पर्धांमध्ये त्याने अर्जेंटिनाचे प्रतिनिधित्व केले. आता फिफा विश्वचषक २०२६ मध्ये खेळल्यास तो सहा विश्वचषक खेळणारा इतिहासातील पहिला पुरुष फुटबॉलपटू ठरेल. विशेष म्हणजे पोर्तुगालचा ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि मेक्सिकोचा गुइलेर्मो ओचोआ यांनाही हा विक्रम करण्याची संधी आहे. अर्जेंटिनाचा प्रशिक्षक लिओनेल स्कालोनीने याने पुन्हा एकदा मेस्सीवर विश्वास व्यक्त केला आहे. गतविजेता अर्जेंटिना सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. मेस्सीच्या अनुभवामुळे संघ अधिक मजबूत मानला जात आहे. जर अर्जेंटिनाने पुन्हा विश्वविजेतेपद पटकावले, तर मेस्सी कर्णधार म्हणून दोन फिफा विश्वचषक जिंकणारा इतिहासातील पहिला फुटबॉलपटू बनेल. अर्जेंटिनाने मेस्सीच्या कर्णधारपदाखाली २०१४ आणि २०२२ चे अंतिम सामने खेळले आहेत, त्यामुळे यावेळी अंतिम सामन्यात पोहोचल्यास हा महान कर्णधारपदाचा विक्रमही निश्चित होईल.



# लॉर्ड्स क्रिकेट मैदानाचा ऐतिहासिक विक्रम



**लंडन :** न्यूझीलंडचा संघ तीन कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी इंग्लंडमध्ये दाखल झाला आहे. यातील पहिला सामना ४ जून रोजी लंडनच्या ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर खेळला गेला. किवी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. या नाणेफेकीमुळे लॉर्ड्स क्रिकेट मैदानाने एक असा पराक्रम केला आहे, जो यापूर्वी इतर कोणत्याही मैदानावर झाला नव्हता. सर्वाधिक कसोटी सामन्यांचे आयोजन करण्याच्या बाबतीत लॉर्ड्स आधीच पहिल्या क्रमांकावर आहे आणि इंग्लंड व न्यूझीलंड यांच्यातील हा सामना या मैदानावरचा १५० वा कसोटी सामना आहे.

लॉर्ड्सवर पहिला कसोटी सामना १८८४ मध्ये खेळला गेला होता. इंग्लंडमधील लॉर्ड्स स्टेडियमला जागतिक क्रिकेटमधील एक ऐतिहासिक मैदान मानले जाते, कारण येथे पहिला कसोटी सामना १८८४ मध्ये खेळला गेला होता. तेव्हापासून, इंग्लंडचा दौरा करणाऱ्या बहुतेक संघांनी लॉर्ड्सवर किमान एक सामना खेळला आहे. या स्टेडियमने अनेक मोठ्या स्पर्धांच्या अंतिम सामन्यांचे आयोजन केले आहे, ज्यात लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या आवृत्तीच्या विजेतेपदाच्या सामन्याचा समावेश आहे. इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील हा सामना वगळता, त्यापूर्वी खेळल्या गेलेल्या १४९ कसोटी सामन्यांपैकी, प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघाने ५४ वेळा, तर प्रथम गोलंदाजी करणाऱ्या संघाने ४४ वेळा विजय मिळवला आहे. याशिवाय, ५१ सामने अनिर्णित राहिले आहेत.




# वयाच्या साठीत तिसऱ्यांदा बोहल्यावर चढणार अमीर खान

बॉलीवूड अभिनेता अमीर खानच्या आणि प्रेयसी गौरी स्प्रेटच्या नात्याची कायमच बॉलीवूडमध्ये चर्चा रंगलेली असते. वर्षभरापूर्वी अमीर खानने गौरीची सर्वांशी ओळख करून दिल्यापासून चाहत्यांना उत्सुकता लागून राहिली होती आमिरच्या लग्नाची. अमीरने अनेकदा गौरी सोबत तो सिरीयस रिलेशनशिपमध्ये असल्याचे सांगितल्यानंतर अखेर तो त्यांच्या नात्याला नवे नाव देण्याच्या तयारीत आहे. वयाच्या ६१ व्या वर्षी अभिनेता आमिर खान तिसऱ्यांदा लग्न करणार आहे.

अमीर खान आणि त्याची प्रेयसी गौरी स्प्रॅट या दोघांच्या लग्नाची तारीखही समोर आली असून ५ जुलैला जवळच्या कुटुंबीयांसोबत आणि काही जवळच्या मित्रांच्या उपस्थितीत ते त्यांच्या राहत्या घरीच नोंदणी पद्धतीने त्यांच्या नात्याला औपचारिक रूप देणार आहेत. यासंदर्भात दोघांकडूनही कोणतीही अधिकृत वक्तव्य समोर आलेले नाही. अमीर आणि गौरी गेल्या वर्षभरापेक्षा अधिक काळापासून आनंदाने एकत्र राहत आहेत.


अभिनेता आमिर खान त्याच्या खासगी आयुष्यामुळे कायमच चर्चेत असतो. त्याचे या आधीचे दोन्ही घटस्फोट आणि गौरी स्प्रॅटशी असलेल्या नात्याची कायमच चर्चा झाली आहे. आमिर खानने पहिल्यांदा रीना दत्तासोबत आपली लग्नगाठ बांधली. रीनाशी घटस्फोट झाल्यानंतर आमिर खानने किरण रावशी लग्न केले. पण, आमिरचे दुसरे लग्नही फार काळ टिकले नाही. आमिर आणि किरण यांनी आपसी सहमतीने एकमेकांपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला. अशातच आता किरण रावला घटस्फोट दिल्यानंतर आमिर खान तिसऱ्यांदा प्रेमात पडला. आमिर खानने स्वतः मीडियासमोर आपली गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅटची सर्वांना ओळख करुन दिली. तसेच, आमिरने अनेकदा गौरीसोबत तो सीरिअस रिलेशनशिपमध्ये असल्याचे सांगितले आणि आता तो तिच्याशी लग्नही करणार आहे.



# ज्येष्ठ निर्माते व सेन्सॉर बोर्डचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे निधन

भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ चित्रपट निर्माते आणि केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे बॉलिवूडसह संपूर्ण मनोरंजन विश्वात शोककळा पसरली आहे. सेन्सॉर बोर्डातील त्यांच्या कडक भूमिकेसाठी ते ओळखले जात होते. पहलाज निहलानी गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरू होते. प्रकृतीत काहीशी सुधारणा झाल्यानंतर त्यांना घरी आणण्यात आले होते. मात्र, राहत्या घरीच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाच्या वृत्ताला त्यांचे जवळचे मित्र शशी रंजन यांनी दुजोरा दिला आहे.

पहलाज निहलानी हे केवळ चित्रपट निर्मातेच नव्हते, तर चित्रपटसृष्टीतील प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांची ओळख होती. ते जवळपास २९ वर्षे असोसिएशन ऑफ पिक्चर्स अँड टीव्ही प्रोग्रॅम प्रोड्युसर्स या संस्थेचे अध्यक्ष होते. २००९ मध्ये त्यांनी या पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर २०१५ मध्ये त्यांची केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळ अध्यक्षपदी नियुक्ती झाली. मात्र, २०१७ मध्ये त्यांना या पदावरून हटवण्यात आले.



त्यांच्या स्पष्टवक्तेपणा आणि बेधडक भूमिकांमुळे ते अनेकदा चर्चेत राहिले. १९८२ मध्ये प्रदर्शित झालेल्या हतकडी या चित्रपटाद्वारे त्यांनी निर्माता म्हणून कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांच्या निर्मितीतील चित्रपटांमधून गोविंदा आणि चंकी पांडे यांसारख्या कलाकारांना बॉलिवूडमध्ये मोठी संधी मिळाली. निहलानी यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक गाजलेल्या चित्रपटांची निर्मिती केली. त्यांचा आंखे हा चित्रपट १९९० च्या दशकातील सर्वाधिक यशस्वी आणि लोकप्रिय चित्रपटांपैकी एक मानला जातो. निर्माता म्हणून यशस्वी कारकीर्द घडवल्यानंतर निहलानी यांनी दिग्दर्शन क्षेत्रातही पाऊल टाकले. २०१२ मध्ये त्यांनी अवतार या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. तसेच अभिनयाचीही त्यांना आवड होती.

# 'ग्राम चिकित्सालय' मध्ये अमोल पराशर मुख्य भूमिकेत परतणार

भारतातील लोकप्रिय ओटीटी प्लॅटफॉर्म प्राइम व्हिडिओने आपल्या बहुप्रतिक्षित प्राइम ओरिजिनल मालिका 'ग्राम चिकित्सालय'च्या दुसऱ्या सीझनच्या जागतिक प्रीमियरची घोषणा केली आहे. ही मालिका २३ जून रोजी भारतासह जगभरातील २४० हून अधिक देश आणि प्रदेशांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या नव्या पर्वात प्रेक्षकांचे लाडके कलाकार पुन्हा एकदा झळकणार आहेत. अभिनेता अमोल पराशर मुख्य भूमिकेत परतणार असून त्याच्यासोबत आकाश मखिजा, आनंदेश्वर द्विवेदी, विनय पाठक, आकांक्षा रंजन कपूर आणि गरिमा विक्रांत सिंग हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसतील. याशिवाय, लोकप्रिय अभिनेता दिनेश लाल यादव यांचीही या सीझनमध्ये विशेष उपस्थिती असणार आहे. दिग्दर्शक ललितम तिवारी यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या मालिकेचे लेखन वैभव सुमन आणि श्रेया श्रीवास्तव यांनी केले आहे. 'द वायरल फीवर' निर्मित या हृदयस्पर्शी विनोदी नाटकाने पहिल्या सीझनपासूनच प्रेक्षकांची मने जिंकली होती. ग्रामीण भारतातील आरोग्य व्यवस्थेची वास्तववादी बाजू आणि गावकुसातील जीवनातील संघर्ष, माणुसकी, विनोद आणि नातेसंबंध यांचे प्रभावी चित्रण या मालिकेत करण्यात आले आहे.



काल्पनिक भाथकंडी गावावर आधारित असलेल्या या कथेत ग्रामीण भागातील आरोग्यसेवेपुढील आव्हाने आणि त्यावर मात करण्यासाठी झटणाऱ्या व्यक्तींची कहाणी दाखवण्यात आली आहे. दुसऱ्या सीझनमध्येही प्रेक्षकांना भावनिक, विनोदी आणि प्रेरणादायी घटनांचा संगम अनुभवायला मिळणार आहे. पहिल्या सीझनला मिळालेल्या भरघोस प्रतिसादानंतर 'ग्राम चिकित्सालय'च्या दुसऱ्या सीझनबाबत प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. ग्रामीण जीवनाचा वास्तववादी अनुभव आणि मनोरंजनाचा अनोखा संगम असलेली ही मालिका पुन्हा एकदा प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यास सज्ज आहे. 'ग्राम चिकित्सालय' सीझन २ चा प्रीमियर २३ जून रोजी हिंदी भाषेत केवळ प्राइम व्हिडिओवर होणार आहे.




## बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**राजा शिवाजी** : रात्री ८:४५
**देऊळ बंद २** : ९:००

## खामगाव

**श्री गजानन टॉकिज**

**कट्टालन** : शो टाईम- दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**देऊळ बंद २** : शो टाईम- दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

## वाशिम

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

**कत्तलान** : दुपारी १२:१५
**देऊळ बंद-२** : सकाळी ११:४५, दुपारी ३:०५, सायंकाळी ६:२०, रात्री ९:३५
**राजा शिवाजी (मराठी)**: दुपारी २:५५, सायं. ६:२५, रात्री ९:४५

## अकोला

**मिराज**

**चांद मेरा दिल** : स. ९.००, दु. ३.३०, सायं. ७.१५, रात्री १०.००
**देऊळ बंद (मराठी)** : स. ९.००, दु. १२.२५, दु. ३.५०, सायं. ७.१५, रात्री १०.४५
**कट्टालन** : स. ९.००, दु. ४.४५
**भूथ बंगला** : स. ९.०५ , रात्री १०.४५
**दी ग्रेट ग्रॅन्ड सुपरहिरो** : स. ११.२०, रात्री ८.१५
**राजा शिवाजी** : स. ११.४५ , सायं. ६.१५, रात्री १०.००
**पती पत्नी और वो दो** : दु. १२.२०, दु. ५.४५
**क्रिष्णावतारम पार्ट १** : दी हार्ट - दु. १.४५
**श्री बाबा नीम करोली महाराज** : दु. २.५०

## छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**श्री बाबा नीब करारी महाराज** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०
**द ग्रेट ग्रॅण्ड सुपरहिरो** : दुपारी दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०
**देऊळ बंद-२** : दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**कृष्णावतरम -२** : दुपारी १२:१५, २:३०
**चाँद मेरा दिल** : दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**पती पत्नी और वो दो** : दुपारी १२:१५
**भूत बंगला** : सायंकाळी ५:३०

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**द ग्रेट ग्रॅण्ड सुपरहिरो** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०
**राजा शिवाजी** : दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**चाँद मेरा दिल** : दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**देऊळ बंद-२** : सायंकाळी ५:३०, ६:३०
**पती पत्नी और वो दो** : दुपारी १२:१५

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**द ग्रेट ग्रॅण्ड सुपरहिरो** : सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**राजा शिवाजी** : सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००
**चाँद मेरा दिल** : दुपारी २:३०, रात्री १०:२५
**देऊळ बंद-२** : दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०